



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार १६ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## 'बंजारा आणि वंजारा एकच'

**बीड/प्रतिनिधी :** हैद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गात समाविष्ट करून आरक्षण द्यावे, या मागणीसाठी सोमवारी बीड जिल्ह्यात विराट मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिलेल्या या मोर्चात हजारोंच्या संख्येने बंजारा बांधव सहभागी झाले. या मोर्चाला माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी हजेरी लावली व समाजाला पाठिंबा जाहीर केला.



**मुंडेंच्या वक्तव्यावरून संताप-** धनंजय मुंडे यांनी भाषणात 'बंजारा आणि वंजारा एकच आहेत' असे वक्तव्य केले. या विधानावरून समाज आक्रमक झाला. बंजारा बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत शब्द मागे घ्या, अशी मागणी केली. समाजाच्या नेत्यांनी स्पष्ट केले की, वंजारा आणि बंजारा हे वेगळे समाज असून त्यांची भाषा आणि संस्कृती वेगळी आहे. यापूर्वीच १९९४ मध्ये गोपीनाथ मुंडेंच्या विधानानंतर त्यांच्या ताटातील अडीच टक्के आरक्षण काढून घेतले गेले आहे. आता पुन्हा वंजारा-बंजारा एकच अशी भूमिका घेतली जाणे समाजासाठी घातक आहे. (पान २ वर)

## ..तर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही

## देवाभाऊ, आजूबाजूला काय घडते पाहा–पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** देवाभाउ तुम्ही सर्व महाराष्ट्रात तुमचे फोटो लावले. छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेत असल्याचे तुम्ही देशाला दाखवले. मात्र, देवाभाउ शेतक-यांकडे पाहायला तयार नाहीत. देवाभाउंना माझी विनंती आहे की जरा आजूबाजूला पाहा. काय घडतेय? आम्ही सत्तेचा गैरवापर करत नाहीत. पण सरकार शेतक-यांकडे दुर्लक्ष करत असेल तर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही, असा इशारा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने नाशिक येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



या मोर्चाला शरद पवार यांनी संबोधित केले. देवाभाउ शिवाजी महाराज यांच्या काळात दुष्काळ पडला होता, त्यावेळी त्यांनी सोन्याची नाणी दिली आणि सोन्याचा नांगर शेतक-यांना घेता आला, ते शेती करू शकले. आज शिवाजी महाराज यांचे नाव घेत आहात आणि बळीराजाकडे ढुंकून पाहत नाही. आपल्याला बघ्याची भूमिका घेता येणार नाही. आगामी ठराविक दिवसांत मदत केली नाही तर नाशिकचा हा मोर्चा भविष्यात आणखी उग्र रूप घेईल. देवाभाउ देशाच्या आजूबाजूला बघा काय घडत आहे. नेपाळमध्ये काय घडत आहे, ते पाहा. तेथील राज्यकर्ते गेले आणि त्या ठिकाणी एक भगिनी आली आणि तिच्या हातात तेथील सत्ता देण्यात आली. आणखी काही मी बोलणार नाही, असा सूचक इशाराही शरद पवार यांनी दिला. शेतकरी संकटात असताना मार्ग काढायची जबाबदारी (पान २ वर)

## 'देवा' जरा इकडे बघ!

### पूरस्थितीवर दानवेंचा फडणवीसांवर निशाणा




**छ. संभाजीनगर /प्रतिनिधी -**लाडकी बहीण आणि त्यानंतर मराठा आरक्षणासंदर्भात जीआर काढल्यानंतर भाजपाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देवा भाउ असा उल्लेख करत बॅनरबाजी करताना दिसत आहेत. याचपार्श्वभूमीवर विरोधक सुद्धा देवा असा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना दिसत आहेत. मुसळधार पावसानंतर जायकवाडीसह अन्य प्रकल्पांचे दरवाजे उघडल्यामुळे सध्या मराठवाड्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अंबादास दानवे यांनी मराठवाड्यातील दोन (पान २ वर)

## मूर्तिजापूर जंक्शनवर जीवघेणा अपघात

### ● प्रवासी गाडीखाली अडकला ● गॅस कटरने सुटका

**मूर्तिजापूर/प्रतिनिधीः-** मूर्तिजापूर येथील जंक्शन रेल्वे स्थानकावर आज १५ सप्टेंबर रोजी दुपारी प्रवाशांच्या सुरक्षिततेला हादरवणारी धक्कादायक घटना घडली. पुणे–अमरावती गाडीतून उतरतानाच प्रवासी मुस्ताक खान मोईन खान यांचा पाय घसरला आणि ते थेट गाडीखाली अडकले. तब्बल दीड तास जीवन आणि मरणाच्या दरम्यान अडकलेल्या प्रवाशाची सुटका गॅस कटरच्या सहाय्याने करण्यात आली.



प्राप्त माहितीनुसार, अकोल्यातील मुस्ताक खान हे आपल्या कुटुंबासह जुन्या वस्ती भागातील नातेवाईकांच्या अंत्यसंस्कारासाठी मूर्तिजापूर येथे आले होते. दुपारी पावणे चारच्या सुमारास प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर उतरताना त्यांचा तोल जाऊन अपघात झाला. घटनेनंतर रेल्वे अधिकारी व पोलिसांनी सुटकेचे प्रयत्न केले, मात्र प्रवासी एवढ्या घट्ट अडकल्याने प्रयत्न निष्फळ ठरत होते. तत्काळ जय गजानन आपत्कालीन पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने गॅस कटरच्या सहाय्याने गाडीचे पायदान कापून मुस्ताक खान यांची सुटका केली. या दरम्यान स्थानकावरील प्रवाशांचा श्वास रोखला गेला होता. सुटका होताच प्रवासी व कुटुंबीयांनी सुटकेचा श्वास सोडला. अपघातात मुस्ताक खान यांच्या दोन्ही (पान २ वर)

## राज्यात पावसाचा जोर, अनेक भाग जलमय

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. पुणे शहरात काल झालेल्या पावसाचा फटका विमानसेवेला बसला. आज सकाळी आठ वाजेपर्यंत पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरवण्यात येणारी १४ विमानं अहमदाबाद, हैदराबाद, सूरत, मुंबई या विमानतळांवर उतरवण्यात आली. तर पुणे विमानतळावरची तीन उड्डाणं माघारी उतरली. परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतरही विमानफे-यांना विलंब दिसून आला.



हवेली तालुक्यामध्ये थेउर गावात ओढ्याला पूर आल्याने अडकलेल्या दीडशे जणांना वाघोली अग्निशमन दल आणि पीडीआरएफच्या पथकांनी सुरक्षितपणे बाहेर काढलं. अहिल्यानगरमध्ये पाथर्डी तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे करंजी, मढीसह अनेक (पान २ वर)



## महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघाचा विजय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**चीनमधील हांगझोउ इथं महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय महिला हॉकी काल झालेल्या सामन्यात यजमान चीनविरुद्ध १-४ असा विजय मिळवला. रौप्य पदकावर नाव कोरत अंतिम फेरी गाठली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय महिला हॉकी संघाचे रौप्य पदक मिळवल्याबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात अभिनंदन केलं आहे. दृढनिश्चय आणि सांघिक भावना असलेल्या भारतीय महिला हॉकी संघाचा देशाला अभिमान आहे. असंही त्यांनी म्हटलं आहे.

## नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शपथविधी

**मुंबई/प्रतिनिधी :** नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली. आचार्य देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. माजी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. आचार्य देवव्रत हे २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल आहेत. त्याआधी त्यांनी हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

## तिकीटांचा काळा बाजार बंद होणार

### *पहिल्या 15 मिनिटांसाठी आता फक्त सर्वसामान्यांनाच करता येणार बुकिंग*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सामान्य प्रवाशांना दिलासा देण्यासाठी रेल्वेने एक मोठे पाउल उचलले आहे. १ ऑक्टोबर २०२५ पासून, आयआरसीटीसी वेबसाइट आणि अॅपद्वारे सामान्य आरक्षित तिकिटांचे ऑनलाइन बुकिंग आता पहिल्या १५ मिनिटांसाठी फक्त आधार प्रमाणीकरण असलेल्या वापरकर्त्यांनाच शक्य होईल. रेल्वे एजंट १० मिनिटांनंतरच बुकिंग सुरू करू शकतील. रेल्वेचा असा विश्वास आहे की याचा थेट फायदा सामान्य लोकांना होईल आणि दलाल किंवा एजंटांकडून होणारा गैरवापर थांबेल. रेल्वेने स्पष्ट केले आहे की पीआरएस काउंटरवरून तिकीट बुकिंगच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पूर्वीप्रमाणेच प्रवाशांना सामान्य वेळेत काउंटरवरून तिकीट मिळू शकेल. तसेच, अधिकृत तिकीट एजंटवर आधीच लादलेली १० मिनिटांची मर्यादा कायम राहील. म्हणजेच, बुकिंग सुरू झाल्यानंतर पहिल्या दहा मिनिटांत एजंट तिकिटे बुक करू शकणार नाहीत. रेल्वेचे म्हणणे आहे की (पान २ वर)



## प्रधानमंत्री/महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मिळणार 2399 प्रकारचे उपचार

**मुंबई/प्रतिनिधी :** आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये राज्यात नवीन २३९९ उपचारांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच पाच लाखांपेक्षा जास्त रक्कमेच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी कार्पस फंड निर्माण करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली. या एकत्रित योजनेच्या अंमलबजावणीच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्याकरीता गठित राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या नियामक परिषदेची बैठक वर्षा या शासकीय निवासस्थानी झाली. त्यावेळी हे निर्णय घेण्यात आले.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे उपस्थित होते. तर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य या दोन्ही योजनेत सुचीबद्ध असलेल्या रुग्णालयाची तालुकानिहाय मॅपिंग करावे. संबंधित तालुक्यात ३० खाटांचे एकही रुग्णालय नसल्यास अशा ठिकाणी उपलब्ध असलेल्या रुग्णालयात योजनेचा लाभ देउन त्यांच्या देयकाच्या अदागीची वेगळी व्यवस्था निर्माण करावी. तसेच अशा तालुक्यामध्ये ३० खाटांचे रुग्णालय सुरु (पान २ वर)

## विकसित महाराष्ट्र 2047 चे व्हिजन डॉक्युमेंट तयार

**मुंबई/प्रतिनिधी :** विकसित महाराष्ट्र-२०४७ चे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. सर्व क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींशी सल्लामसलत करून तसेच नागरिकांच्या सूचनांचा समावेश करून अंतरिम मसुदा तयार केला आहे. या मसुद्याची छाननी करून तो अंतिम करण्यासाठी राज्य सरकारने मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह आठ सनदी अधिका-यांची कोअर (गाभा) समिती स्थापन केली आहे. या समितीला येत्या चार दिवसांत म्हणजेच १९ सप्टेंबर पर्यंत मसुदा अंतिम करण्यास सांगण्यात आले आहे. राज्याला २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र करण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समावेश असलेले व्हिजन डाक्युमेंट तयार करण्यात येत आहे. या व्हिजन डाक्युमेंटमध्ये जनसामान्यांच्या संकल्पनांचे प्रतिबिंब असणार आहे. विकसित महाराष्ट्राची संकल्पना मूर्त स्वरूपात मांडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचबरोबर व्हिजन डाक्युमेंट तयार करण्यासाठी क्षेत्र निहास १६ गट स्थापन करण्यात आले आहेत. प्रत्येक गटासाठी संयोजक नेमण्यात आले होते. या संयोजकांनी सर्व विभागाच्या प्रशासकीय विभागाचे प्रधान सचिव, सचिव, अपर मुख्य सचिव तसेच संबंधित क्षेत्रातल तज्ज यांच्याशी सल्लामसलत करून तसेच नागरिक सर्वेक्षणाद्वारे प्राप्त सूचनांचा समावेश करून व्हिजन डाक्युमेंटचा अंतरिम मसुदा तयार केला आहे.



**कोअर समिती-** मसुद्याची छाननी करुन तो अंतिम करण्यासाठी राज्य सरकारने आठ सनदी अधिका-यांची कोअर (गाभा) समिती स्थापन केली आहे. यामध्ये मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह मित्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा, मुख्यमंत्र्यांच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उद्योग विभागाचे सचिव अनबलगन आणि मुख्यमंत्र्यांचे सल्लागार श्रीराम वेदिरे यांचा समावेश आहे.

**पीएमआरडीए साठीही ग्रोथ हब समिती-** पुणे महानगर प्रदेश आर्थिक बृहत आराखडयाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी पीएमआरडीएला अंमलबजावणी (पान २ वर)

## लष्कराच्या डेपोत स्फोट; मुलाचा मृत्यू

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात लँडमाईनच्या स्फोटात गंभीर जखमी झालेल्या एका १७ वर्षीय मुलाचा सोमवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत मुलाचे नाव शाहिद युसूफ आहे. रविवारी खुंद्रू येथील शस्त्रसाठा डेपोजवळ झालेल्या स्फोटात तो गंभीर जखमी झाला होता. यानंतर त्याला तातडीने श्रीनगर येथील ९२ बेस रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. हा स्फोट नेमका कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शाहिदचा पाय लँडमाईनवर पडला होता की, हा स्फोट अन्य कोणत्या कारणाने झाला, याचा तपास अधिकारी करत आहेत. या घटनेने परिसरात पुन्हा एकदा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे तेथे सुरक्षा व्यवस्था मोठ्या प्रमाणात वाढविण्याची मागणी स्थानिकाकडून होत आहे.






जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# युवकाचा धारधार शस्त्राने केला खून

## खंडाळा जंगलातून २ तासांत आरोपी जेरबंद! पोलीसांची धडाकेबाज कारवाई

**पुसद/प्रतिनिधीः-** खंडाळा पोलीस स्टेशन हद्दीत काल दुपारी घडलेल्या थरारक खुनाच्या घटनेने परिसर हादरला होता. मौजे आडगाव फाटा येथे शेख इरफान ऊर्फ अप्पू (वय अंदाजे ३०, अमृतनगर) यास काही इसमांनी धारधार शस्त्राने ठार मारल्याची घटना उघडकीस आली. घटनेनंतर अवघ्या दोन तासांत स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळने जंगल भागात सापळा रचून दोन्ही आरोपींना अटक केली.फिर्याद बेगम बी शेख इरफान यांनी दिली असून खंडाळा पोलीस स्टेशनमध्ये कलम १०३, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५१(२), ३५१(३) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीवरून आरोपी शेख बरकत शेख मुसा (वय ३६) आणि शेख सबद्र शेख कुरबान (वय २२), दोघेही अमृतनगर येथील, खंडाळा घाटातील जंगलात लपून बसल्याचे समजले. पोलीसांनी पाठलाग करून त्यांना अटक केली.प्राथमिक चौकशीत आरोपींनी कबूल केले की, मृत इसम गेल्या महिन्याभरापासून शिवीगाळ व दमदाटी करत होता. घटनेच्या दिवशीही कोणतेही कारण नसताना शिवीगाळ करून महिलांना त्रास दिला. संतापून आरोपींनी चाकूने वार करून खून केल्याचे मान्य केले.दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी खंडाळा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय अधिकारी हर्षवर्धन बी.जे., पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. धिरज बांडे आणि संपूर्ण पथकाने कुशलतेने पार पाडली.



# तहसीलच्या पायऱ्यावर शेतकऱ्यांनी फेकले सोयाबीन

## नुकसान भरपाई तातडीने देण्याची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः-

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. तिवसा तालुक्यात सोयाबीन व कपाशी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून नुकसान भरपाई तातडीने देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी तिवसा तहसील कार्यालयाच्या पायऱ्यावर खराब झालेले सोयाबीन फेकून सरकारचा निषेध केला. सोयाबीन व कपाशीच्या नुकसानामुळे शेतकरी संकटात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे... सरकार होश मे आओ.. अशा जोरदार घोषणा देत आपला संताप व्यक्त केला. अतिवृष्टी मुळे जमिनीत पाणी साचून पिके सडलेली आहे. उत्पादनावर संपूर्ण परिणाम झाला आहे. सोयाबीन आणि कपाशी दोन्ही पिकांचे प्रचंड नुकसान झाले असताना अद्यापही संयुक्त अहवाल तयार करून नुकसान भरपाई बाबत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांनी मागणी केली आहे की दिवाळीपूर्वी त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तिवसा व वरखेड महसूल मंडळातील शेकडो शेतकरी या आंदोलन सहभागी झाले होते.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एस.एस.भिंगरदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज -१९२२/२०२५
श्री.व्यंकट अधिक तिन विरुध्द निरंक
पुढील तारीख २५.०९.२०२५

अर्जदार :
1) Vyankat Uttamrao Dakhane, **Age 72 yrs., Occu.- Nil R/o. Kaushik Vihar, Mohan Nagar, V.M.V. Amravati, Tq. & Dist. Amravati**
2) Nitin Vyankat Dakhane, **Age 46 yrs., Occu.- Private Service R/o. Jawahar Nagar Road, Near Mohan Nagar, Kaushik Vihar, Amravati, Tq. & Dist.Amravat** (Son of deceased)
3) Mr.Shilpa Vilas Meshram, **Age 42 yrs., Occu.- Household R/o. C/o. Vilas Meshram, Dhamangaon Road, Behind Cotton Market, Vanjari fail, Yawatmal, Tq. & Dist. Yavatmal** (Married daughter of deceased)
4) Mrs. Dipali Virendra Sursaut, **Age 39 yrs., Occu.- Household, R/o. Virendra Sursaut, Narayan Nagar, Tiwsa, Tq. Tiswa, Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की**, मयत मंदाबाई वेंकटराव दखाने हया दि.०६.०१.२०२५ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार व्यंकट अधिक तिन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री व्यंकट अधिक तिन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०३.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.५७२/२०२५** **ने.ता. ०१.११.२०२५**

अर्जदार :
१) भिरु जयराम काकडे, **वय ६७ वर्षे, धंदा - मजुरी**
२) नायरु जयराम काकडे, **वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी**
३) संतोष जयराम काकडे, **वय ४९ वर्षे, धंदा - मजुरी**
४) कांता लालचंद जावरकर, **वय ५७ वर्षे, धंदा -घरकाम**
५) अनिता गणेश लोखंडे, **वय वर्षे, धंदा - घरकाम**
**अर्जदार क्र.१ ते ४ रा.कारंजा बहिरम, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**अर्जदार क्र.५ रा.गणेशपुर चिंचकुंभ, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निल

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मय्यत जयराम कालु काकडे हे दि.०४/०८/२०१९ **रोजी कारंजा बहिरम, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू पावले. तसेच** मय्यत मंगराय जयराज काकडे हे दि.०४/०२/२००८ **रोजी कारंजा बहिरम, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू पावले.त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.**

**अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.**त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.५७२/२०२५ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.**१०.०९.२०२५ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.२१६/२०२५** **ने.ता. १६.०९.२०२५**

अर्जदार :
१) कुंदा शंकरराव वानखडे, **वय ७९ वर्षे, धंदा - शेती रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
२) नूतन ललित वानखडे, **वय ३८ वर्षे, धंदा - शेती रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
३) विराज ललित वानखडे, **वय ०७ वर्षे, रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती तर्फे अज्ञान पालनकर्ता आई नूतन ललित वानखडे**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक ललित शंकरराव वानखडे यांचा मृत्यू दि.१८/११/२०२४ **रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच** मृतक शंकरराव मोतीराव वानखडे **यांचा** मृत्यू दि.१६/०४/२०१७ **रोजी रा.तळवेल, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूदार अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.**

**अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.**त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.२१६/२०२५ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.**०२.०८.२०२५ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

पान १ व १० वरून

## ‘बंजारा आणि वंजारा

'परत तो खेळ आमच्यासोबत होउ नये, वक्तव्य मागे घ्यावे', अशी मागणी समाजाने यावेळी केली.

***धनंजय मुंडे नेमकं काय म्हणाले?-*** धनंजय मुंडे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, 'बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळावे यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या मागणीबाबत सकारात्मकता दाखवली आहे. अभ्यासगट वा समिती नेमून सरकार आरक्षण देउ शकते. हैद्राबाद गॅझेटनुसार अनेक समाज एसटीमध्ये आहेत, तेलंगणातसुद्धा आमच्या नोंदी आहेत. त्यामुळे बंजारा आणि वंजारा एकच आहेत. यानंतर मोर्चात काही वेळ संतापाची लाट उसळली. तरुणांनी धनंजय मुंडेंना आपले शब्द मागे घेण्याची मागणी केली.

## ..तर आम्हाला बघ्याची भूमिका

सरकार घेत नाहीमहाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गेल्या दोन महिन्यांत दोन हजार पेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी जीव का देतो? शेतकरी एवढी टोकाची भूमिका का घेतो? याचं कारण शेतक-यांच्या संटकाच्या काळात मार्ग काढण्याची जबाबदारी सरकार घेत नाही, या शब्दांत शरद पवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. तसेच सरकारने शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेतले नाहीत, शेतक-यांना मदत केली नाही तर आज नाशिकचा हा मोर्चा फक्त सुरूवात आहे. ही सुरूवात येथेच थांबणार नाही. महाराष्ट्राच्या जवळपास सर्व जिल्ह्यात या वर्षी अतिवृष्टी झाली आहे. याचा परिणाम शेकर-यांवर झाला आहे. संकट येत असतात. त्यावर मार्ग काढायचा असतो. ही जबाबदारी राज्य सरकार आणि केंद्र सरकारची असते. मात्र, आपण आज पाहतो की शेतक-यांकडे पाहायला आजच्या राज्यकर्त्यांना वेळ नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली.

***...तर या सरकारवर दबाव आणला पाहिजे***

आज नाशिकचा कांदा जगात जातो. शेतक-यांना इच्छा असते की, कांदा विकल्यानंतर दोन पैसे मिळतील. ज्यामुळे मुलीचे लग्न, मुलांचे शिक्षण करता येईल. मात्र, केंद्र सरकारने निर्यात बंदी केली, त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. या सरकारला शेतक-यांच दुख समजत नाही. आज कांद्याला दर नाही. कांदा निर्यात करा, त्यामुळे दर वाढतील. मात्र, केंद्र सरकार कांदा निर्यात करत नाही. मग शेतक-यांनी करायचे तरी काय? यावर उत्तर शोधायचे असेल तर या सरकारवर दबाव आणला पाहिजे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

## ‘देवा’ जरा इकडे

पुराचे फोटो ट्वीट करताना देवा जरा इकडे बघ, असा टोला लगावला आहे. त्यांनी असेही म्हटले की, देवाने हे दिले, देवा ने ते दिले, असा गजर सध्या गल्लीगल्लीतून भाजपायी भक्तगण अगदी सूर्योदयापासून करताना दिसतात. कचराकुंडी लगतच्या भिंती ते बहुमजली इमारती अश्या सगळ्या ठिकाणी या देवाचे फोटो लागले आहेत. ज्या शिवरायांच्या पायावर यांचे देवाभाउ फुले वाहताना दिसतात, त्यांनी कधी आपली प्रजा वा-यावर सोडली नाही. त्यामुळे नुसती फुले वाहून चालत नसते, तर विचार कृतीत उतरवावे लागतात.गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये जोरदार पाउस बरसला आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १० आणि विभागातील एकूण ३२ सर्कलमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. तसेच जायकवाडीसह अन्य प्रकल्पांचे दरवाजे उघडल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे.

## राज्यात पावसाचा जोर,

गावांचा संपर्क तुटला असून अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं आहे. कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, बारामती-छत्रपती संभाजीनगर काही राज्य महामार्ग तसंच पाथर्डी-बीड राज्य महामार्ग बंद करण्यात आले आहेत.सांगली शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाउस झाल्याने अनेक सखल भागात पाणी साचलं आहे. काढणीला आलेल्या सोयाबीन आणि उडीद पिकाचं नुकसान झालं आहे.लातूर जिल्ह्यात संततधार पावसामुळे तेरणा धरणाचे १२ दरवाजे तर मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडले असून नदीकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. औसा तालुक्यात उजनी गावामध्ये तेरणा नदीच्या पुराचे पाणी घुसल्याने काही जणांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. नदीकाठच्या शेतातही पुराचं पाणी घुसल्याने पिकांचंही मोठं नुकसान झालं आहे.बीड जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक मोठ्या प्रकल्पांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे नद्यांना पूर येउन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तर सात गावांमध्ये मिळून ५१ जण पुरात अडकले असून त्यांच्या सुटकेसाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण करण्यात आलं आहे. आष्टी तालुक्यात ५ ते ६ गावं पूर्णपणे पाण्याखाली गेली असून हवाई दलाच्या मदतीने गावांतल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं जात आहे. जालना जिल्ह्याच्या बहुतांश भागात आजही जोरदार पाउस झाल्याने पिकं पाण्याखाली गेली आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागपूर जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक संकटात नागरिकांना तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. राज्यात परतीच्या पावसामुळे खरीपाचा हंगाम वाया गेला असून सरकारने बाधित शेतक-यांना सरसकट ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

## विकसित महाराष्ट्र 2047 चे

प्राधीकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच महानगर आयुक्त पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधीकरण पुणे यांच्या अधिपत्याखाली दैनंदिन कामकाज हाताळण्यासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने प्रकल्प अंमलबजावणी युनिट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पुणे महानगर प्रदेश आर्थिक बृहत आराखडयाचे नियोजन व अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रोथ हब समिती स्थापन करण्यात आली आहे.

## प्रधानमंत्री/महात्मा ज्योतिराव

करण्यासाठी खासगी रुग्णालयांना आमंत्रित करून सुविधा द्याव्यात. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी ग्रामीण भागात आरोग्य मित्रांची संख्या वाढवावी असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**ॲप तयार करून चॅटबटद्वारे माहिती**

जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयाना त्यांची देयके वेळेत देण्यात यावेत. जेणेकरून ती रुग्णालये रुग्णांना दर्जेदार उपचार देतील. तसेच या योजनेतील उपचार, रुग्णालये, लाभ यांची माहिती मिळण्यासाठी एआय आधारित ॲप तयार करावे. त्यामध्ये चॅटबक्टद्वारे सर्व माहिती मिळण्याची व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने गेल्या सहा महिन्यात अत्यंत गतीने कामात सुधारणा करून उत्तम काम केले आहे. योजनेच्या अंमलाबजावणीसाठी अधिक गतीने व पारदर्शकपणे काम करावे, जेणेकरून पुढील काळात देशातील पहिल्या तीनमध्ये राज्याचा क्रमांक येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**पाच लाखांपेक्षा जास्तीच्या उपचारांसाठी कर्क्मस निधी**

पाच लाखांपेक्षा जास्त रक्कमेच्या उपचारांसाठी वेगळा कर्क्मस निधी उभारण्याचा व या निधीतून हृदयप्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, किडनी प्रत्यारोपण, बोन मॅरो प्रत्यारोपण आदी यासह ९ विविध उपचारांची शिफारस यावेळी मान्य करण्यात आली.

## तिकीटांचा काळा बाजार बंद

हे पाउल सामान्य वापरकर्त्यांसाठी आहे, जेणेकरून बुकिंग सुरू झाल्यावर त्यांना प्राधान्याने तिकिटे मिळू शकतील. ब-याचदा सुरुवातीच्या काही मिनिटांत एजंट्सद्वारे मोठ्या संख्येने तिकिटे बुक केली जात होती, ज्यामुळे सामान्य प्रवाशांना अडचणी येत होत्या. विशेषतः सणासुदीच्या काळात असे दिसून आले की वाट पाहत असलेले तिकिटे देखील १ मिनिटात संपत असत. आता आधार प्रमाणीकरण अनिवार्य केल्याने पारदर्शकता वाढणार नाही तर ख-या गरजू प्रवाशांनाही सहज तिकिटे मिळू शकतील.

**फक्त पहिल्या १५ मिनिटांसाठी आधार प्रमाणीकरण**

रेल्वेने असेही स्पष्ट केले आहे की आधार प्रमाणीकरण फक्त पहिल्या १५ मिनिटांसाठी आवश्यक असेल. त्यानंतर, सर्व वापरकर्ते पूर्वीप्रमाणे आधार लिंकशिवाय तिकिटे बुक करू शकतील. प्रवाशांचा असा विश्वास आहे की हा निर्णय योग्य वेळी घेण्यात आला आहे. सण आणि सुट्ट्यांच्या काळात तिकिटांची मागणी अचानक वाढते, अशा परिस्थितीत सुरुवातीच्या काही मिनिटांत तिकिटे खरेदी करण्याची संधी मिळणे सामान्यांसाठी मोठा दिलासा ठरेल.

## मूर्तिजापूर जंक्शनवर जीवघेणा

पायांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, या घटनेमुळे पुणे–अमरावती गाडी तब्बल एक तास वीस मिनिटे थांबून राहिली. परिणामी इतर प्रवाशांमध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाला. अचानक घडलेल्या या प्रसंगाने रेल्वे सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रवासी वर्गातून मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

## जिल्ह्यात मुसळधार पावसासह

नाल्यांमधला कचरा रस्त्यावर पसरल्याने रस्त्यांवर घाण पसरली. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला.

## गायवाडीत राहत्या घरावर

केला आहे. यावेळी अंदाजे २० ते २५ नागरिकांच्या घरातील टिव्ही, इन्व्हर्टर,पंखे, घरगुती पाण्याच्या मोटारी,फ्रीज आदी विद्युत उपकरणे जळून निकामी झाल्याचे निदर्शनास आले आहे. एकंदरीतच १५ ते २० लाखांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. नुकसान ग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी गायवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

**खरीपात सततचा पाऊस-** कपाशी पिकाला उन्हाची गरज असतांना सततच्या पावसामुळे पिके पीवळी पडून वाढ खुंटली आहे. कपाशीला माल धरत नाही आहे. तुरीचे पिक पुर्णतः जळाले असल्याचे चित्र आहे. सोयाबिनच्या शेंगा पोचट असून काही शेतकऱ्यांचा काढणीस आलेल्या सोयाबिन पिकास पावसामुळे अडथळा निर्माण झाला आहे. खरीप हंगामात उत्पादनात मोठी घट होणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला असून शेतातील साचलेले पाणी डोळ्यासमोर दिसत आहे. या बिकट परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देणार का ? हा प्रश्न आहे.

**थिलोरीत लेंडी नाल्याला पुल-** शनिवारच्या पावसाने थिलोरी येथील लेंडी नाल्याला पुर आल्यामुळे गावात पाणी शिरले होते. मात्र कुणाच्याही घरात पाणी शिरले नाही, अशी माहिती महसूल प्रशासनाने दिली आहे. लेंडी नाल्यालगतच्या शेत पिकांचे मात्र नुकासान झाले असून पंचनामा करण्यात येणार आहे. मागिल महीन्यात झालेल्या संततधार पावसामुळे लेंडी नाल्याला पुर येऊन काही रहिवासी घरात पाणी शिरले होते. झालेल्या नुकसानीचे प्रशासनाने तातडीने पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

## माजी आमदार राजकुमार पटेल

होत्या. अशात ते आता काँग्रेसमध्ये प्रवेश घेत आहे. जिल्हा परिषद, नगरपंचायत व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकुमार पटेल यांनी प्रवेश केल्याने मेळघाट मध्ये परिवर्तन घडू शकते अशी चर्चा आहे.

## अमरावतीत चरस विक्रीचा

प्रतीक पुनटकरला घटनास्थळीच पकडले. त्याच्या बॅगेची तपासणी केली असता अमली पदार्थ आढळून आला. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ९८० ग्रॅम चरस (किंमत सुमारे २ लाख ८५ हजार रुपये) आणि मोबाईल मिळून ३ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एपीआय वैशाली चव्हाण यांच्या फिर्यादीवरून प्रतीक पुनटकर व फरार आरोपी यामिन खानविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत वरिष्ठ पीआय हनुमंत उरलागोंडावर, डीबी प्रमुख गजानन विधाते, एपीआय वैशाली चव्हाण, राजेंद्र पिंपळे, शफी, कुणाल, शेखर, दानिश शेख, राहुल रोडे व सागर पंडित यांनी सहभाग घेतला.

## राष्ट्रीय लोक अदालतीत ६७७७

प्रकरणांपैकी २,०४३ निकाली निघाले. ८ ते १२ सप्टेंबरदरम्यानच्या विशेष मोहिमेत १,६८० प्रकरणांचा निपटारा झाला. असे एकूण ६,७७७ प्रकरणे निकाली निघाले असून, यामध्ये तडजोडीची रक्कम २६,९७,४६,००८ रुपये इतकी आहे. या लोक अदालतीतील सर्वात महत्त्वाचा निकाल मोटार अपघात प्रकरणाशी संबंधित होता. गायत्री व इतर दोन विरुद्ध सुधीर राठोड, इंद्रजित कन्स्ट्रक्शन व चोलामंडलम जनरल इन्शुरन्स या प्रकरणात अर्जदारास तब्बल ६० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. हा निकाल पॅनल क्र. ०१ मध्ये जिल्हा न्यायाधीश (०१) ए.डी. रामटेके व अधिवक्ता संदीप रंगारी यांच्या देखरेखीखाली देण्यात आला. या लोक अदालतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती व अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती प्रविण एस. पाटील यांच्या हस्ते झाले. आयोजनात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष सुधाकर वें. यार्लगड्डा, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, सचिव डी.एस. वमने, न्यायाधीश वर्ग, जिल्हा वकिल संघ अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख तसेच जिल्ह्यातील वकिल व सरकारी वकिल संघातील सदस्यांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय लोक अदालतीमुळे हजारो नागरिकांना न्याय मिळाला, तर अनेकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक दिलासा मिळून न्यायाच्या दारात तडजोडीने समाधान हा संदेश जिल्हाभरात पोहोचला.

## अंजनगाव सुर्जी येथील

शकील डॉन फरार आहे, ज्याचा अंजनगाव पोलिस सक्रियपणे शोध घेत आहेत. न्यायालयाने आरोपींला १६ सप्टेंबरपर्यंत पीसीआर दिला. सदर आरोपी मार्फत जिल्हाभरात केलेल्या चो-या उघडकीस येण्याची शक्यता आहे. अंजनगाव पोलिसांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणि उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे, पोलिस अधिकारी सूरज बोंडे आणि उपपोलीस अधिकारी सूरज तेलगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक भरत चिर्डे तपास करत आहेत.

## गणपती विसर्जन मिरवणूक

घेऊन मित्र अभिजित तिवारी सोबत गेले होते. गाडी जिल्हा परिषद शाळेच्या कंपाऊंड जवळील नाश्त्याच्या गाडीसमोर पार्क केली. काही वेळानंतर विसर्जन मिरवणूक पाहून परत आल्यानंतर गाडी पार्किंग केलेल्या ठिकाणी दिसली नाही. म्हणून मित्र अभिजित व इतर मित्रांच्या सहकार्याने गाडीचा शोध घेतला तसेच सोशल मीडिया मेसेज टाकून इतरांना सूचना ही दिली. परंतू गाडी कुठेच मिळाली नसल्याने नितिन गोखले यांनी दि.१४ सप्टेंबर रविवार रोजी चांदूररेल्वे पोलिसात फिर्याद दाखल केली. चांदूररेल्वे पोलिस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी पुढील तपास करीत आहे.

## लाखणवाडी–कविठा रस्त्याची

मागणीसाठी काँग्रेसतर्फे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, रस्त्यावरील खोल खड्ड्यांमुळे नागरिकांना पायदळ चालणे कठीण झाले असून वाहतुकीची कोंडी व अपघाताची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. तालुका काँग्रेस ग्रामीण अध्यक्ष नामदेवराव तनपुरे यांनी सांगितले की, ‘संत गुणवंत महाराज जयंती उत्सवाच्या आधी जर रस्त्याची दुरुस्ती झाली नाही, तर भाविकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होईल. प्रशासनाने तातडीने काम हाती घ्यावे.’ या निवेदनावेळी सचितनंद बेलसरे, राहुल गाठे, योगेश देशमुख, भूषण देखमुख आदी काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. जनतेच्या सोयीसाठी व अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

## बेलपुरा परिसरात बाप आणि

मात्र आदित्यची जखम गंभीर असल्याने त्याला खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. घटना झाल्याची माहिती राजापेठ पोलीस स्टेशनला मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले व जखमींचे बयान घेत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जखमींच्या माहितीप्रमाणे, नवरात्री महोत्सवाच्या तयारीदरम्यान दरवर्षी जेथे दुर्गादेवी बसवली जाते त्या ठिकाणी राहणाऱ्या या कुटुंबातील सदस्याने विरोध दर्शवला होता. या प्रकरणाचा पुढील तपास राजापेठ पोलीस करत आहेत.

## बडनेरात कुत्र्यावरून दोन गटात वाद

अधिकच गंभीर होत असल्याचे लक्षात येताच पोलिस उपायुक्त गणेश शिंदे स्वतः घटनास्थळी पोहोचले. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून शांतता राखण्याचे आवाहन केले. त्यांच्या समुपदेशनामुळे तणाव हळूहळू निवळला. या घटनेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण पसरले होते. परंतु, पोलिसांच्या योग्य वेळी केलेल्या हस्तक्षेपामुळे मोठा अनुचित प्रकार टळला. दरम्यान, पोलिसांनी दोन्ही गटातील संबंधित व्यक्तींना समज दिली असून पुढील वाद टाळण्यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. कुत्र्याच्या किरकोळ कारणावरून वादाला मोठे स्वरूप मिळाल्याने नागरिकांनी संयम बाळगावा, लहानशा कारणावरून हिंसाचाराचा मार्ग अवलंबू नये, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

## विभागात १७ सप्टेंबरपासून

आयुक्त अजय लहाने, सुरज वाघमारे, सहआयुक्त पाणबुडे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त तुकाराम टेकाडे, वैशाली पाथरे तसेच विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून यावेळी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी राज्य शासनाच्या ‘सेवा पंधरवडा’ राबविण्यामागची रुपरेषा स्पष्ट केली. त्या म्हणाल्या की, हा ‘सेवा पंधरवडा’ तीन टप्प्यात राबविण्यात येणार असून यामध्ये प्रामुख्याने पहिल्या टप्प्यात पाणंद रस्ते विषयक मोहीम, दुसऱ्या टप्प्यात ‘सर्वांसाठी घरे’ उपक्रम आणि तिसऱ्या टप्प्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यातील उपक्रम यापूर्वीपासून सुरू असले तरी या कालावधीत सदर उपक्रमांची युद्धपातळीवर मोहीम स्वरूपात अंमलबजावणी करावी. यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, जिवंत सातबारा मोहीम, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, विमुक्त जाती व भटक्या जमाती सवंर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, हरित महाराष्ट्र वृक्ष लागवड मोहिम, संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना, लोकअदालत, धरती आबा अभियान आदी उपक्रम प्रभावीपणे राबवावेत, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी केल्या.

विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी सांगितले की, शासन निर्णयानुसार सेवा पंधरवडा तीन टप्प्यांमध्ये राबविला जाणार आहे. पहिला टप्पा - पाणंद रस्ते विषयक मोहिम असून दि.१७ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविला जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात ‘सर्वांसाठी घरे’ उपक्रम दि. २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान राबविण्यात येणार आहे. तिसऱ्या टप्प्यात स्थानिक परिस्थितीचा विचार करुन नावीन्यपूर्ण उपक्रम दि. २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात यावा. या कालावधीत स्थानिक गरजा व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या. नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत आदिसेतू, महाराजस्व अभियान विभागातील पाचही जिल्ह्यांत आयोजित करण्यात येणार आहेत. आदिसेतू उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त स्वत: जिल्ह्यातील गावांना भेटी देऊन तेथील विकासप्रकल्पांची पाहणी करणार आहेत, अशी माहिती आढावा बैठकीत देण्यात आली.

## विभागात बिंदुनामावली

https://amravatidivision.gov.in या विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

## अतिक्रमण प्रकरणावर आयुक्तांकडून

यासंदर्भातील माहिती अधिकार कायद्यानुसार मिळवलेले सर्व दस्तऐवज मनपा आयुक्त यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.या गंभीर प्रकरणाची दखल घेत आयुक्त यांनी तातडीने आज दुपारी ३.३० वाजता तज्ज्ञांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेण्याचे आदेश दिले. या बैठकीत संपूर्ण प्रकरणाची तपासणी करून प्रभावी तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, संबंधित अपंग नागरिकांचे हक्क, सुरक्षितता आणि सन्मान अबाधित राहण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्यात येतील, असे स्पष्ट करून आयुक्तांनी जनतेला दिलासा दिला.

या भेटीदरम्यान शिवसेना अमरावती शहरप्रमुख प्रवीण हरमकर व इतर पदाधिकाऱ्यांनी आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या संपूर्ण घटनेवर आणि पुढील कारवाईवर आम्ही लक्ष ठेवून आहोत,असेही प्रविण हरमकर यांनी सांगीतले.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ मंगळवार, १६ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# घरकुल योजना मस्टरचे अनुदान जमा करण्यास टाळाटाळ

## मस्टरवरिल देयके प्रलंबीत; कोलार येथील लाभार्थ्यांचे निवेदन

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

**तालुक्यातील कोलार येथील विविध घरकुल योजनेचे घरकुलाचे बांधकाम पूर्ण होऊनही मस्टर नुसार दिला जाणारा हप्ता जमा करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच सदर रक्कम तात्काळ आमच्या खात्यात जमा करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा येथील नागरिकांनी मानोरा गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.**



निवेदनात म्हटले आहे की, निवेदन करते हे कोलार येथील रहिवासी असून शासनाच्या शबरी घरकुल योजना, रमाई घरकुल योजना व पंतप्रधान आवास योजनेचे लाभार्थी आहे. घरकुल योजनेचा काही लाभांश रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मस्टरनुसार दिला जातो. मात्र योजनेअंतर्गत अनेकांचे घरकुलाचे काम पूर्ण झाले.

मात्र मस्टर वरील देयक देण्यास संबंधितांकडून टाळाटाळ केली जात आहे याबाबत अधिक विचारणा केल्यास अधिकाऱ्यांकडून उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहे. अनेकांना तुमचा आयडी चुकीचा आहे तुमच्या कामाची सीसी करण्यात आली आहे आता तुम्हाला रक्कम मिळणार नाही असे सांगितले जात असून रक्कम देण्यास टाळाटाळ केली जात आहे.

घरकुलाच्या मस्टरवरिल बिला करिता लागणारे कागदपत्रे यापूर्वीच संबंधित रोजगार सेवकाकडे देण्यात आली आहे .तरीसुद्धा मागील दोन-तीन वर्षापासून अनेकांचे मस्टर वरील घरकुलाचे अनुदान रक्कम जमा झालेली नाही. याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती मानोरा यांनी योग्यरीत्या चौकशी करून आम्हा लाभार्थ्यांना न्याय द्यावा अन्यथा आम्हाला पंचायत समिती कार्यालयास स्मारक बेमुदत उपोषण करावे लागेल असा इशारा मानोरा गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून लाभार्थी यांनी केला आहे

निवेदनावर लाभार्थी अनंता रामजी ठाकरे, गुलाब पांडे, अनिल काटोले, नंदू सातपुते ,देवराव सातपुते, नंदू अलोने, आकाश मनवर ,राम मनवर, श्रीकृष्ण डापसे, चंद्रशेखर डोंगरे, अरविंद डोंगरे, रमेश डफळे, रामहरी भवाळ ,किशोर भवाळ, रामेश्वर भवाळ, शालिग्राम डफडे ,अक्षय सोनटक्के ,महादेव गावंडे, रामदास गावंडे ,नलूताई रमेश ठाकरे ,नारायण डोलारकर, महादेव डोलारकर, उमेश जंगले, अन्नपूर्णा ठाकरे, महादेव अंबोरे, ज्योत्स्ना सावळे ,लोमेश कुंडलिक ठाकरे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानांतर्गत आरोग्य शिबिरांना महिलांचा प्रतिसाद आवश्यक

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**



महिलांचे आरोग्य हे संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या आरोग्याशी थेट जोडलेले आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे , सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि जिल्हा रुग्णालये येथे या अभियानांतर्गत आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

या शिबिरांमध्ये महिलांसाठी प्रतिबंधात्मक, आरोग्यवर्धक आणि उपचारात्मक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातील. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य रोगांची तपासणी केली जाणार आहे. तसेच रक्तक्षय (?निमिया) तपासणी, क्षयरोग व सिकल सेल तपासणी, गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व काळजी , माता व बाल संरक्षण कार्ड वितरण, तसेच लसीकरण सेवा पुरविण्यात येतील. महिलांसाठी पोषण, मासिक पाळीची स्वच्छता व निरोगी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन होणार असून, रक्तदान शिबिरे व मानसिक आरोग्याबाबत समुपदेशनही करण्यात येईल. याशिवाय आयुष्मान भारत, आभा कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना यांसाठी नोंदणी व मदत डेस्कही उपलब्ध राहील. जागरूकता वाढविण्यासाठी शिबिरांच्या आयोजनात लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. खासदार, आमदार, सरपंच आणि स्थानिक नेते यांना उद्घाटन कार्यक्रमासाठी व लाभार्थ्यांना कार्ड वितरणासाठी आमंत्रित करण्यात येईल. समुदायातील प्रत्येक महिलेला शिबिराची माहिती मिळावी यासाठी घराघरात जाऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे.दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा कृती दलाच्या बैठकीत या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्यांनी महिलांनी मोठ्या संख्येने शिबिरात हजेरी लावून आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले.हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित नसून महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी सजग करण्याचे व त्यांना सशक्त बनविण्याचे महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

## श्री वत्सगुल्म सार्वजनिक जगदंबा उत्सव मंडळाची कार्यकारणी गठीत



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शहरातील माहुरवेश भागात स्थापन होणाऱ्या आणि नवसाची मोठी देवी म्हणून नावलौकीक असणाऱ्या श्री वत्सगुल्म सार्वजनिक जगदंबा उत्सव मंडळाची कार्यकारणीची बैठक गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी माहुरवेश येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मैदान परिसरात घेण्यात आली.

यावेळी मंडळाची कार्यकारणी स्थापनेवर विचारविनिमय करण्यात आले. तसेच नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजीक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. यावेळी पुढीलप्रमाणे श्री वत्सगुल्म सार्वजनिक जगदंबा उत्सव मंडळाची कार्यकारणी संस्थापक अध्यक्ष भगत धामणे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी न.प. सदस्य उमेश मोहळे यांच्या उपस्थितीत गठीत करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्ष श्रावण खडसे, उपाध्यक्ष सावन ठाकुर, कोषाध्यक्ष दिपक साठे, सचिव महादेव हरकळ, धिरज बढेल, तुषार खडसे, कार्याध्यक्ष राजेश विश्वकर्मा, प्रसिद्धीप्रमुख रवि खडसे, सदस्यपदी प्रशांत खरे, महादेव आमटे, अंबादास जोगदंड, अनिल रणबावळे, शिवाजी कांबळे, शैलेश खडसे, महादेव गायकवाड, टारजन आदींची निवड करण्यात आली.

## तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत घवघवीत कामगिरी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

समाजकल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, तुळजापूर (ता. मंगरुळपीर, जि. वाशीम) येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली आहे.

वयोगट १४ आतील तसेच १७ आतील अशा दोन्ही गटांमध्ये शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ दाखवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या यशाबद्दल समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त पियुष चव्हाण, शा.नि. शा. अधिकारी राहुल चोंडकर, शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण सुरजुसे, क्रीडा शिक्षक पी. के. खडसे तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कोठारी येथे दारूबंदी करण्याची मागणी
### मंगरुळपीर पोलीस ठाण्यात निवेदन



**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

तालुक्यातील कोठारी गावातील नागरिकांनी गावामध्ये दारूबंदी करण्याची मागणी करत मंगरुळपीर पोलीस ठाण्यात निवेदन सादर केले आहे. गावातील दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असून, यामुळे सामाजिक आणि कौटुंबिक जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात, दारूच्या व्यसनामुळे गावातील काही नागरिकांनी आपले प्राण गमावले आहेत. व्यसनाधीन पुरुष काम करत नाहीत आणि घरी बसून महिलांना दारूसाठी मारहाण करून पैसे मागतात, ज्यामुळे कौटुंबिक वाद आणि हिंसाचार वाढला आहे. महिलांना कामावर जावे लागते, पण त्यांची कमाई दारूवर खर्च होते. या गंभीर परिस्थितीमुळे ग्रामस्थांनी एकत्र येऊन दारूबंदीची मागणी केली आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी १६ ऑगस्ट, २०२५ रोजी कोठारी येथे ग्रामसभा घेण्यात आली. या सभेत, दारूबंदीच्या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली आणि सर्वानुमते ठराव क्रमांक १० मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या या ठरावानुसार, गावात पूर्ण दारूबंदी लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाला या मागणीवर त्वरित कार्यवाही करण्याची विनंती केली आहे, जेणेकरून गावातील सामाजिक स्वास्थ्य सुधारण्यास मदत होईल. पोलीस प्रशासनाने या निवेदनाची दखल घेतली असून, पुढील कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर थेट संवाद
### तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी संवाद सभा संपन्न



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

रिसोड तालुक्यातील शेत रस्ते व पाणंद रस्ते संदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्या व तक्रारींच्या तातडीने निराकरणासाठी आज तहसील कार्यालयात शेतकरी संवाद सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेचे अध्यक्षस्थान प्रतीक्षा तेजनकर, तहसिलदार रिसोड यांनी भूषविले.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रिसोड, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शिरपूर तसेच उपअधीक्षक भूमि अभिलेख, रिसोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेत शेतकरी बांधवांनी शेत रस्ते व पाणंद रस्त्यांबाबत आपले प्रश्न व तक्रारी थेट प्रशासनासमोर मांडल्या. शेतकऱ्यांच्या मांडणीला सकारात्मक प्रतिसाद देत तहसिलदार तेजनकर यांनी संबंधित विभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक व भूमि अभिलेख विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या थेट संवादामुळे प्रशासनाकडून तातडीने आणि ठोस कार्यवाही होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सतत प्रयत्नशील रहावे
### उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

सध्याचे योग्य स्पर्धेचे युग असून विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम घेत अभ्यास करण्याशिवाय पर्याय नाही शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी नेहमी उच्च ध्येय ठेवून सतत प्रयत्नशील राहावे आलेल्या संकटांना सामोरे जात आई वडिलांचे परिसर सतत डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थी दहशत फक्त अभ्यासाला प्राधान्य द्यावे व्यसनाधीन ते पासून दूर राहावे हे ध्येय ठेवताना बऱ्याच वेळा संकटाचा सामना करावा लागेल मात्र त्याला न डगमगता आपले ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रमाची तयारी ठेवून सतत प्रयत्नशील राहावे असे आवाहन विभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी केले त्या अमानी येथील रणजीत सिंह मोहिते पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या अभ्यासिकेच्या उद्घाटन प्रसंगी केले.म्हणाले यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की ग्रामीण भागात शिक्षण घेताना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो आलेल्या समस्यांना सामोरे जावे समस्याचा भाव न करता नवीन संधी सोबत संधीचे सोने करावे असे आवाहन त्यांनी केले त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करताना कोणते साहित्य वाचावे कशाला महत्त्व द्यावे याबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन केले. आज दि, १५ सप्टेंबर रोजी अमानी येथील रणजीत सिंह मोहिते पाटील वाचनालय अभ्यासिकेचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या हस्ते हित कापून करण्यात आले असून कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अशोकराव गवळी माजी जि प सदस्य अशोकराव गवळी हे होते.

## भाजपा वाशिम शहर मंडळ कार्यशाळा संपन्न

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भाजपातर्फे राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवाडा उपक्रमाचा भाग म्हणून भाजपा वाशिम शहर मंडळाची कार्यशाळा शहर अध्यक्ष मनिष मंत्री यांच्या जनसेवा कार्यालयात मंत्री पार्क येथे उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेत जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, आमदार शाम खोडे, सेवा सुशासन समिती जिल्हा संयोजक सुभाष नानवटे, माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू, जिल्हा महामंत्री गणेश खंडाळकर व सौ. संगीताताई इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.

## तीन दिवसीय खरीप शिवार फेरीचे आयोजन

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व कृषी विभागाचा उपक्रम**

**■ प्रतिनिधी | अकोला ■**



जागतिक हवामान बदल आणि वाढत्या व्यावसायिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान आत्मसात करून कृषीमाल प्रक्रिया व मार्केटिंगमध्ये प्रगती करावी, या उद्देशाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला तर्फे कृषी विभाग महाराष्ट्र शासन व संलग्निक संस्थांच्या सहकार्याने तीन दिवसीय खरीप शिवार फेरी आयोजित करण्यात आली आहे.

ही शिवार फेरी २०, २१ व २२ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर पार पडणार आहे. या दरम्यान विद्यापीठाचे सर्व संशोधन प्रक्षेत्र शेतकरी बांधवांसाठी खुले राहणार असून, प्रगत कृषी तंत्रज्ञानाची माहिती, तज्ज्ञ शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन आणि शेतकऱ्यांच्या शंका निरसनाची सुविधा उपलब्ध असणार आहे.

यंदाच्या शिवार फेरीत शेतकरी बांधवांना तेलबिया, नगदी पिके, डाळवर्गीय, तृणधान्ये, भरड धान्ये, फळपिके, भाजीपाला, शोभीवंत फुलपिके, सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, पशुपालन, रेशीम शेती, सुगंधी व औषधी वनस्पती, व्यावसायिक उद्यानिकी नर्सरी, कोरडवाहू शेती व एकात्मिक शेती तंत्रज्ञान अशा विविध प्रकल्पांचे प्रत्यक्ष अवलोकन करता येणार आहे.विशेष म्हणजे, गहू संशोधन विभागाच्या प्रक्षेत्रावर २० एकर क्षेत्रात खरीप पिकांच्या ३०० हून अधिक जिवंत प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले आहे. विविध विद्यापीठे व खाजगी संस्थांनी विकसित केलेल्या पिकांच्या जाती व लागवड तंत्रज्ञान शेतकऱ्यांना पाहावयास मिळणार आहे.

या शिवार फेरीचे उद्घाटन शनिवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता होणार असून, या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शेतकरी बांधवांना सहकुटुंब शिवार फेरीला उपस्थित राहून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा व इतर शेतकऱ्यांपर्यंत याची माहिती पोहोचवावी असे आवाहन केले आहे.

## सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रशांत ठाकरे यांना मातृशोक



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

कारंजा शहरातील बायपास परिसरात वास्तव्यास असलेले समाजसेवक व दैनिक जनमाध्यमचे तालुका प्रतिनिधी प्रशांत ठाकरे यांच्या मातोश्री श्रीमती कल्पना पुरुषोत्तम ठाकरे (वय ७४) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.

स्व. कल्पनाताई यांनी आपले वैवाहिक जीवन यशस्वीपणे सांभाळताना मुलांना संस्कारांचे धडे दिले आणि त्यांना योग्य मार्ग दाखवला. त्यांचे पती, जे आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक होते, यांचे २००८ मध्ये निधन झाले. त्यानंतर स्व. कल्पनाताईंनी मुलांना धीर देत कुटुंबाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि अडचणीत असलेल्यांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे परिसरातील नागरिक त्यांच्याबद्दल आदर बाळगत होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांचा अंतिम संस्कार कारंजा येथील सारंग तलावाजवळील हिंदू स्मशानभूमीत करण्यात आला. यावेळी समाजसेवक, राजकीय व्यक्ती आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

स्व. कल्पनाताई यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे.

## दोन विद्यार्थी विभागीय कराटे व बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी पात्र

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

क्रीडा व संचालनालय म.रा.पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा २०२५-२६ मध्ये गोविंद न्यू इंग्लिश पब्लिक स्कूल च्या दोन विद्यार्थी विभागीय कराटे स्पर्धेसाठी पात्र ठरले.८ व ९ सप्टेंबर रोजी झालेल्या स्पर्धेमध्ये १४ वर्षे मुले या वयोगटामध्ये श्रीमद ठाकरे या विद्यार्थ्यास गोल्ड मेडल प्राप्त झाले.तसेच वंश हेंडस्कर या विद्यार्थ्यास सिल्वर मेडल प्राप्त झाले.त्याचबरोबर १४ वर्षे मुली या वयोगटांमध्ये कुमारी वसुंधरा कुंभार या विद्यार्थिनीस गोल्ड मेडल प्राप्त झाले. विजयी खेळाडूस जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे ,राज्य क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेंभुर्णीकर , ता.क्री. अ.मंगला शेंडे तसेच क्रीडा कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूस शुभेच्छा दिल्या.

# निधी वाटपात असमानता : आ. पठाण यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या नगरसेवकांनी घेतली आयुक्तांची भेट

## अविकसित भागांची पाहणी करून विकास करणार : आयुक्त लहाने

**■ प्रतिनिधी | अकोला ■**



महानगरातील काँग्रेस नगरसेवकांचे प्रभाग विकासापासून कोसो दूर असून महानगर पालिकेच्या द्वारे होणाऱ्या निधी वाटपातील असमानता त्याला कारणीभूत आहे. आगामी काळात विकास निधीचे नियोजनात कोणत्याही प्रकाराचा भेदभाव न करता ज्या ठिकाणी खरोखर निधीची आवश्यकता आहे, विकासाची गरज आहे अशा ठिकाणी विकासकामे करण्यात यावी अशी मागणी आ. साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वात आलेल्या काँग्रेसच्या नगरसेवकांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक सुनील लहाने यांना केली.

गेल्या दोन वर्षाच्या वर कालावधीपासून अकोला मनपात प्रशासक राज आहे. या काळात शहरात निधी सुद्धा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला, मात्र त्यातून झालेली विकासकामे, निधी वितरण मधील भेदभाव यामुळे काँग्रेस नगरसेवकांच्या प्रभागात मोठ्या प्रमाणात विकासाचा अभाव आहे. तर बहुल दलीत वस्ती असलेल्या प्रभाग क्रमांक २ आणि १ मध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामांचा अभाव आहे. तर दलीत वस्तीच्या निधी वाटपात सुद्धा मोठ्या प्रमाणात भेदभाव करण्यात आला असून शहरात सर्वात जास्ती दलीत बहुल लोकसंख्या असलेल्या प्रभाग क्रमांक २ मध्ये अतिशय तुरळक प्रमाणात निधी देण्यात आला होता. तर जुने शहर परिसरातील प्रभाग क्रमांक मध्ये अनेक गल्ली बोळ मध्ये रस्तेच नाही, परिणामी स्थानिक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरत असून नागरिकांना नरक यातना भोगाव्या लागत आहे. आतापर्यंत जे झाले ते झाले मात्र आता आपल्या प्रशासक काळात विकासापासून उपेक्षित असलेल्या या काँग्रेस नगरसेवकांच्या प्रभागात निधी देण्यात यावा अशी आग्रही मागणी आ. पठाण यांच्या नेतृत्त्वाखाली आलेल्या काँग्रेस नगरसेवकांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक सुनील लहाने यांना केली. तर सर्व नगरसेवकांच्या भावना जाणून घेत या प्रभागांची पाहणी करून ज्या ठिकाणी विकासाची गरज आहे, अश्या ठिकाणी निधी वितरण करून विकासकामे करण्यात येईल असे आश्वासन मनपा आयुक्त सुनील लहाने यांनी यावेळी उपस्थितांना दिले.

यावेळी मोहम्मद इरफान, मोईन उर्फ मोंटू खान, सुवर्णरेखा विजय जाधव, चांदणी रवी शिंदे, रवी शिंदे, पराग कांबळे, शेख अब्दुल्ला, फिरोज गवळी, फिरोज खान, आकाश कवडे, राहुल सारवान, अभिजित तवर, विनोद मराठे, मंजूर खान यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

E-paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, मंगळवार १६ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४ ■ वर्ष - १३ ■ अंक- २८९


# आज महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत जनसुनावणी

## महिलांनी आपल्या तक्रारी मांडण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील तक्रारींची जनसुनावणी आज मंगळवार दि.१६ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर तक्रारींची सुनावणी घेणार आहेत. या जनसुनावणीत महिलांनी आपल्या तक्रारी मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर दि.१६ सप्टेंबर रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. यावेळी जिल्हास्तरावरील जनसुनावणी घेत महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न त्या करणार आहे. जनसुनावणी नंतर महिला व बालकांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाची आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणांमुळे शक्य होत नाही.

त्यामुळे आयोग जिल्हास्तरावर सर्व यंत्रणेनिशी जात आहे. महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत जनसुनावणीला पोलिस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक आदी उपस्थित राहणार असल्याने तक्रारींवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. यातून आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचे काम आयोग करत आहे.

# राष्ट्रीय लोक अदालत लोकाभिमूख न्यायाचा सर्वोत्तम मार्ग : न्यायमूर्ती जोशी



■ जिल्ह्यातील सर्व न्यालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालत

■ ५ हजार ४२२ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली

■ आपसी तडजोड मूल्य ६ कोटी ३९ लाख रुपये

**वर्धा जनमाध्यम**

राष्ट्रीय लोक अदालत लोकाभिमूख न्यायाचा सर्वोत्तम मार्ग आहे, असे मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती तथा जिल्ह्याच्या पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. वर्धा येथील लोकअदालतीस भेटीप्रसंगी त्या बोलत होत्या.

न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी यावेळी पक्षकारांशी संवाद साधला. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड, जिल्हा न्यायाधीश १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. ए. एस. एम. अली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय लोकअदालतीतून प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढून पक्षकारांचा वेळ, खर्च आणि मानसिक ताण वाचवला जातो. हा लोकाभिमुख न्यायाचा सर्वोत्तम मार्ग आहे. असे न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी सांगितले.

राष्ट्रीय लोक अदालतीसाठी एकुण सात पॅनल तयार करण्यात आले होते. सदर पॅनलवर तडजोड पात्र सर्व फौजदारी अपील व दिवाणी अपील प्रकरणे, तडजोड पात्र सर्व किरकोळ फौजदारी व दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई, ईलेक्ट्रिसीटी ?क्ट, दिवाणी दावे, भू-संपादन, १३८ एनआय ?क्टचे प्रकरणे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलाचे संरक्षण अंतर्गत प्रकरणे, दरखास्त, विवाह याचिका असे अनेक प्रकरणे ठेवण्यात आली होती. सर्व पॅनलला न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी भेट दिली.

राष्ट्रीय लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे व्यवसायासाठी ११ लाख रुपये उधारीवर दिलेल्या प्रकरणामध्ये सहा वर्ष चाललेल्या प्रकरणात कुठलीही नुकसान भरपाई न घेता मुद्दल रक्कमेत आपसी तडजोड करण्यात आला. तसेच वर्धा अर्बन न्ड रूरल सहकारी पतसंस्था, वर्धा विरूध्द प्रितम किटे यांचे ३९ लक्ष रुपये रकमेचे न्यायालयामध्ये २०२१ पासून प्रलंबित असलेले प्रकरण तडजोडीने निकाली काढण्यात आले. या प्रकरणात तडजोड करण्याकरीता पॅनल प्रमुख जी.व्ही. जांगडे-देशपांडे, मुख्य न्यायदंडाधिकारी तसेच पॅनल सदस्य डी.आर.जैन, पॅनल अधिवक्ता यांनी मोलाचे योगदान दिले.

जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये आयोजित राष्ट्रीय लोकअदालत मध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांपैकी २ हजार ३११ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली निघाली. या. प्रकरणांमधील तडजोड मूल्य ५ कोटी २५ लाख ५२ हजार २५२ इतके आहे. त्याचप्रमाणे वाद दाखल पुर्व प्रकरणांपैकी ३ हजार १११ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधील तहजोड मुल्य १ कोटी १४ लाख ३७ हजार ८२ रुपये इतके आहे. दोन्ही मिळून ५ हजार ४२२ प्रकरणे निकाली निघाली असून एकूण तडजोड मूल्य ६ कोटी ३९ लक्ष ८९ हजार ३३४ रुपये इतके आहे.

# मोकाट श्वानांवर नियंत्रणासाठी नगरपालिकेची लसीकरण मोहीम

**पुलगाव जनमाध्यम**

शहरात अलिकडे भटक्या कुत्र्यांची वाढलेली संख्या नागरिकांसाठी त्रासदायक ठरत होती. बसस्थानक परिसर, नाचनगाव रोड, पॉवर हाऊसजवळ व पुरपीडित वस्तीजवळ मोठ्या प्रमाणात श्वानांची गर्दी होत होती. या श्वानांकडून महिलांना, विद्यार्थ्यांना व दुचाकीस्वारांना त्रास होऊन काहींना चावल्याच्या घटनाही घडल्या. वाढत्या धोक्यामुळे नागरिकांनी नगरपालिकेकडे तातडीने कारवाईची मागणी केली.

**मुख्याधिकाऱ्यांची तत्परता**

नागरिकांच्या निवेदनानंतर पुलगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी विजय आश्रमा यांनी त्वरित लक्ष घालून स्वच्छता विभागाला आदेश दिले.



त्यानुसार विभागप्रमुख संजय वानखेडे व अभिजित लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोकाट श्वानांवर लसीकरण व नसबंदी मोहीम राबविण्यात आली.

कर्मचारी व स्वयंसेवकांची मदत

या मोहिमेत स्वच्छता कर्मचारी वर्गासोबतच अविनाश जयेदे, सम्राट खैराल, राहुल संगेले, पंकज खोड़े यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे मोहीम यशस्वी झाली.

**नागरिकांचा दिलासा**

श्वानांवर नियंत्रण आणण्या साठी नगरपालिकेने केलेल्या या जलद कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशा मोहिमा सातत्याने राबवून शहरातील सुरक्षितता कायम ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# कारंजा तालुक्यात महसूल पंधरवाडाचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्यांना महसूल विभागाच्या योजना उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल प्रबोधन अभियानांतर्गत कारंजा तालुक्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल पंधरवाडाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पंधरवड्याचा शेतकरी, नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पंधरवड्यात महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक होण्याच्या दृष्टीने तीन टप्यामध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहे.

पहिल्या टप्प्यात शेतांच्या बांधावरील आणि शिवारातील अतिक्रमण काढून टाकण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी दि. १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत शेतकऱ्यांना अतिक्रमण काढण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे. यादरम्यान गावपातळीवर तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच आणि पोलिस यंत्रणेच्या मदतीने कार्यवाही करण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२३ ते २७ सप्टेंबर या कालावधीत सार्वजनिक जमिनींवरील अतिक्रमण काढून भूमीहीन लाभार्थ्यांना पट्टे देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तिसऱ्या टप्प्यात दि.२८ ते २ ऑक्टोंबर या कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या दरम्यान जिवंत सातबारा मोहिम, लक्ष्मी मुक्ती योजना आणि डिजिटल पीक पाहणी या उपक्रमांचा समावेश असणार आहे.


**नावात बदल**

माझे पूर्वी **LAXMI VINOD MOTWANI** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **PRIYA VINOD MOTWANI** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता :- सिंधी कॉलनी गुरुनानक वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१


# राष्ट्रपती पुरस्कार सोहळ्यात देशातील स्काऊट व गाईडचा गौरव

## शरद पवार दंत महाविद्यालयातील अदिती सन्मानित

**वर्धा जनमाध्यम -** नवी दिल्ली येथे आयोजित राष्ट्रपती पुरस्कार सोहळ्यात सावंगी मेघे येथील शरद पवार दंत महाविद्यालयातील स्काऊट व गाईड विभागातील विद्यार्थिनी अदिती कशेटीवार हिचा अत्युत्तम नेतृत्वगुण, समर्पण आणि शिस्तबद्धतेकरिता 'राष्ट्रपती गाईड पुरस्कार प्रमाणपत्र' देऊन सन्मान करण्यात आला.



दिल्लीच्या प्रगती मैदान परिसरातील भारत मंडपम येथे आयोजित या सोहळ्यात भारत सरकारचे केंद्रीय श्रम व रोजगार तथा युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते आणि लोकसभा सदस्य मनोज तिवारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अदितीला भारतातील स्काऊट आणि गाईड चळवळीतील हा प्रतिष्ठेचा सन्मान देऊन गौरविण्यात आले.

या सन्मानाकरिता दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, प्रकुलगुरू डॉ. गौरव मिश्रा, कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसूळकर, प्रशासकीय महासंचालक डॉ. राजीव बोरले, कार्यकारी संचालक डॉ. तृप्ती वाघमारे, अधिष्ठाता डॉ. मनोज चांडक, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. विद्या लोहे, उपअधिष्ठाता डॉ. अल्का हांडे यांनी अदिती कशेटीवार हिचे अभिनंदन केले आहे.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**वर्धा :** जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे आणि त्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे

या शिबिरांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी मोफत तपासणी, उपचार आणि समुपदेशन सेवा पुरविण्यात येणार आहे. यामध्ये महिलांच्या मुखाचा, स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगा विषयी तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन तपासणी केली जाणार आहे. गर्भवती महिलांची प्रसूती संबंधी तपासणी, गर्भधारणाविषयी मार्गदर्शन तसेच मातांसाठी व बाल संगोपनासाठी उपयुक्त साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता, पोषण, लसीकरण, याबाबत जनजागृती करून त्यांना आरोग्याविषयी योग्य समुपदेशन दिले जाणार आहे.याशिवाय महिलांची एनसीडी तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी तसेच इतर सर्वसामान्य आजारांवरील तपासणी, उपचार व मार्गदर्शन मोफत केले जाणार आहे. विशेष म्हणजे आदिवासी भागातील महिलांना सिकलसेल स्क्रिनिंग, हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसीस तपासणी आणि आवश्यक औषधोपचार पुरविण्यात येणार आहेत. अभियानादरम्यान जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १८३ उपकेंद्रे, आयुर्वेदिक व एलोपॅथिक दवाखाने तसेच शहरी आरोग्य केंद्रांमध्ये मोफत शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांत तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचे आरोग्य तपासले जाईल.

अभियानात जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रे सहभागी होणार आहेत. मोहिमेमुळे महिलांना गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन वेळेवर उपचार सुरू करण्यास मदत होईल. तसेच महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन कुटुंबाच्या सुदृढतेस हातभार लागेल, असे बेले यांनी कळविले आहे.

# चार वर्ग, साठ विद्यार्थी... एकटाच शिक्षक!

**मोझरी(शेकापूर) :** प्राथमिक शिक्षणाला महत्त्व देणारे सरकार आणि विभागाच्या अधिकाऱ्यांचा बेताल कारभार या दोघांच्या कचाट्यात मोझरी प्राथमिक केंद्र शाळेतील विद्यार्थी सापडले आहेत. तब्बल चार वर्गांतील साठ विद्यार्थ्यांचा भार केवळ एका शिक्षकावर टाकण्यात आल्याने शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. पूर्वी वावरे, खिराले आणि झाडे हे तीन शिक्षक कार्यरत होते. नुकत्याच झालेल्या बदल्यांमुळे एकाचवेळी तिघेही शाळेतून बाहेर गेले. आता नव्याने नियुक्त शेंडे सर यांच्यावर पहिली ते चौथीपर्यंतचे सर्व वर्ग शिकवण्याची जबाबदारी आहे. ३००० लोकसंख्या असलेल्या गावाची ही प्राथमिक केंद्र शाळा असून याच्याअधीन कापशी, पोटी आदी गावातील शाळाही येतात.


निविदा सूचना

जलसंपदा विभाग

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नागपूर

वैनगंगा नगर, अजनी-४४०००३

ई-मेल - eevhelid१bnagpur@rediffmail.com दूरध्वनी क्र. (०७१२) २९८०१४७

निविदा क्र.काअ/विजवउसिंविना/लालनाला लाईटींग/२२/२०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याचे राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नागपूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम नोंदणीकृत विद्युत निविदाकारांकडून खालील कामाकरीता नमूद ब-१ नमुन्यात निविदा मागवित आहेत. सदर निविदा सूचना शासनाच्या http://mwrdidc.in/vidc/home संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. प्रारुप निविदा संच कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नागपूर यांच्या कार्यालयात दिनांक १६.०९.२०२५ पासून उपलब्ध होऊ शकतील.

**कामाचे नांव** - लाल नाला मध्यम प्रकल्प, ता.समुद्रपूर, जि.वर्धा येथे पथदिवे, सौंदर्यीकरण दिवे व Flood Light (तिरंगा रंग) चे पुरवठा, दुरुस्ती, उभारणी, चाचणी व कार्यान्वित करण्याचे काम.

जिल्हा - वर्धा

| | | |
|---|---|---|
| निविदेची किंमत रुपये | - | रु.५,९१,६४१/- |
| निविदा उपलब्ध कालावधी | - | दि.१६/०९/२०२५ (१०.३० वाजता) ते २३/०९/२०२५ (१७.३० वाजता) |
| निविदा सादरीकरण दिनांक | - | २४/०९/२०२५ (१५.०० वाजता) |
| निविदा उघडण्याचा दिनांक | - | २४/०९/२०२५ (१५.०० वाजता शक्य झाल्यास) |

जावक क्र.१०६७

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
नागपूर

स्वाक्षरी/-
(अ.गो.डहमल)
कार्यकारी अभियंता,
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
नागपूर

(क्र.जिमाका-वर्धा/११६/२०२५-२६)


# ॲक्सिस बँकेत २.५५ कोटींचा महाघोटाळा!

## रिलेशनशिप ऑफिसरच बनले फसवेगार; बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज, चार जणांना गजाआड

**वर्धा जनमाध्यम**

वर्धा शहर हादरवून टाकणारा ॲक्सिस बँकेचा महाघोटाळा उघडकीस आला आहे. रिलेशनशिप ऑफिसरच्या पदावर बसूनच काही मंडळींनी बँकेलाच गंडा घालण्याचा प्रकार केला! तब्बल २ कोटी ५५ लाख ९२ हजार रुपयांचे कर्ज बनावट कागदपत्रांच्या आधारे काढल्याचा प्रकार समोर येताच आर्थिक गुन्हे शाखेने चौकशीला वेग दिला आहे. या घोटाळ्यामुळे बँकेसह ग्राहक वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे.थरकाप उडवणारी फसवणूक २०२२-२३ या कालावधीत नागपूर, वर्धा, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात एकूण २६ कर्ज प्रकरणांमध्ये बनावट पगार स्लिप, खोटे बँक स्टेटमेंट आणि फर्ज़ी कागदपत्रांचा वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. केवळ वर्धा शाखेतच तब्बल २० प्रकरणांत अनियमितता झाली असून यामधून कोट्यवधींचा गैरव्यवहार उघडकीस आला आहे.

**आरोपी कोण?**

शशिकांत मांद्रे (धामणगाव, सेलू तालुका), प्रदीप भांडेकर (वडगाव खुर्द), अंकुश वैरागडे (वडगाव जंगली), प्रदीप रहांगडाले (गोंदिया), उमेश राठोड (मोख, यवतमाळ)आरोपींच्या जाळ्यात बँकेची विश्वासार्हता पुरती धुळीस मिळाली. यातील तिघांना पोलिसांनी सहा दिवसांच्या कोठडीनंतर तुरुंगात रवानगी केली आहे.

**तपासातून नवे धक्कादायक तपशील**

बँकेच्या तपास समितीच्या अहवालानंतर बँक व्यवस्थापक अर्पित मिश्रा यांनी पोलिसांत फिर्याद दिली. पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय अधिकारी पुंडलिक भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. तांत्रिक तपास दरम्यान आरोपींकडून अजून काही फर्ज़ी कागदपत्रे जप्त झाली असून या घोटाळ्याचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### पुरामुळे ४० जण अडकले

# एअरलिफ्ट करून सुरक्षितस्थळी हलविण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

## जिल्हा प्रशासनाला सज्जतेचे आदेश

**मुंबई :** मुंबईसह राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी मंत्रालयातील राज्य आपत्कालिन कार्य केंद्राला भेट देऊन पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

बीड जिल्ह्यातील आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांना पुराच्या पाण्याने वेढल्याने अडकलेल्या ४० ग्रामस्थांना एनडीआरएफच्या मदतीने एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे असे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

अतिवृष्टी असलेल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी यावेळी त्यांनी संवाद साधत मदत आणि बचावकार्याबाबत माहिती घेतली आणि जिल्हा प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना दिल्या.

दुपारी बाराच्या सुमारास उपमुख्यमंत्र्यांनी या कक्षाला भेट दिली.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण आदी उपस्थित होत. यावेळी डॉ. चव्हाण यांनी राज्यातील परिस्थीतीची माहिती दिली.

यावेळी त्यांनी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी फोनवर बोलून त्यांच्याकडून पावसाची परिस्थिती जाणून घेतली. तसेच मुंबईत जिथे जिथे पाणी साचल्याच्या तक्रारी येत आहेत तिथे अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करून



लवकरात लवकर पाण्याचा निचरा होण्यासाठी पंप बसविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

पुण्यात आणि राज्यात इतर ठिकाणी पडलेल्या पावसाचा आढावा घेतला. आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांना पुराच्या पाण्याने वेढल्याने त्यात ४० गावकरी अडकून पडले होते. त्यांना एनडी मदतीने एअरलिफ्ट करून काढावे लागेल असे संभाजानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार नाशिक वरून हेलिकॉप्टर बोलवून या अडकलेल्या लोकांना तत्काळ एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे असे आदेश त्यांनी दिले.

तसेच छत्रपती संभाजानगर विभागाचे विभागीय आयुक्तांशी देखील त्यांनी या कक्षातून संवाद साधला.

भारतीय हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी दिलेल्या हवामान अंदाजानुसार पावसाची परिस्थिती कशी राहणार आहे त्यानुसार आपत्ती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासनाने दक्षता घेण्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. गेल्या २४ तासात सचेत ॲपच्या माध्यमातून राज्यभरात पावसाचा अलर्ट देणारे ३५ कोटी मेसेज पाठविण्यात आल्याची माहिती, डॉ. चव्हाण यांनी यावेळी दिली.

# संक्षिप्त

## मुंबईकरांसाठी नव्या मार्गाची तयारी

**मुंबई :** वसईच्या खाडीवरील नागला बंदर व पश्चिम किनाऱ्यावरील उत्तन डोंगरी येथे भविष्यात रो-रो सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सागरी मंडळाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्या अंतर्गत या दोन्ही ठिकाणी जेट्टी उभारण्यात येणार आहेत. त्याला सीआरझेडसंबंधी मंजुरी प्राप्त



झाली आहे.राज्याच्या किनारपट्टया प्रवाशांसाठी समुद्रीमार्गे जोडण्याचे धोरण राज्य सरकारने आखले आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ करत आहे. त्या अंतर्गत किनारपट्टयांवर जेट्टी उभारण्यात येणार आहेत. त्यातच उत्तन डोंगरी व नागला बंदर येथे रो-रो सेवेच्या दृष्टीने जेट्टी उभारण्यास किनारपट्टी नियमन क्षेत्रासंबंधी महत्त्वाची मंजुरी मिळाली आहे.या अंतर्गत नागला बंदर व उत्तन या दोन्ही ठिकाणी १४३ मीटर लांब व १० मीटर रुंदीच्या जेट्टी उभारल्या जाणार आहेत. या जेट्टी सर्वाधिक लांबीच्या असून रो-रोसारखे मोठे जहाज तेथे उभे राहू शकेल. त्याच वेळी या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र सागरी मंडळाकडून जलप्रवासाच्या दृष्टीने मोठे केंद्र उभारले जाणार आहे. यासाठीच जेट्टींशिवाय वाहनतळ, बोटीत चढण्यासाठीचा मार्ग, संरक्षक भिंत यांचेही बांधकाम होणार आहे. त्यामध्ये नागला बंदर येथे २,०२५ चौरस मीटर, तर उत्तन डोंगरी येथे ७,२०० चौरस मीटर क्षेत्रफळाचा वाहनतळ, नागला बंदर येथे ४५.४२ मीटर उंचीची, तर उत्तन डोंगरी येथे ६० मीटर उंचीची संरक्षक भिंत उभारली जाणार आहे.या सर्व बांधकामाला महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र नियमन प्राधिकरणाने (एमसीझेडएमए) सीआरझेडसोबत कांदळवनांसंबंधीच्या उपाययोजना करण्यासह मंजुरी दिली आहे. तसेच अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या संबंधित प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

## दिवाळीत मिठाईत भेसळ झाल्यास अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी कोणता इशारा दिला?

**पिंपरी :** 'हाफकिन संस्था जागतिक पातळीवर नावाजलेली आहे. येथे विविध लसींना दर्जेदार उत्पादन करण्यात येते. या लसींना जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. संस्था अडचणीत असून, संस्थेच्या बळकटीकरणासाठी १५० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. हा निधी संस्थेला दिला जाईल,' अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिली.पिंपरीतील हाफाकिन जीव औषध निर्माण महामंडळ



प्रकल्पास झिरवळ यांनी शुक्रवारी भेट दिली. तेथील कामाचा आढावा घेतल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर, महाव्यवस्थापक डॉ. प्रदीप धिवर, व्यवस्थापक नवनाथ गर्जे, पिंपरी-चिंचवड संस्थेचे व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब कुहे, अन्न व औषध प्रशासनचे सहआयुक्त गिरीश हुकरे, सहायक आयुक्त कोंडिबा गाडेवार या वेळी उपस्थित होते.झिरवाळ यांनी प्रतिविष उत्पादन, गुणवत्ता आश्वासन, उत्पादन, पशुवैद्यकीय विभाग, कर्मचारी निवासस्थान, तबेला, सर्पालय यांना भेट देऊन संशोधन, औषध उत्पादनक्षमता, औषधांची मागणी, पुरवठा, गुणवत्ता, साठवणूक आणि चाचणी प्रक्रियेची माहिती घेतली. संस्थेच्या वतीने उत्पादित सर्पदंश, विंचूदंश, घटसर्प, श्वानदंश, गॅस गँगरिन प्रतिविष, प्रतिधनुर्वात, पोलिओ लस उत्पादन, साठवणूक क्षमता आणि त्यातून जमा होणाऱ्या महसुलाची माहिती त्यांना देण्यात आली.

## मृतदेह बाजूला ठेऊन दोन गटांत तुंबळ हाणामारी

**गडचिरोली :** अहेरी तालुक्यातील नागेपल्ली गावालगत असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवरून दोन गटात तुंबळ हारामारी झाली. अंतिमसंस्कार करण्यासाठी गेलेल्या एका गटाला स्मशानभूमीवर अतिक्रमण करून बस्तान मांडलेल्या दुसऱ्या गटाने रोखले असता हा वाद उफाळून आला. यात काहीजण जखमी झाले



असून त्यांच्या तक्रारीवरून ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील चौघांना अटक करण्यात आली आहे.नागेपल्ली येथील स्मशानभूमीच्या जागेवर बाहेरून आलेल्या काही लोकांनी बेकायदेशीरपणे वराहपालन सुरू केले होते. रविवारी गावातील एका व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी ग्रामस्थ स्मशानभूमीत गेले असता, अतिक्रमण करणाऱ्यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. यामुळे जोरदार वादावादी झाली. काही वेळातच वादाने हिंसक वळण घेतले आणि दोन्ही गटांत लाठ्या-काठ्यांनी तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत अनेक जण जखमी झाल्याची माहिती आहे. या घटनेची चित्रफीत सार्वत्रिक झाल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## उच्चांकी दरवाढीनंतर जळगावमध्ये सोने, चांदीत 'हा' बदल

**गडचिरोली :** अहेरी तालुक्यातील नागेपल्ली गावालगत असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवरून दोन गटात तुंबळ हारामारी झाली. अंतिमसंस्कार करण्यासाठी गेलेल्या एका गटाला स्मशानभूमीवर अतिक्रमण करून बस्तान मांडलेल्या दुसऱ्या गटाने रोखले असता हा वाद उफाळून आला. यात काहीजण जखमी झाले असून त्यांच्या तक्रारीवरून ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील चौघांना अटक करण्यात आली आहे.नागेपल्ली येथील स्मशानभूमीच्या जागेवर बाहेरून आलेल्या काही लोकांनी बेकायदेशीरपणे वराहपालन सुरू केले होते. रविवारी गावातील एका व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी ग्रामस्थ स्मशानभूमीत गेले असता, अतिक्रमण करणाऱ्यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला.

यामुळे जोरदार वादावादी झाली. काही वेळातच वादाने हिंसक वळण घेतले आणि दोन्ही गटांत लाठ्या-काठ्यांनी तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत अनेक जण जखमी झाल्याची माहिती आहे. या घटनेची चित्रफीत सार्वत्रिक झाल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार सदर जागा अनेक वर्षांपासून स्मशानभूमी म्हणून वापरली जाते. यापूर्वी दोन वेळा अतिक्रमण हटवण्यात आले होते. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पुन्हा बेकायदेशीरपणे वराहपालन सुरू करण्यात आले.

# बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक घसरले

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक घसरल्याने, लोकल सेवा ठप्प झाली आहे. ही घटना सोमवारी दुपारी १.३० च्या सुमारास घडली. या घटनेमुळे सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या लोकल सेवेवर परिणाम झाला आहे. तर, कल्याणवरून कर्जत-खोपोली दिशेने जाणारी लोकल सेवा कुर्मगतीने धावत आहे.

रविवारी रात्रीपासून जोरदार पाऊस पडत असून, सोमवारी सकाळी पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे मुंबई शहर आणि उपनगरांतील अनेक सखल भागात पाणी साचले होते. याचा फटका लोकल सेवेला बसला. डहाणू रोड, विरार, बोरिवलीवरून चर्चगेटच्या दिशेने आणि कर्जत, खोपोली, अंबरनाथ, बदलापूर, कसारा, आसनगाव, टिटवाळा, कल्याण, ठाणे, पनवेल, नेरुळ वाशीवरून सीएसएमटीच्या दिशेने येणाऱ्या लोकल सेवेवर परिणाम झाला. त्यात बदलापूर-अंबरनाथ दरम्यान मालगाडीचे चाक रेल्वे रुळावरून घसरल्यामुळे लोकल सेवा ठप्प झाली. सकाळपासून विलंबाने धावणाऱ्या लोकल, लांब पल्लाच्या रेल्वेगाड्या या चाक घसरण्याच्या दुर्घटनेमुळे पूर्णपणे बंद झाल्या.

रिमझिम पाऊस आणि चाक घसरल्यामुळे एक मालगाडी अप दिशेने थांबली आहे. सहाय्यक इंजिन पाठवण्यात आले आहे आणि ही मालगाडी हलवण्यात येत आहे, अशी माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

कर्जतवरून सीएसएमटकिडे येणारी लोकलसेवा बंद झाल्याने, प्रवाशांचा प्रवास रखडला आहे. तसेच वांगणी, भिवपुरी, कर्जत या दरम्यान लोकल एका मागे एक थांबल्या आहेत. लोकल बराचवेळ मार्गस्थ होत नसल्याने प्रवासी हैराण झाले.

ऑटिझम थेरपीत नवे क्षितिज! महाराष्ट्रात वाढते आधुनिक उपचारांचे प्रयत्न

कसारा आणि कर्जतवरून सीएसएमटीच्या दिशेने येणाऱ्या लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्याचे वेळापत्रक कोलमडले.

तसेच या मार्गावरील धीम्या लोकलला अर्धजलद किंवा जलद करून सीएसएमटीच्या दिशेने चालवण्यात आल्या. ऐनवेळी लोकल वेळापत्रकात बदल केल्याने, धीम्या मार्गावरील प्रवाशांना लोकलसाठी वाट पाहावी लागली.

# 'शरद पवारांनी X म्हटले की Y समजायचे'-सीएम

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्यातील मराठा आणि ओबीसी आरक्षणावरुन सुरु असलेल्या वादावर प्रतिक्रिया दिली. आरक्षणामुळे महाराष्ट्र अस्थिर झाल्याचं वक्तव्य शरद पवार यांनी केलं आहे. 'सरकारने हैदराबादच्या गॅझेटवर निर्णय घ्यावा. मी हैदराबाद गॅझेटचे शब्द न शूब्द दोनदा वाचले आहे, असं शरद पवार म्हणाले.

तसेच यामुळे सुरु असलेल्या वादाने सामाजिक वीण उसवतेय ही चिंतेची गोष्ट आहे', असंही शरद पवार म्हणाले.

शरद पवार यांच्या या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी एका वाक्यात उत्तर दिलं.



'आपल्याला माहिती आहे, शरद पवार कशाकरता प्रसिद्ध आहेत? शरद पवार यांनी X म्हटलं की Y समजायचं. याकरताच शरद पवार प्रसिद्ध आहेत. ते मोठे नेते आहेत. त्यावर अधिक काय बोलणार', असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना लगावला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकारण नको, असं देखील आवाहन विरोधकांना केले.

देवेंद्र फडणवीस यांचा

### विरोधकांवर हल्लाबोल

'एकही नकली व्यक्ती हा ओबीसीमध्ये समाविष्ट होणार नाही. नकलीचा अर्थ जो ओबीसीत नाही असा, अशी व्यक्ती ओबीसीत सहभागी होणार नाही, अशा प्रकारची काळजी जीआरमध्ये घेतलेला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना तर बोलण्याचा अधिकारच नाही. कारण ओबीसींसाठी जे काही केले आहे ते आमच्याच सरकारने केलं आहे', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मुसळधार पावसानंतर पुन्हा वाहनकोंडी



**नागपूर :** थोडसा जरी पाऊस झाला तरी नागपुरातील भुयारी पुलाखाली पाणी साचते व वाहने खोळंबतात. सोमवारी दुपारी तर नागपुरात मुसळधार पाऊस पडला. सुमारे तासभर पडलेल्या पाण्यामुळे रस्त्यावर तर पाणी साचलेच. शिवाय बर्डी, धंतोली, नरेंद्रनगर, मनीषनगर भागातील भुयारी मार्ग पाण्याने तुडुंब भरले. त्यामुळे येथील वाहतूक खोळंबली. ऐन वर्दळीच्या वेळी तेथे लांबच लांब वाहनाच्या रांगा लागलेल्या होत्या.

## 'सगळेच ईडी, सीबीआयला घाबरणारे'- सुप्रिया सुळे

**नाशिक :** विरोधकांचे तोंड बंद करण्यासाठी कोणी कसाही असला तरी त्याला भाजपमध्ये घेण्याचा सल्ला देणारे मंत्री गिरीश महाजन यांना राष्ट्रवादीच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी सुनावले आहे. देशात लोकशाही आहे.

दडपशाही नाही. देश संविधानाने चालतो, कोणाच्या मर्जीने चालत नाही. सगळेच ईडी, सीबीआयला घाबरत नसल्याचा टोलाही त्यांनी



महाजनांना हाणला.

आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर, राष्ट्रवादीच्या (शरद पवार) वतीने रविवारी येथे राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर पार पडले. दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. दोन दिवसीय कार्यक्रमासाठी खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील आदी पक्षाचे राज्यभरातील नेते शहरात दाखल झाले आहेत. मोर्चा निघण्याआधी खा.सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

# ...म्हणून मी मराठा समाजाबद्दल ते वक्तव्य केले

**पुणे :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मुंबईमध्ये केलेल्या आंदोलनानंतर महाराष्ट्र सरकारने मराठा आरक्षणाचा तिढा सोडवण्यासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाच्या विरोधात ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलन छेडले आहे. या आंदोलनादरम्यान होणाऱ्या जाहीर सभांमध्ये लक्ष्मण हाके हे मनोज जरांगे आणि सरकारवर जोरदार टीका करत आहेत. अशातच हाके यांनी बीड जिल्ह्यातील गेवराई येथे झालेल्या सभेत मराठा आणि ओबीसी यांच्यामध्ये आंतर जातीय विवाह करण्यासंदर्भात एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं.

'मराठा समाज आता ओबीसी समाजात आला आहे. आता तुमच्यात आणि



आमच्यात आंतरजातीय विवाह झाला पाहिजे. तुम्ही आता पहिल्यांदा ११ विवाह जाहीर करा. आमच्याकडे ११ पोरं तयार आहेत. आमच्या ११ पोरांसोबत मराठ्यांच्या पोरींचा विवाह जाहीर करा,' असं लक्ष्मण हाके म्हणाले होते. हाके यांच्या या वक्तव्यानंतर राज्यभरात वातावरण तापलं असून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका सुद्धा होत आहे. आता लक्ष्मण हाके यांनी आपल्या या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.'आंतरजातीय विवाहचा प्रस्ताव मांडला तर शिव्यांची लाखोली वाहिली जाते, शाहूंचे वारसदार व्हायला तुम्हाला शंभर जन्म घ्यावे लागतील. शाहूंनी त्यांच्या भगिनींचा विवाह होळकरांच्या घरात लावून दिला होता, १०० वर्षांपूर्वी तो विचार होता. आज असा विचार मांडला तरी मारून टाकण्याची धमकी दिली जाते. धन्य ते महात्मा फुले - शाहू राजे - बाबासाहेब. जातीयवादाचा नाग हा फक्त बिळातून बाहेर काढण्यासाठी मी हे वक्तव्य केलं होतं. त्यांचा पुरोगामी पुरोगामी म्हणवून घेत बहुजन बांधवांचे शोषण करणारा काळाकुट्ट चेहरा महाराष्ट्र समोर मांडायचा होता, उघडा पाडायचा होता, दाखवायचा होता,' असा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

# '...तरच शेतकरी आत्महत्या थांबतील' - केंद्रीय मंत्री गडकरी

**पुणे :** भारतात 'महाराष्ट्रात आणि शेतीसाठीचे पाणी हीच मुख्य समस्या आहे. मुबलक पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येणार नाही. देशात कुठेही पाण्याची कमतरता नाही. पाण्याच्या योग्य नियोजना अभावीच ही समस्या वाढली आहे,' असे मत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी व्यक्त केले. 'राज्यातील सिंचनाचे प्रमाण ६५ टक्क्यांवर गेल्यास, शेतीला दूधदुभत्याची जोड मिळाल्यास शेतकरी आत्महत्या नक्की थांबतील,' असा विश्वासही गडकरी यांनी व्यक्त केला.

गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित 'नाम फाउंडेशन' च्या दशकपूर्ती सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग व



मराठी भाषामंत्री उदय सामंत, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, फाउंडेशनचे संस्थापक ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व सचिव प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे आदी उपस्थित होते.

'वाढत्या शेतकरी आत्मह त्यांमुळे समाजातील संवेदनशील व्यक्ती अस्वस्थ झाल्या. त्यातूनच 'नाम फाउंडेशन' सारख्या संस्था सुरू झाल्या. त्यांनी प्रचंड काम केले. समस्यांची व त्यावरील उपायांची जाण असलेल्या, संवेदनशील व्यक्तींची समाजाला गरज आहे. त्यासाठी पैसा द्यायलाही लोक पुढे येतात,' असे गडकरी म्हणाले.

'योग्य नियोजनाअभावी नद्यांचे बरेचसे पाणी वाहून समुद्राला मिळते; पूर येतो. योग्य पद्धतीने जलसंवर्धन केले, तर मोठ्या धरणांची गरजच नाही. महाराष्ट्रात सिंचनाचे प्रमाण ६५ टक्क्यांवर गेल्यास व दूधदुभत्याची साथ मिळाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून आत्महत्या थांबतील,' असे गडकरी म्हणाले, 'देशात पाण्याचेही राजकारण केले जाते, असे सांगतानाच जलशक्तीमंत्री असताना मी राज्याराज्यांतील २४पैकी १७ तंटे मिटवल्याचा दावा गडकरींनी केला.

'महिलांसाठी अर्थ वेळ कामाचे प्रारूप तयार करून अधिकाधिक महिलांना रोजगार देऊन स्वबळावर उभे करणे गरजेचे आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## महागाई शिगेला

रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाईचा दर गेले नऊ महिने सातत्याने घसरत होता आणि लोकांनाही हायसे वाटले होते. पण ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईच्या दरात वाढ झाली आहे आणि हा दर १.६१ टक्के इतका झाला आहे. हा दर किरकोळ वाटू शकतो, पण सध्या जनता ज्या महागाईच्या वणव्यात होरपळत आहे ते पाहता हा दर खूप जास्त आहे. सामान्यतः महागाईचा दर वाढला आहे ते हिरव्या भाज्या आणि मासे तसेच अंडी या आवश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढीमुळे. नोव्हेंबर २०२४ पासून महागाईचा दर सतत कमी होत होता. पण ऑगस्ट २०२५ मध्ये मात्र अचानक तो वाढला. त्याला कारणे अर्थातच अर्थशास्त्रीय आहेत. आधीच्या उच्च बेस इफेक्टचा परिणाम कमी झाल्यामुळे ही वाढ नोंदवली गेली असा अर्थशास्त्रीय निष्कर्ष आहे, पण सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे तर जनता अगोदरच महागाईने मेटाकुटीला आली होती, त्यात आता या किरकोळ महागाईमुळे ती जेरीस आली आहे. बेस इफेक्ट म्हणजे अगोदरच्या वर्षापेक्षा या वर्षीत किती किमती बदलल्या आहेत आणि त्या निकषावर महागाईचा फटका जास्त बसत आहे. महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला देण्यात आले होते. त्या निकषानुसार पाहिले असता हा महागाईचा दर सामान्यतः आटोक्यात आहे. पण जनतेला या विश्लेषणाची सवय नसते आणि तिला महागाईचे कारण काय याच्या कारणातही काहीही रस नसतो. त्यांना रस असतो तो महागाई किती आहे आणि कोणती स्वस्त वस्तू आहे आणि कोणती महाग आहे यातच. त्या दृष्टीने निश्चितच हा दर चिंताजनक आहे. यंदा पावसामुळे कित्येक धान्ये सडून गेली आहेत आणि कित्येक पिकं तर येण्याची शक्यताच दिसत नाही. या परिस्थितीत धान्य महागाई काही प्रमाणात का होईना पण वाढली आहे. मोदी सरकारसाठी ही भूषणावह बाब नाही. कारण मोदी यांनी सबका साथ सबका विकास असा नारा दिला होता आणि त्यामुळे ते सत्तेवर येताच जनतेला हायसे वाटले होते.काँग्रेसच्या काळात महागाईने कहर केला होता आणि साध्या गोष्टी जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या होत्या. मोदी सरकार सत्तेवर येताच जनतेला 'अच्छे दिन' आल्याची खात्री पटली होती. पण अचानक महागाईच्या दरात किरकोळ का होईना पण वाढ झाल्याचे दिसल्याने जनता त्रस्त आहे. त्यातच आगीत तेल ओतणारे विरोधक विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्यासारखे विरोधक काँग्रेसचे नेते आणि शिवसेना उबाठाचे नेते याचा गैरफायदा घेणार यात काही शंका नाही. महागाईने अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो हे पाहिले असता असे लक्षात येते की महागाई ही बाजारात पैसा जास्त प्रमाणात आल्याने वाढते आणि पैसा कमी असल्यानेही वाढते. बाजारात पैसा जास्त झाला तर लोक हवी ती वस्तू मागेल त्या किमतीला खरेदी करतात आणि परिणामी महागाई वाढते. मोदी सरकार महागाईच्या बाबतीत पारदर्शक आहे आणि त्याने आकड्यांची कसलीही लपवालपवी केली नाही. ती काँग्रेसच्या काळात केली जायची. काँग्रेसने जो आरोप केला आहे, की गेल्या दहा वर्षांच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महागाईमध्ये सातत्याने भर पडली आहे. ती लोकांच्या रोषातून का व्यक्त होत नाही. कारण काँग्रेस खोटे बोलत आहे. जनता जर महागाईने त्रस्त असती तर मोदी सरकार कधीच उलथून पडले असते. पण जनता खुष आहे. त्यामुळे काँग्रेसचा दावा तकलादू आहे. पण हे निश्चित आहे की आता सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यांच्या तोंडावर महागाईचा दणका जनतेला बसला आहे, खास करून भाज्या आणि अंडी वगैरेची दरवाढ तर असह्य आहे. मोदी सरकार यातून काही तरी उपाययोजना काढेल यात काही शंका नाही. पण ग्राहक किंमत निर्देशांकात सतत नऊ महिने घसरणीनंतर ही वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणजे ऐन सणासुदीत अनेक वस्तूंच्या विशेष करून खाद्य पदार्थांच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे ही वाढ चिंताजनक तर आहेच. यावर उपाय म्हणजे सरकारने त्वरित काही तरी तोडगा काढून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा ही मागणी रास्त आहे. आर्थिक बाबतीत आपले अज्ञान असल्यामुळे महागाई वाढली की सरकारच्या नावाने बोंब ठोकायची अशी विरोधकांना सवय झाली आहे.ही महागाई सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली नाही. कारण या महागाईमुळे ग्राहकांसाठी वस्तूंच्या किमती आणि विशेष करून अन्नपदार्थांच्या किमती वाढू शकतात. हा परिणाम फारच नकारात्मक आहे आणि तो जास्त घातक आहे. १९९६ मध्ये दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत कांद्यांचे भाव चढले होते आणि त्यात सुषमा स्वराज सरकार याची आहुती पडली होती. तसे आता होणार नाही. पण मोदी सरकारने किरकोळही धोका पत्करण्याची तयारी दाखवू नये. कारण या किरकोळ महागाईमुळे रिझर्व्ह बँकेच्या धोरणात बदल होणार नसला तरीही जनतेला महागाईने पिडले आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही. तेव्हा महागाईवर सामान्य जनतेला दिलासा देण्याचा विचार तर सरकारने करायलाच हवा. हवामान बदलाचा परिणाम महागाईवर जाणवतो आणि त्याचाच फटका जनतेला बसला आहे. ग्राहकाना विशिष्ट वस्तूसाठी अधिक किमतीचा सामना करावा लागेल. कॅस्केडिंग इफेक्ट म्हणतात तो म्हणजे या किंमत वाढीचा परिणाम इतर वस्तूंच्या किमतीवरही होईल आणि ग्राहकांना त्याचे जास्त दाम मोजावे लागतील. आरबीआयच्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा ही वाढ कमी असली तरीही ऐन सणासुदीच्या काळात अन्नधान्य आणि भाज्या यांच्या किमतीत वाढ होणे हे चिंताजनक आहे. सारांश काय तर सरकारला यावर काही तरी तातडीचा उपाय शोधणे आवश्यक झाले आहे. आता मोठ्या निवडणुका नसल्या तरीही जनतेच्या कल्याणासाठी सरकारने काम करायला हवे आणि तसे ते जनतेला दिसायला हवे. त्यानुसार महाराष्ट्र आणि मोदी सरकारे वागतील अशी आशा आहे. कोणतेही सरकार नेहमीच लोकांच्या रडारवर असते आणि त्यानुसार मोदी सरकार असणार. पण तसे होऊ न देण्याची खबरदारी मोदी सरकारने घ्यायला हवी. कारण मोदी यांनी अच्छे दिन आणण्याची ग्वाही दिली होती. ती त्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

# जीएसटीची कक्षा व इंधनदर

**'एक देश, एक कर' हे केंद्र सरकारचे धोरण आहे. असे असताना, केंद्र सरकारने पेट्रोलजन्य पदार्थांना 'जीएसटी'च्या कक्षेत न आणणे योग्य आहे का ? तसा प्रस्ताव केंद्र व राज्ये का मांडत नाहीत?**

— — — — — — — — — —

पेट्रोल व डिझेल यांचा समावेश वस्तू व सेवा करात (जीएसटी) करण्याचे सरकारचे नजीकच्या भविष्यात कोणतेही नियोजन नाही, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत राज्यांनी निर्णय घेणे आवश्यक असून राज्यांना तसा प्रस्ताव योग्य वाटल्यास 'जीएसटी' परिषदेच्या बैठकीत त्यावर चर्चा करून निर्णय होईल, हे त्यांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोल व डिझेलच्या किमतींच्या बाबतीत कोणतीही पारदर्शकता व विश्वासार्हता नाही. त्यामुळे पेट्रोलजन्य पदार्थांचा समावेश 'जीएसटी'मध्ये करणे देशातील जनतेच्या हिताचे आहे. 'जीएसटी' सुधारणासंबंधीचा मूळ प्रस्ताव हा केंद्र सरकारचा असताना, पेट्रोल व डिझेलसंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकार अथवा भाजपशासित राज्ये 'जीएसटी' परिषदेत का सादर करीत नाहीत?

सरकार वसूल करीत असलेले कर व तेल कंपन्याच्या प्रचंड नफ्यामुळे ग्राहकांना पेट्रोल व डिझेलसाठी मूळ दरापेक्षा प्रत्यक्षात फारच जास्त रक्कम मोजावी लागते. उदा. ८ सप्टेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा दर प्रती बॅरल ६८.३९ डॉलर होता. एका डॉलरचा दर ८८.०७ रुपये, म्हणजे एक लिटर कच्च्या तेलाचा दर ३७.८८ रुपये येते. यात आयात खर्च, वाहतूक खर्च, तेल शुद्धीकरणाचा खर्च तसेच वितरकाच्या कमिशनचा विचार करता पेट्रोलचा दर प्रतिलिटर कमाल ४४ रुपये येते. प्रत्यक्षात ग्राहकाला प्रतिलिटर साधारण १०४ रुपये मोजावे लागले. म्हणजेच प्रतिलिटर ६० रुपये केंद्र व राज्य सरकारचे विविध कर व तेल कंपन्यांच्या नफ्याचे झाले. आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५च्या पहिल्या तिमाहीपर्यंत केंद्र व राज्य सरकारांना पेट्रोल व डिझेलवरील करापोटी एकूण ३६ लाख, ५८ हजार, ३५४ कोटी रुपयांचे प्रचंड उत्पन्न मिळाले. त्यात केंद्र सरकारला २२ लाख, २१ हजार ३४० कोटी रुपयांचे, तर राज्य सरकारांना १४ लाख, ३७ हजार १४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. २०२४-२५ मध्ये केंद्र सरकारला पेट्रोल व डिझेलच्या करापासून चार लाख १५ हजार १८१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. याव्यतिरिक्त केंद्र सरकारला तेल कंपन्याकडून लाभांश व कंपनी कराची मिळणारी रक्कमही हजारो कोटी रुपयांची असते.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर मोठ्या प्रमाणात कमी होऊन चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २५ तेल कंपन्याच्या नफ्यात १०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. इंडियन ऑईलचा नफा ५६८९ कोटी रुपये (११५ टक्के वाढ), 'बीपीसीएल'चा ६१२४ कोटी रुपये (१०३ टक्के वाढ ), एचपीसीएलचा ४३७१ कोटी रुपये (११२८ टक्के वाढ). या तिन्ही सरकारी मालकीच्या



कंपन्यांच्या एकत्रित नफ्यात अडीचपट वाढ झालेली आहे.

**अन्यायकारक बदल**

तेल कंपन्या १५ जून २०१७पर्यंत पेट्रोल व डिझेलचा दर दर १५ दिवसांनी निश्चित करीत असत. परंतु जनतेच्या व पेट्रोलपंप मालकांच्या विरोधाला न जुमानता सरकारने ही पद्धत बंद करून १६ जून २०१७पासून पेट्रोल व डिझेलच्या दरांत बदल रोज लागू करण्यास सुरुवात केली. नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर कमी झाले तरी त्याचा फायदा ग्राहकांना न देता तो फायदा सरकारला व तेल कंपन्यांना मिळावा म्हणून सरकारने २२ मे २०२२पासून ती पद्धतही बंद केली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरांत ३० ते ३८ टक्के घट होऊनही त्याचा फायदा ग्राहकांना मिळाला नाही. रशियाकडून आपण ४० टक्के कच्च्या तेलाची खरेदी अत्यंत सवलतीच्या दराने करीत असल्यामुळे सरकारला फार मोठा फायदा झाला. मात्र त्याचा फायदा ग्राहकांना झाला नाही. उलट १ एप्रिल २०२५पासून केंद्राने पेट्रोल व डिझेलच्या उत्पादन शुल्कात लिटरमागे दोन रुपये वाढ केल्याने सरकारच्या उत्पन्नात प्रतिवर्षी ३२ हजार कोटी रुपयांची वाढ झाली.

तेल कंपन्या (सरकारच्या संमतीने) ठरवत असलेल्या पेट्रोलजन्य पदार्थांच्या दरात कोणतीही पारदर्शकता व विश्वासार्हता नाही. सरकार पेट्रोल व डिझेलवर करआकारणी करताना ग्राहकांवर अन्यायकारक बोजा टाकते. उदा. राज्यांनी मूल्यवर्धित कराची (व्हॅट) आकारणी करताना ती पेट्रोल व डिझेलच्या मूळ दरांत करणे आवश्यक असते. परंतु प्रत्यक्षात राज्य सरकारे पेट्रोल व डिझेलच्या मूळ दरांत केंद्र सरकार आकारीत असलेली उत्पादन शुल्काची रक्कम मिळवून त्यावर मूल्यवर्धित कराची आकारणी करतात. कर आकारणीची ही अन्यायकारक पद्धत बंद केल्यास पेट्रोलचे दर प्रतिलिटर ५.१५ रुपये, तर डिझेलचे दर ४.१० रु. प्रतिलिटर कमी होऊ शकतात. तसेच राज्य सरकारे व्हॅट आकारणी उत्पादन शुल्काप्रमाणे विशिष्ट रकमेची न करता ती टक्केवारीवर करतात. त्यामुळे ग्राहकांना पेट्रोल व डिझेलचे वाढलेले दर व त्या दरावर भरावा लागणारा व्हॅट असा दुहेरी फटका बसतो.

तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढलेले आहेत, असे सांगून त्याआधारे दरांत वाढ करीत असतात. प्रत्यक्षात तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातून रोज कच्चे तेल खरेदी करीत नाहीत. कच्च्या तेलाच्या किमती कमी असताना त्या देशातील संबंधित तेल कंपन्यांशी त्या करार (किमान तीन महिन्यांचा) करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरांत मोठी वाढ झाली तरी तेल कंपन्या वाढीव दराने नव्हे, तर कराराप्रमाणे कमी किमतीत कच्चे तेल खरेदी करीत असतात. वास्तविक पेट्रोल व डिझेलचे दर नियंत्रणमुक्त करताना, आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी झाल्यास त्याचा फायदा ग्राहकांना दिला जाईल, असे आश्वासन केंद्राने जनतेला दिलेले होते. परंतु हे दर घटले तरी सरकार करामध्ये व कंपन्या त्यांच्या नफ्यामध्ये वाढ करून त्याचा फायदा जनतेला देत नाहीत, हा अनुभव आहे.

**केंद्र व राज्यांचा विरोध**

पेट्रोल व डिझेल 'जीएसटी'च्या कक्षेत आणल्यास त्यांच्या दरांत काही प्रमाणात पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण होईल, कररचना सुलभ होऊन ग्राहकांवरील कराचा बोजा मोठ्या प्रमाणावर कमी होईल. तसेच भाववाढ कमी होऊन अर्थव्यवस्था मजबूत होईल. परंतु पेट्रोल व डिझेल 'जीएसटी'खाली आणल्यास आपले उत्पन्न मोठ्या प्रमाणावर कमी होईल, या भीतीमुळे केंद्राचा व राज्य सरकारांचा याला विरोध आहे. 'लोककल्याणकारी राज्या'च्या संकल्पनेशी संबंध नसलेल्या; परंतु केवळ निवडणुका जिंकण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या आर्थिक शिस्तीला बाधक व अर्थव्यवस्थेला घातक अशा योजनांवर केंद्र सरकार व राज्य सरकारे दर वर्षी काही लाख कोटी रुपये खर्च करीत असतात. त्याचा आर्थिक भार पेट्रोलजन्य पदार्थांच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांवर पडतो आहे. सरकारने या योजना बंद केल्यास व अनावश्यक खर्चाला आळा घातल्यास पेट्रोल व डिझेलचा समावेश 'जीएसटी'मध्ये करणे शक्य आहे. सरकार हे करील का, हा प्रश्नच आहे.(साभार म.टा)

**ॲड. कांतिलाल तातेड**

# जेईई, नीटमधून खरोखरच योग्य पारख होते का?



अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखेत प्रवेश हा गेल्या काही दशकांत पाल्य आणि पालक दोघांसाठीही शिवधनुष्य पेलण्याची परीक्षा घेणारे स्वयंवर होऊन बसले आहे. त्यासाठी अगदी सातवी- आठवीपासून हजारो रुपये फी असलेले ट्युशन क्लासेस, अन् मग कोटा, नारायणा, चैतन्यसारख्या ट्युशन इंडस्ट्रीतील छळवादी पिळवणूक हे नित्याचेच झाले आहे. याचे कारण आहे जेईई किंवा नीट सारख्या प्रवेश परीक्षांचे काठिण्य पातळी अधिकाधिक वाढविणारे स्वरूप. जेईई क्रॅक करणे म्हणजे गगनाला गवसणी घालणे! ही एकूणच पद्धत इतकी तांत्रिक, जीवघेणी झाली आहे की त्यापायी अनेक तरुण मानसिक विकृतीचे बळी ठरले आहेत. नैराश्यापोटी आत्महत्या करताहेत. खर्चामुळे अनेक पालकांचे दिवाळे निघत आहे, पण या दुष्परिणामांची कुणालाही चिंता नाही. हे सगळे बदलावे, सुधारावे असे कुणालाही वाटत नाही.

मुख्य म्हणजे अशा संस्थांतील प्रवेशासाठी एवढ्या कठीण परीक्षेची मुळात गरज आहे का? या दिव्यातून पार पडलेले अर्जुन, एकलव्य खरेच पुढे काय करतात? आयआयटीच्या नावामुळे त्यांना पटकन नोकरी मिळते, सहज परदेशी जाता येते हे खरे असले तरी खरेच ही मुले शहाणी होतात का? ज्ञान प्राप्त करणे अन् सर्वार्थाने शहाणे (विवेकी) होणे यात फरक आहे. ही मुले मुळात सर्वार्थाने हुशार असती तर आतापर्यंत आयआयटीच्या एकाही विद्यार्थ्याला वा प्राध्यापकाला नोबेल पुरस्कार का मिळाला नाही, यावरही विचार केला जाणे गरजेचे आहे.

आयआयटी परीक्षेची काठिण्य पातळी आणि त्यासाठी लागणाऱ्या तयारीचे स्वरूप लक्षात घेता ती श्रीमंत वर्गाची मक्तेदारी होऊन बसली आहे, हे स्पष्टच आहे. सामान्य घरातील, लहान गावखेड्यांतील मुलांसाठी हे अजूनही हाती न लागणारे दिवास्वप्नच ठरत आहे. विज्ञान गणितात येणारे प्रश्न सोडविता येणारेच तेवढे विद्वान आणि बाकी सगळे सरसकट सामान्य असे हे समीकरण सपशेल चुकीचे आहे. (आयआयटीत अध्ययन अध्यापन दोन्ही केले असल्याने मी हे विधान जबाबदारीने करतो आहे).

जर आयआयटीचे दरवाजे सामान्य गावातील गरीब मुलांसह सर्वांसाठी सताड उघडायचे असतील तर या परीक्षेचे स्वरूप आरपार बदलायला हवे. आधी मुलांचा बुद्ध्यांक तपासावा. त्याला तार्किक विचार करता येतो की नाही हे पाहावे. एखाद्या घटनेकडे, प्रश्नाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन त्याच्यापाशी आहे का, हे तपासावे. कुठल्याही कठीण परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी करावी लागणारी विश्लेषण क्षमता ताडून पाहावी. गणितातली सूत्रे, विज्ञानातली उदाहरणे सोडविण्याची बुद्धी क्षमता तपासतानाच, त्याची भावनिक प्रगल्भता (इक्यू) बघावी. कारण बाकी इतर गोष्टी तो/ ती आयआयटीत आल्यावर शिकणारच आहे.

महत्वाचे म्हणजे त्याचे व्यक्तिमत्व इंजिनियर किंवा डॉक्टर होण्यायोग्य आहे का हे बघणे जास्त गरजेचे आहे. अन्यथा एखाद्या स्ट्राँग रुमच्या कुलुपासाठी चुकीची किल्ली शोधण्यासारखे होईल. नव्हे सध्या तेच होत आहे.मुळात ज्या संस्थेच्या नावात टेक्नॉलॉजी आहे तिथे व्याख्येप्रमाणे ते तंत्रज्ञान (इंडस्ट्री प्रोसेस, प्रॉडक्टिव्हिटी, डिझाईन) किती शिकवली जाते, हा प्रश्नच आहे. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग नाव असलेल्या अभ्यासक्रमात नेमके सायन्स किती आणि इंजिनियरिंग किती, कोणते याचा कुणी शोध घेतला आहे का? विचार केला आहे का? सुशिक्षित पालकदेखील हा विचार करत नाहीत. मग कोवळी अपरिपक्व मुले कसला विचार करणार? कोणतीही गोष्ट गांभीर्याने न घेतल्याचा हा परिणाम आहे. शिक्षण, त्यातही इंजिनियरिंग मेडिकलचे उच्च शिक्षण हा असा हलक्यात घेण्याचा विषय नाही. आपण कोणतीच गोष्ट गांभीर्याने घेत नाही. पाल्य, पालक, शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक, निर्णय घेणारे शासक अधिकारी, सरकारातले निवडून आलेले मंत्री सगळेच शिक्षणाच्या बाबतीत इतके अनभिज्ञ कसे याचे आश्चर्य वाटते.

आता तर आयआयटीची संख्या किती तरी पटींनी वाढली आहे. त्यात एनआयटीजची भर पडली आहे. यात प्रवेश घेणाऱ्यांची संख्याही कितीतरी पटींनी वाढली आहे. तेव्हा हे प्रवेश केवळ श्रीमंतांची मक्तेदारी म्हणून न राहता, सर्वसामान्य गरीब पण हुशार विद्यार्थ्यांसाठीदेखील सुलभ झाले पाहिजेत. त्याची सध्याची एकूण प्रक्रिया (प्रोसेस) काठिण्य पातळी बदलली पाहिजे. एकूणच प्रवेशाचे निकष बदलले पाहिजेत. जे पूर्वापार चालत आले आहे ते गेल्या काही दशकांतील बदल अन् भविष्यातील वेगळ्या गरजा लक्षात घेता मुळापासून बदलले पाहिजे. थोडक्यात कोऱ्या पाटीवर नवा अध्याय लिहिण्याची गरज आहे. ट्युशन इंडस्ट्रीला आळा घालायचा, कोवळ्या मुलांवरील ताण कमी करायचा तर हे बदल तातडीने व्हायला हवेत.

**विजय पांढरीपांडे**

## जगभरात स्थलांतरितांची स्थानिकांना धग

बाहेरून आलेल्या स्थलांतरितांची मूळ स्थानिक लोकांना आता चांगलीच धग बसू लागल्याने जगातील अनेक देशात त्यांच्या विरोधात मोर्चा काढून संतापाचा उद्रेक होऊ लागला आहे. स्टीफन याक्सली-लेनन उर्फ टॉमी रॉबिन्सन यांच्या नेतृत्वाखाली लंडनमध्ये नुकतीच 'युनाईट द किंगडम' नावाची इमिग्रेशन विरोधी रॅली काढण्यात आली.या रॅलीमध्ये सुमारे १ लाख लोक निदर्शने करण्यासाठी जमले होते. अलीकडेच अमेरिकेत हत्या झालेल्या आणि स्थलांतरितांविरोधात कडक भूमिका घेतल्या चार्ली कर्कला या रॅलीमध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली. काही दिवसांपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या सिडनी, मेलबर्न आणि इतर प्रमुख शहरांमध्ये स्थलांतर विरोधी 'मार्च फॉर ऑस्ट्रेलिया' रॅली काढण्यात आली. त्यासाठी हजारो नागरिक रस्त्यावर उतरले होते.स्थलांतरितांमुळे त्यांची संस्कृती, रोजगार, वाहतूक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पायाभूत सुविधा, पर्यावरणीय विनाश अशा सर्वच गोष्टींवर परिणाम होत असल्याचे त्यांचे म्हणणे होते.दुसरीकडे पोलंडची राजधानी वॉर्सा ते आयर्लंडची राजधानी डब्लिनसह पश्चिमेकडील अनेक देशांमध्ये स्थलांतर विरोधी भावना तीव्र होत चालल्या असून रस्त्यावर उतरून घोषणाबाजी, स्थलांतर विरोधी फलक आणि ज्वलंत भाषणांमधून निदर्शक मोर्चे काढत आहेत. स्थलांतरित लोक गुन्हेगारी वाढवतात, स्थानिकांच्या नोकऱ्या आणि रोजगार बळकावतात असे आरोप करणाऱ्या स्थानिक लोकांची स्थलांतरविरोधी चळवळ येत्या काळात थोपवणे ही जागतिक समस्या बनणार हे नक्की.

**-प्रदीप मोरे**

## शहर बसमध्ये लोंबकळत करावा लागतो प्रवास

शहर बसमध्ये प्रवाशांना दाराच्या शेवटच्या पायरीवर उभे राहून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे कोणत्याही वेळी अघटीत घटना घडल्यास जबाबदारी कोण घेईल असा प्रश्न प्रवासी करीत आहेत. विशेष म्हणजे शहर बसमध्ये तिकीट तपासणीस असलेली एक तरुणीच प्रवाशांना अशा प्रकारचा प्रवास करावयास भाग पाडत आहे.शहरात सुरू असलेल्या शहर बसेसमधील नवसारी किंवा विद्यापीठात जाणा-या बसेस ह्या दररोज खचाखच भरून जातात. बसेसमध्ये सर्वसामान्य नागरिकांसह शासकीय कार्यालयांमधील कर्मचारी, शाळा, महाविद्यालयांमध्ये जाणा-या विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने असतात. बसेसच्या मागील दाराच्या शेवटच्या पायरीपर्यंत प्रवाशी खचाखच भरलेले असतात. त्यामुळे बसमध्ये बसणारे प्रवाशी समोरील दारातून आत चढण्याचा प्रयत्न करतात, मात्र तिकीट तपासणीस असलेली तरुणी समोरील दारातच उभी असते व ती कोणालाही समोरील दारातून आत येवू न देता मागील दारातून जाण्यास भाग पाडते. बसेसच्या मागील दाराच्या शेवटच्या पायरीपर्यंत आधीच प्रवाशी लोंबकळत प्रवास करीत असतांनाही ती तिकीट तपासणीस मात्र समोरील दारातून प्रवाशांना घेत नाही. अशावेळी नाईलाजास्तव नागरिकांना मागील दारातूनच उभे राहून प्रवास करावा लागतो. प्रवासादरम्यान कोणत्याही वेळी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रल्हाद खांडेकर**
**अमरावती**

## शिवसेनेची वाटचाल आणि पुढील आव्हाने

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात संभाव्य युतीची चर्चा सुरू आहे. दोन्ही पक्षांनी हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली होती. यामुळे मराठी भाषिक मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली, पण यामुळे हिंदी भाषिक मतदार त्यांच्यापासून दुरावण्याची शक्यता आहे. मुंबईसारख्या शहरात मराठी टक्का कमी झाल्यामुळे केवळ मराठी मतांवर अवलंबून राहून निवडणूक येणे आता शक्य नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नाशिक महानगरपालिकेत केलेल्या कामाचा अनुभव जनतेने घेतला आहे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेलाही जनतेने आजमावले आहे. त्यामुळे हे दोन भाऊ एकत्र आले तरी त्याचा आगामी निवडणुकांवर फारसा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे.

**अविनाश देशपांडे**

## नात्यातील कटुता धोकेदायक

संशयावरून पतीने पत्नीचा खून केला किंवा पत्नीने कोणाच्या तरी मदतीने पतीचा खून केला अशा पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणाऱ्या बातम्या आता सर्रास ऐकायला किंवा वाचायला मिळतात. पती पत्नीचे नाते, हे इतर नात्यापेक्षा खूप वेगळे असते. आयुष्यभर एकमेकांची सोबत देण्याचे वचन या नात्यात दिले जाते. पती पत्नीचे नाते समजूतदारपणाचे तसेच विश्वासावर आधारलेले असते. मात्र हाच समजूतदारपणा आणि विश्वास नाहीसा झाला तर नात्यात कटुता निर्माण होते आणि याच कटुतेचे रूपांतर कधी कधी भयानक स्वरूपामध्ये होते. त्यामुळे दोघांनी योग्य तो संवाद साधून आपल्या नात्यातील कटुता दूर करावी. संवादानेही प्रश्न सुटू शकतात. जर संवादानेही कटुता दूर होत नसेल तर समुपदेशकांकडे जाऊन सल्ला घेणे उपयुक्त. -

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'सेवालाल महाराज की जय' घोषणांनी घाटंजीनगरी दुमदुमली

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - महाराष्ट्रातील बंजारा तत्सम जमातीला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. काल घाटंजी येथे सकल बंजारा कृती समितीच्या वतीने संत सेवालाल मंदिर प्रोफेसर कॉलनी येथून वसंतराव नाईक चौकापासून ते पोलीस स्टेशन चौकातून तहसील कार्यालयावर बंजारा समाजबांधवांचा एकत्र येऊन हजारोच्या संख्येने तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला. या मोर्चादरम्यान बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी करणारे निवेदन घाटंजी तहसीलदार यांच्यामार्फत राज्य व केंद्र सरकारला सादर केला.

तहसील कार्यालयावर निवेदन सादर करून बंजारा समाजाने आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण द्या. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे स्वतंत्र आरक्षण मिळावे या मागणी करीता घाटंजी तालुक्यातील बंजारा समाजाने तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला निवेदन सादर केले.संपुर्ण भारतातील बंजारा समाजाची सांस्कृतिक समानता, समान बोली भाषा, वेशभुषा, जिवनशैली, पारंपारीक पध्दती, रोटी-बेटी व्यवहार देवधर्म, धर्मगुरु संत सेवालाल महाराज यांची उपासना ही सर्व समान असूनही इतर राज्यात अनुसूचित जमाती मध्ये असलेला बंजारा समाज महाराष्ट्रात मात्र एस.टी. आरक्षणापासून वंचित आहे. राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोगाने अनेक वेळा समाजाला एस.टी. प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र व राज्य शासनाला केलेली आहे. हैद्राबाद राज्याच्या सन १९२१ च्या गॅझेटमध्ये बंजारा/लंबाडी समाजाचा स्पष्ट उल्लेख ट्रायलबल कम्युनिटी म्हणुन आहे. तेलंगणा, आंध्रप्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान इत्यादी राज्यात बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गात समाविष्ट केले गेले आहे. युनेस्कोच्या नोमॅडीक ट्राईबस् स्टडीमध्ये बंजारा समाजाला प्रिमीटीव्ह ट्रायलबल ग्रुप म्हटले आहे. महिलांचे व मुलांची दैनिय स्थिती युनिसेफ या जागतीक संघटनेने नोंद केली आहे. बंजारा हे सर्व ट्रायबल डिप्रीव्हेशनला सुसंगत असूनही एस.टी. दर्जा नसल्यामुळे बंजारा समाजाचे सामाजिक व आर्थिक स्तर खालावली असल्याची भावना समाजाकडून व्यक्त करण्यात येत आहे.सकल बंजारा समाजाकडुन निवेदन सादर करून आजवर बंजारा समाजाचा इतिहास, परंपरा, जिवनशैली शैक्षणिक,सामजिक आर्थीक स्थिती बघितल्यास बंजारा समाज अनुसुचित जमाती (एस टी) प्रवर्गात समाविष्ट होण्यास पात्र असून केवळ महाराष्ट्र राज्यात वि.जे.एन.टी. प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले आहे.

# बेरोजगारांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या 'सर्वत्र शिक्षा समिती'चा मनसेकडून भांडाफोड

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्ह्यातील बेरोजगार युवकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या 'सर्वत्र शिक्षा समिती' या संस्थेचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) भांडाफोड केला. मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिक्षणाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन संबंधित संस्थेवर आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. बेरोजगार युवकांनी अशा फसव्या जाहिरातींना बळी पडू नये, असे आवाहन मनसेचे अनिल हमदापुरे यांनी केले.

जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिकात 'सर्वत्र शिक्षा समिती'च्या नावाने संस्कार शिक्षक आणि केंद्रप्रमुख पदासाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. नोकरीसाठी अर्ज करताना उमेदवारांकडून 300 ते 400 अर्ज शुल्क आणि निवडीच्या वेळी 15,500 "सिक्युरिटी डिपॉझिट" घेत असल्याच्या तक्रारी मनसेला प्राप्त झाल्या. जिल्ह्यातील बेरोजगार युवकांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुबाडणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला. मनसेचे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार आणि अनिल हमदापुरे यांनी संबंधित संस्थेच्या उमरसरा येथील कार्यालयावर धडक दिली.



यावेळी शिक्षण विभाग झोपा काढत असल्याचा आरोप करत प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. शिक्षणाधिकारी मिश्रा आणि पोलीस अधीक्षक थोरात यांची भेट घेऊन तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक थोरात यांनी चौकशी केली असता, संबंधित संस्थेला कोणत्याही शासकीय भरतीसाठी किंवा आर्थिक व्यवहारांसाठी परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले.

तरीही ही संस्था शासकीय स्वरूपाच्या जाहिराती प्रसिद्ध करून बेरोजगारांची दिशाभूल करत असल्याचे उघडकीस आले. यानुसार पोलीस ठाण्याला गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. मनसेच्या आंदोलनामुळे अनेक बेरोजगारांचे होणारे आर्थिक नुकसान थांबणार असून, युवकांनी अशा फसव्या जाहिरातींपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले. या आंदोलनात मनसेचे कार्यकर्ते लकी छागाणी, सोनू गुप्ता, तुषार चोडके, सौरभ अनसिंगकर यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# एसटी आरक्षणच्या मागणीसाठी बंजारा समाजाचा हजारोच्या संख्येने तहसील कार्यालयावर एल्गार

## नको आम्हाला कुणाचं आरक्षण आम्हच्या हक्काच

जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागु करून अनुसूचित जमाती प्रवर्गा साठी समस्त बंजारा समाजाला एसटीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी घेऊन दिग्रस तालुक्यातील वाशिम सह विदर्भातून हजारो महिलांसह बंजारा बांधव हजारोच्या संख्येने तहसील कार्यालयावर धडकले अनेकांनी घोषणाबाजी देत "एकच नारा आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं" व जय सेवालाल.! च्या गजराने तहसील परिसर दुमदुमून टाकला

दिग्रस शहरातील स्थानिक वसंतरावजी नाईक व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून शहराच्या मुख्य मार्गाने मार्गक्रमण करून छत्रपती शिवाजी महाराज चौक लाठी वाला पेट्रोल पंप ते तहसील कार्यालय येथे शांतता प्रिय मार्गाने मोर्चा काढण्यात आला होता. तहसील कार्यालयावर येऊन नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांना बंजारा बांधवांनी निवेदन देण्यात आले यावेळी हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. महाराष्ट्र राज्यातील बारा जमातीता हैद्राबाद गॅझेट व सी.पी. ॲंड. सी. पी ॲंड बेरार प्रीन्हिंस मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करा.



बंजारा आरक्षण कृती समिती महाराष्ट्र राज्यातील सर्व बंजारा समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने नुकतेच मराठा समाजाकरीता हैद्राबाद गॅझेटचा आधार घेऊन आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, सदर हैद्राबाद गॅझेटमध्ये १९२० लंबाडा, ज्यांना बंजारा किंवा सुगल असेही म्हणतात, ही एक मोठी भटकंती जमात आहे जी संपूर्ण हैदराबाद राज्यात विशेषतः बेरार आणि मराठवाडा प्रदेशाच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने आढळते. त्यांना एक वेगळी जमात, वेगळ्या हिंदू जाती म्हणून ओळखले जाते, असा उल्लेख आहे.आधप्रदेश व तेलंगणा या राज्यामध्ये बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण धोरण लागू आहे. भाषावार प्रांत रचनेनंतर आंध्रप्रदेशातून महाराष्ट्र राज्यात समावेश झालेल्या नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) उस्मानाबाद, बीड, जालना, लातूर, हिंगोली या जिल्ह्यांतील बंजारा जमातीला पूर्वी आंध्रप्रदेशामध्ये अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळत होते. तसेच सी.पी. ॲण्ड बेरार प्रोव्हिन्समध्ये येत असलेल्या जिल्ह्यातील बंजारा जमातीला आदिवासीचे आरक्षण मिळत होते. त्यामुळे बंजारा समाज अनुसूचित जमातीचे आरक्षणाकरीता पात्र ठरतो. परंतु बंजारा समाज आजही अनुसूचित जमातीचे आरक्षणांपासून वंचित असल्याने या समाजावर अन्याय झालेला आहे. त्यामुळे बंजारा समाजामध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. जिल्ह्यातील बंजारा जमातीसह महाराष्ट्र राज्यांतील इतर सर्व जिल्ह्यांतील बंजारा जमातीला अनुसुचित जमातीचे आरक्षण लागू करण्यात यावे,अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात नमूद आहे.

# गरिबीला हरवून आकाशाची झेप

## पांढरकवडा शहरातील आकाश प्रकाश वल्लमवारची यशोगाथा प्रेरणादायी

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - भोवती काळोख होता.परिस्थिती प्रतिकूल होती. पण त्या काळ्याकुट्ट अंधारातही शिक्षणाची जिद्द,ज्ञानाची ओढ,आणि काहीतरी मोठं करून दाखवायची आस सतत पेटलेली होती.हीच जिद्द पांढरकवडा येथील आकाश प्रकाश वल्लमवार यांना आयुष्यात यशस्वी बनवणारी ठरली.आदिवासी तालुका म्हणून ओळख असलेल्या केळापूर तालुक्यातील पांढरकवडा शहरातील सिंघानिया नगर येथील सर्वसामान्य कुटुंबात वाढलेला आकाश घरी कोणतेही शैक्षणिक वातावरण नसतानाही शिक्षणाच्या वाटेवरून कधीच डगमगला नाही.



घरातील आर्थिक अडचणी, साधनसामग्रीचा अभाव आणि अनेक अडथळ्यांवर मात करत त्याने रसायनशास्त्रात एम.एस्सी व बी.एड पूर्ण केले. इतकेच नव्हे तर पुण्यातील प्रसिद्ध Allen Career Institute मध्ये अध्यापनाची नोकरी करत असतानाच त्याने नेट (National Eligibility Test) या राष्ट्रीय स्तरावरील कठीण परीक्षेत रसायनशास्त्र विषयात घवघवीत यश मिळवले आणि आपल्या गावाचे नाव उंचावले.आकाशने मिळवलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आणि स्तुत्य आहे.जिद्द,चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर गरीबीतही मोठं स्वप्न पूर्ण करता येतं हे त्याने आपल्या कर्तृत्वाने सिद्ध करून दाखवले आहे.त्यांच्या यशामागे आई-वडील यांचे प्रोत्साहन व काका जयवंत भास्करराव वल्लमवार (जिल्हाध्यक्ष,विदर्भ बेलदार व तत्सम जाती समाज संघटना) यांचे मार्गदर्शन आणि स्व.जगदीश भास्करराव वल्लमवार यांचे आशीर्वाद या सर्वांचा मोलाचा वाटा आहे.या यशाबद्दल बोलताना आकाश वल्लमवार म्हणाले,"हे यश माझ्या पालकांचे व काकांचे आशीर्वाद,गुरुजनांची शिकवण,आणि माझ्या अखंड परिश्रमाचे फळ आहे.शिक्षणाच्या मार्गात आलेल्या प्रत्येक अडथळ्यावर मात करत,सातत्याने प्रयत्न केल्यानेच आज मी या टप्प्यावर पोहोचलो आहे.

माझे ध्येय म्हणजे पुढील पिढीसाठी प्रेरणास्थान बनणे आणि शिक्षणाचे महत्त्व प्रत्येक मुलापर्यंत पोहोचवणे."आकाशच्या या यशाबद्दल विदर्भ बेलदार व तत्सम जाती समाज संघटना सह सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.समाज बांधव, मित्रमंडळी, शिक्षकवर्ग तसेच स्थानिक पातळीवरील प्रतिष्ठित व्यक्तींकडून त्याचे अभिनंदन होत आहे. शहरात आनंदाचे वातावरण असून सर्वजण त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत आहेत.आकाशच्या कर्तृत्वाने पांढरकवडा शहरातील युवकांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.त्याची कहाणी ही केवळ यशोगाथा नसून, प्रत्येक ग्रामीण, आदिवासी आणि सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पुसद येथे विविध ठिकाणी (ईस्त्रो) शास्त्रज्ञ डॉ. प्रिया शेजुळे यांचा जाहीर सत्कार

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - पुसदची भुमी कन्या असलेल्या डॉ. प्रिया अशोक शेजुळे यांची प्रतिष्ठित भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. या यशामुळे पुसद शहराचे नाव उज्ज्वल झाले असून विविध क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

व पुसद येथील विविध संस्था व संघटनेद्वारे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यामध्ये दिनांक 11 सप्टेंबर रोजी अ.भा.महात्मा फुले समता परिषद व संत सावतामाळी.पत संस्थाद्वारे अध्यक्ष आत्माराम जाधव व व्यवस्थापक शिवाजी सारखे यांच्या वतीने हॉटेल दीप संध्या येथे सत्कार करण्यात आला. 12 सप्टेंबर रोजी जमाते-इस्लामी हिंद,पुसद शहरातील महिला विभागाच्या भगिणींनी विश्राम गृह येथे डॉ. प्रिया शेजुळे यांना भेट देऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. दिनांक 13 सप्टेंबर रोजी माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन यांच्या वतीने शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व मानचिन्ह देण्यात आले, तसेच गुलाब नवी



आझाद महाविद्यालय शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ.प्रिया शेजुळेचे भव्य शाल श्रीफळ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला, श्रीरामपूर येथील जिजामाता महिला नागरी पतसंस्था यांच्यावतीने सुद्धा शास्त्रीय देऊन सत्कार घेण्यात आला. यामध्ये जमात इस्लामी हिंद या संघटनेच्या भगिनींकडून डॉ.शेजुळे यांना मराठी कुरआन,'प्रेषित परिचय' यासह काही मौल्यवान धार्मिक व प्रेरणादायी पुस्तके भेट देण्यात आली. तसेच त्यांच्या पुढील भावी आयुष्यातील यशासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

# वेचक

## शेतकरी नैसर्गिक व आर्थिक संकटात असताना कर्ज वसुलीसाठी बॅंकांच्या नोटिसा : गोविंदराव देशमुख



महागाव - शासन एकिकडे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आसल्याच्या वल्गना करीत आहे आणि कर्ज वसुलीसाठी शेतकर्याला न्यायालयात खेचत आहे. मागील दहा वर्षांपासून शेतमालाचे भाव जैसे थे ठेऊन उत्पादन खर्चावर भरमसाठ वाढ होईल याचे पध्दतशीर नियोजन करुन शेतकर्याला आडचणीत आनन्याचेच काम सरकार करीत आहे. रासायनिक खत, फवारणी,मजुरी,काढणी,मळणी याचे दर बघीतले तर एकरी शुन्य नफा होत आसुन नैसर्गिक संकटे त्यात भर टाकत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आसतांना थकीत कर्ज वसुलीसाठी न्यायालयात खेचुन प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आत्महत्या करण्यास प्रवृत्त करीत आहे. आज माझ्यासह शेकडो शेतकऱ्यांना बॅंकेने न्यायालयात उपस्थित राहण्यासाठी नोटीस बजावल्या आहेत. सध्याची परीस्थितीत अतिवृष्टीमुळे हाती आलेला हंगाम हातुन जाण्याची भिती शेतकऱ्यांना भेडसावत आसतांना ह्या वसुलीसाठी नोटीस बजावल्या कारणाने शेतकरी भयभीत होऊन पुर्णपणे खचला आहे. त्यामुळे शासनाने ही वसुली तातडीने रद्द करुन निवडणूक पुर्वी दीलेल्या आश्वासना प्रमाणे संपूर्ण कर्जमाफी चा निर्णय घेऊन शेतकर्याला दिलासा द्यावा अन्यथा भंयकर वाईट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

## गावंडे महाविद्यालयाच्या बीबीए शाखेच्या सहा विद्यार्थ्यांची लॉंगेव्हिटा कंपनीत निवड

उमरखेड : येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या बीबीए शाखेतील द्वितीय वर्षाच्या सहा विद्यार्थ्यांची निवड इंटर्नशिपसाठी झाली आहे. दोन वर्षांपूर्वी संस्थेने सुरू केलेल्या बीबीए शाखेच्या विद्यार्थ्यांची निवड झाल्यामुळे महाविद्यालयाच्या यशाचा चढता आलेखही या निमित्ताने अधोरेखित झाला आहे. बीबीएच्या अमेय पांडे, तेजस खेडकर, प्रार्थना पटेल, अंकिता राठोड, प्रसाद देवसरकर, तेजस कदम या सहा विद्यार्थ्यांची इंटर्नशिपसाठी प्रसिद्ध अशा 'लॉंगेव्हिटा सेल्स अँड मार्केटिंग' या कंपनीने निवड केली आहे. ही निवड तीन महिन्यांसाठी असून महाराष्ट्रातील विविध शहरात या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण होणार आहे. बीबीए शाखेत प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस, प्रयत्न व नियोजन आहे, अशी माहिती प्रा. राणी तेला यांनी दिली. ही इंटर्नशिप त्यांना व्यावसायिक जगात प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी एक उत्तम संधी देईल, असा विश्वास मार्गदर्शक प्राध्यापकांनी व्यक्त केला आहे. प्रा. राणी तेला, प्रा. प्रवीण नखाते, प्रा. केशव तिवारी आणि प्रा. मेघा बिचेवार ह्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

## विडुळ येथे ओबीसीची चिंतन बैठक पडली पार

उमरखेड : ओबीसी समाजाच्या आरक्षणावर कुठल्याही प्रकारची कुरघोडी न होता त्यांचे शैक्षणिक राजकीय आरक्षणाचे न्याय - हक्क अबाधित ठेवण्यासाठी तालुक्यातील अनेक ठिकाणी सकल ओबीसी संघटन उमरखेडच्या वतीने संवाद दौरा चालू असून त्या अनुषंगाने आज रोजी ओबीसी समाजाची विडुळ सर्कल येथे चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती. आज रोजी विडुळ येथे ओबीसी समाजाची चिंतन बैठक विकास मुलंगे, संदीप हिंगमिरे, डॉ. शिवचरण हिंगमिरे यांच्या पुढाकाराने आयोजित कारणात आली होती. या बैठकीस ओबीसी नेते ॲड. संतोष जैन ,बाळासाहेब चंद्रे, सुनिल पाटील चिंचोलकर, दिलीप सुरते यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांकडून उपस्थित ओबीसी बांधवांना विविध विषयी मार्गदर्शन करण्यात आले. सरकारच्या निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या मनात अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली तसेच सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजावर होणाऱ्या दूरगामी परिणामावर सुद्धा चिंता व्यक्त केली. उपस्थित ओबीसी बांधवांनी १७ सप्टेंबर रोजी उमरखेड येथे होणाऱ्या ओबीसीच्या एल्गार मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचा निर्धार सुद्धा यावेळी बोलून दाखविला. यावेळी विडुळ येथील ओबीसी समाज बांधव मोठा संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता " सेवा पंधरवाडा" निमित्त भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन

वणी – राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता " सेवा पंधरवाडा" व भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे.याचाच एक भाग म्हणून यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष ॲड कुणाल चोरडिया यांच्या पुढाकारातून दिनांक १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजुंनी मोफत शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड कुणाल विजय चोरडिया यांची यांनी केले आहे.

# भोजला येथे शिवीगाळ करून तिघांना मारहाण

## सातजणाविरुद्ध गुन्हे दाखल ;परिसरात तणावपूर्ण शांतता

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - तालुक्यातील भोजला येथे रस्त्यात पाट्या लावल्याने एक जण घसरून पडला होता.या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करीत तिघांना सात जणांनी संगणमत करून जबर मारहाण केली आहे. ही घटना दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या दुपारी २ वाजताच्या दरम्यान घडली होती. मारहाणीच्या घटनेमुळे परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

पवन संतोष मोहकर वय २६ वर्षे रा.भोजला असे जखमीचे नाव असून त्याने दिलेल्या तक्रारीवरून गावातच राहणाऱ्या शेख रहीम शेख कलीम वय ६० वर्षे, शेख मोबीन शेख रहीम वय ३५ वर्षे,शेख नजीर शेख इब्राहिम वय ५५ वर्षे, शेख इस्राईल शेख मुसा वय ४० वर्षे,शेख रफिक शेख करीम वय ३० वर्षे, शेख समीर शेख जमीर वय २४ वर्षे व शेख आतिक वय २२ वर्षे या सात जणांविरोधात वसंत नगर पोलीस ठाणे मध्ये गुन्हे दाखल झाले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार भोजला येथे नवीन सिमेंट रोड झाला होता. त्यामुळे कोणी घसरून पडू नये म्हणून पवनने पाट्या लावून तात्पुरता रस्ता बंद केला होता. घटनेच्या दुपारी त्या रस्त्यावर शेख रहीम जात असताना पाय घसरून पडला होता.तेव्हा त्यांनी पवनला व त्याच्या भावाला शिवीगाळ करून तुमको देख लूंगा अशी धमकी देऊन तिथून निघून गेला होता. त्यानंतर शेख रहीम ने त्याच्या सहा साथीदारासोबत संगणमत करून बिरसा मुंडा चौकात येऊन पवन सोबत वाद निर्माण केला. त्यानंतर शेख मोबीन व शेख नजीर ने काठी व दगडाने पवनला मारहाण करून जखमी केले.त्याचवेळी पवनची आई व भाऊ मधात आला असता शेख इस्राईल,शेख रफिक, शेख समीर व शेख अतीक ने लाकडी काठी व दगडाने मारहाण केली. त्याचवेळी पवनच्या वडिलांना देखील मारहाण केली आहे. मारहाणी दरम्यान शेख इस्राईल याने हातात चाकू घेऊन जीवाने मारण्याच्या उद्देशाने पवनला जखमी केली आहे. त्यावेळी जातीवाचक शिवीगाळ करून जीवाने ठार मारण्याची धमकी दिली आहे. प्रकरणाचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हे करीत आहे.

# सलग चौथ्या वर्षी अदिती अबॅकसचा बक्षीस वितरण सोहळा साजरा

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - चाणक्य अबॅकस तर्फे 17 वी राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत महागाव येथील अदिती अबॅकस च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत मोठ्या गटातून प्रणिती आडे हिने पहिला क्रमांक, अवंती चोंडी कर हिने द्वितीय तर ज्योतिरादित्य पवार यांनी तृतीय कृपांक पटकवला आहे. त्याचप्रमाणे समर्थ देशमुख, सुयश कदम, सुजल कदम, नैतिक चंदापुरे यांनी विशेष प्राविण्यसह बक्षीस मिळविले आहेत.

त्यानंतर राजवी ढेपे, स्वरा देशमुख ,हर्ष देशमुख, गजानन कदम या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी पर नक्ष कांबळे, संजीवनी देशमुख अवनी ढेपे ,कृतिका पवार, श्रावणी देशमुख ,आराध्य आढाव, रितवी देशमुख, शिवांश वानखेडे, इंद्रनील देशमुख, सिद्धी देशमुख या विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन बक्षीस मिळवले आहे. या स्पर्धेचे बक्षीश वितरण आज महागाव येथे करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महागाव नगरपंचायत च्या नगराध्यक्ष सौ. सुनंदा कोपरकर मॅडम नगरसेविका मा. श्री जयश्रीताई नरवाडे टी .जी.देशमुख महाविद्यालयाचे सन्माननीय शिक्षक श्री आढाव सर, माजी नगरसेवक श्री राजूभाऊ राठोड व सौ. मेघा पवार मॅडम वैशालीताई देशमुख मॅडम यांनी आवर्जून आपली उपस्थिती कार्यक्रमाला दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या बक्षीसांसाठी आणि कार्यक्रमाची खास आकर्षण विद्यार्थ्यांचे डेमो यांची मान्यवरांनी आणि पालकांनी भरभरून कौतुक केले मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना अबॅकस शिकवणे ही काळाची गरज आहे. अबॅकस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकासाला कशी चालना मिळते याबाबत त्यांनी आपले विचार मांडले

आजची पिढी ही आकडे मोडी साठी पूर्णपणे कॅल्क्युलेटर सारख्या साधनावर अवलंबून आहे ही स्थिती पुढील पिढीची होऊ नये तसेच पुढे येणाऱ्या स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची या पिढीमध्ये क्षमता यावी यासाठी आजच प्रयत्न करायला हवा. कार्यक्रमाची सूत्रसंचालन अबॅकस क्लासेसच्या संचालिका कुमारी शितल मॅडम यांनी केले व प्रतीक्षा चंदापुरे यांनी आभार प्रदर्शन यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व मान्यवर आणि पालकांचे सहकार्य लाभल्याबद्दल चोंडी कर मॅडम यांनी त्यांचे आभार मानले.

# एका महिन्यापासून रुग्णवाहिका बंद, प्रशासनाचे दुर्लक्ष

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड़ - तालुक्यातील बंदी भागापासून ग्रामीण भागातील गोरगरीब गरजू रुग्ण उमरखेड शहरातील उत्तरवार उपजिल्हा रुग्णालय येथे येतात तसेच नागरिकांच्या सोयीसाठी शासकीय रुग्णालयात रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध आहे.

या उपजिल्हा रुग्णालयाला 102 क्रमांकाच्या दोन रुग्णवाहिका उपलब्ध आहे . मागील एक महिन्यापासून एक रुग्णवाहिका टायर खराब झाल्याने बंद अवस्थेत असून रुग्णालय प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे एक रुग्णवाहिकेवर संपूर्ण दवाखान्याचा भार आला आहे रुग्णालयातील एमर्जेंसी साठी रुग्णवाहिकेची आवश्यकता असताना या परिस्थितीत एकाच रुग्णवाहिकेचा वापर रुग्णालयात करण्यात येते त्यामुळे अनेक गरजू रुग्णांची हेळसांड होऊन मनस्ताप सहन करावा लागत आहे . तालुक्यातून येणाऱ्या अनेक रुग्णांना आपात्कालीन स्थितीत आर्थिक झळ सहन करून खासगी रुग्णवाहिका बोलवावी लागते . एकीकडे शासनाकडून आरोग्याविषयी महत्वाकांक्षी योजना राबविल्या जात आहेत . उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात मात्र सुसज्ज रुग्णवाहिका सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

**रुग्णवाहिका सुसज्ज नसल्या बाबत वरिष्ठांना याविषयी पत्रव्यवहार केलेला आहे. रुग्णवाहिकेचे ड्रायव्हर यांनी सुद्धा खराब टायर वर गाडी चालण्यास धोका होण्याची भीती व्यक्त केली आहे.**

**- किशोर कपाळे वैद्यकीय अधीक्षक उत्तरावर उपजिल्हा रुग्णालय**

# महागाव नगरपंचायत कडून दिव्यांग कल्याण निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा : नगराध्यक्ष सुनंदा कोपरकर

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव : नगरपंचायत यांच्याकडून दिव्यांग कल्याण निधी गेल्या तीन वर्षापासून रखडलेला होता. त्यास प्राधान्य क्रमाने घेऊन दिव्यांग कल्याण निधी वाटप करण्याचे काम युद्ध पातळीवर करण्यात आलेले आहे याबाबत महागाव नगरपंचायत च्या नगराध्यक्ष सौभाग्यवती सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिनांक 18 ऑगस्ट 2025 रोजी विषय क्रमांक आठ नुसार विषय पत्रिकेवर अजेंड्यावर विषय घेऊन हा विषय तात्काळ मार्गी लावण्याचे ठरविले होते त्या अनुषंगाने नगरपंचायत च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक आठ नुसार त्यास मान्यता देण्यात आली व लाभार्थ्यांच्या दिव्यांग कल्याण निधी खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर निधी हा नगरपंचायत निधी अंतर्गत पाच टक्के लाभांश म्हणून देण्यात येत असतो सदर निधीबाबत बजेटमध्ये तरतूद सुद्धा करण्यात आल्याची माहिती महागाव



नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिलेली आहे. दिव्यांग कल्याण निधी हा नगरपंचायतच्या स्वतःच्या उत्पन्नातून खर्च केल्या जात असतो दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत महागाव शहरातील पहिल्या टप्प्यात 75 लाभार्थ्यांची यादी महागाव येथील भारतीय स्टेट बॅंक , यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बॅंक , व युनियन बॅंकेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वळती करण्यात येत असल्याची माहिती महागाव नगरपंचायतचे लेखापाल नितीन हरीमकर यांनी दिलेली आहे. प्रति लाभार्थी 3840 रुपय एवढा निधी देऊ करण्यात आलेला आहे. सदर निधी टाकण्याची कार्यवाही सर्वसाधारण सभेच्या झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महागाव नगरपंचायत चे प्रभारी मुख्याधिकारी महेश कुमार जामनोर यांच्या मार्गदर्शनात लेखापाल नितीन हरीमकर, लिपिक विष्णू कांबळे यांनी केलेली आहे. महागाव नगरपंचायत च्या दिव्यांग कल्याण निधी वाटपाच्या अनुषंगाने महागाव नगरपंचायत च्या सर्वसाधारण सभेत नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला प्रामुख्याने महागाव नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती प्रमोद रामराव भरवाडे , कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वीकृत नगरसेवक संभाजीराव नरवाडे , सुजित ठाकूर , करूना नारायण शिरबिरे , विशाल प्रकाश पांडे , रंजना दीपक आडे , सुनिता शिवाजीराव डाखोरे, रामराव काशिनाथ नरवाडे , जयश्री अशोकराव इंगोले , गजानन सोपान साबळे , रूपाली संतोष कोल्हेकर , सुरेखा विनोद कोपरकर , महागाव नगरपंचायत चे कॉंग्रेस पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक शैलेश कोपरकर नगरसेवक महेश गजानन पाटील , आशा शंकर बावणे, जयश्री संजय नरवाडे, परवेज सुरय्या, सुरेश नरवाडे, यांच्यासह अधिकारी, कर्मचारी न प्रामुख्याने प्रामुख्याने उपस्थित होते. दिव्यांग कल्याण निधीमुळे शहरातील दिव्यांग नागरिकांना देण्यात आलेल्या अनुदानामुळे आनंद व्यक्त करण्यात येत आहे. महागाव शहरातील दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत कोणी लाभार्थी प्रथम यादीतून सुटला असेल तर त्यांनी महागाव नगरपंचायत च्या कार्यालयात रीतसर नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा त्यांनाही दिव्यांग कल्याण निधी चा लाभ व त्यांचा हक्काचा लाभांश देण्यात येणारा असल्याची माहिती यावेळी महागाव नगरपंचायत च्या नगराध्यक्ष सौभाग्यवती सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिली. दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत वाटप करणाऱ्या निधीत एकही लाभार्थी वंचित राहणार नाही याची जबाबदारी व काळजी घेतल्या जाईल अशी ग्वाही सुद्धा कोपरकर यांनी दिली.

# मेळघाटात मानव-वन्यजीव संघर्ष वाढला

**अमरावती/का.प्र.**

मेळघाटात गेल्या काही महिन्यांत मानव-वन्यजीव संघर्ष वाढल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि हरीसाल येथे दोन वेगवेगळ्या बैठकांमध्ये वाघाला जेरबंद करण्याचा निर्णय घेण्यात आला खरा, पण कथित नरभक्षक वाघाची ओळख पटविणे आणि त्याला सुरक्षितरीत्या पिंजऱ्यात बंदिस्त करण्याचे मोठे आव्हान वन विभागासमोर निर्माण झाले आहे.

देशातील पहिला व्याघ्र प्रकल्प म्हणून अस्तित्वात आलेल्या या जंगलात व्याघ्र प्रकल्प अस्तित्वात

### व्याघ्र प्रकल्पात १०० पेक्षा अधिक वाघ

येण्याअगोदर फक्त केवळ २७ वाघांची नोंद करण्यात आली होती. परंतु या क्षेत्रात शंभरावर वाघ असल्याचे स्पष्ट झाले आहे.मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रा अंतर्गत सिपना, गुगामल आणि आकोट वन्यजीव विभाग मिळून सुमारे दोन हजार चौरस किलोमीटरपेक्षा जास्त क्षेत्र आहे. दीड हजार चौरस किलोमीटरचे क्षेत्र धोकाग्रस्त व्याघ्र अधिवास क्षेत्र (क्रिटिकल टायगर हॅबिटॅट) म्हणून घोषित करण्यात आले आहे. यात मेळघाट अभयारण्याचे ११.५० चौरस किलोमीटर, नरनाळा अभयारण्याचे १२.३५ चौरस किलोमीटर, अंबाबरवा अभयारण्याचे १२७.११ चौरस किलोमीटर व वान अभयारण्याचे २११ चौरस किलोमीटर क्षेत्र समाविष्ट आहे.



मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्राची भौगोलिक रचनाच अशी आहे की, उंचसखल पर्वतरांगांमुळे येथे व्याघ्रदर्शन क्वचितच होते. अत्यंत दुर्गम आणि विस्तीर्ण क्षेत्रात वावरणारा इथला वाघ भारतात आढळणाऱ्या अन्य जंगलांतील वाघांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असल्याचेही वन्यजीव संशोधकांनी म्हटले आहे.पण, गेल्या तीन महिन्यांत वेगवेगळ्या ठिकाणी वाघांच्या हल्ल्यात सहा जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. गेल्या २ सप्टेंबरला गुगामल वन्यजीव विभागातील धामणीखेडा बीटमध्ये एका वाघाच्या हल्ल्यात वनमजूर ठार झाल्यानंतर मेळघाटात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

मेळघाटातील बहुतांश वाघांचे नामकरण करण्यात आले आहे, पण काही वाघांना अजूनही ओळख मिळालेली नाही. वनमजुराचा बळी घेणारा वाघ चर्चेत आला आहे. हा वाघ नरभक्षक असल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. आता कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून या वाघाचा शोध घेतला जात आहे. पण, या वाघाचा मागोवा घेणे अत्यंत जिकरीचे काम आहे.

या वाघाला स्थलांतरीत करण्याचा निर्णय काल वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत मुंबईत पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आला. हरीसाल येथे खासदार बळवंत वानखडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतही हाच सूर व्यक्त झाला.

> वाघाच्या हल्ल्याच्या बहुतांश घटना या अतिसंरक्षित भागात झाल्या आहेत. अशा घटना रोखण्यासाठी गावकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, संरक्षित जंगलात चेकपोस्ट उभारून ये-जा करणाऱ्यांची नोंद ठेवणे, मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी इतर उपाययोजना तत्काळ केल्या पाहिजेत.
>
> **नीलेश कंचनपुरे,**
> अध्यक्ष, 'वॉर' संस्था,
> अमरावती.

*पंतप्रधान नरेंद्रजी मोदीं यांच्या वाढदिवसानिमित्त*

# 'सेवा पंधरवाडा' अंतर्गत अमरावती जिल्हा ग्रामीणची कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांचा १७ सप्टेंबर रोजी जन्मदिवस तसेच २ ऑक्टोंबर रोजी रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या कालावधीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'सेवा पंधरवडा अभियान' राबविले जाणार आहे.या सेवा पंधरवडा अभियानाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी अमरावती जिल्हा ग्रामीण ची भाजपा कार्यशाळा भाजपा कार्यालय राजापेठ अमरावती येथे कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेला भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रमुख उपस्थिती होती.भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा संपन्न झाली.



यावेळी खासदार डॉक्टर अनिल बोंडे, आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, आमदार राजेश वानखेडे, निवेदिता चौधरी, शंतनु देशमुख, डॉ. सुमित पवार, नितीन गुडदे, अनिता तिखीले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. पंधरवाडा अभियाना निमित्त जिल्हाभरात स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, आरोग्य शिबीर,मोदी सरकारच्या कार्याचा प्रचार प्रसार, नागरिक संवाद, दिव्यांग सन्मान, क्रीडा स्पर्धा ई समाजोपयोगी लोकोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

मार्गदर्शन रणवीर सावरकर तर अध्यक्षीय मनोगत रविराज देशमुख यांनी केले. 'आत्मनिर्भर भारत' यावर डॉ. अनिल बोंडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच आमदार राजेश वानखेडे, आमदार उमेश यावलकर यांनीही मार्गदर्शन केले.प्रास्ताविक डॉ. सुमित पवार आभार शंतनु देशमुख संचालन प्रवीण राऊत यांनी केले. कार्यशाळेला अमित बाभुळकर, सचिन इंगळे, राजेंद्र हजारे, सुरेखा शिंदे, सुनील साकुरे, कृष्णा मारडकर, श्रीकांत मांडवे, साधनाताई मस्के, विकास देशमुख, श्रीधर सोलोव, प्रभाकर काळे, खासबागे, धंनजय उमप, योगेश देशमुख, अजय आगरकर , निलेश चौधरी, मीना कांबळे मनोहर लेवटे, किशोर आमले, सुनील ढोले, विनोद पाचघरे, अशितोष गुल्हाने, राम जोशी, संजय काळे, भारत यांगड, अनिता तीखीले, स्वप्नील भुयार, इकबाल हुसेन फिदा हुसेन, अनंत दाभाडे, संजय चांडक राजेंद्र पालीवाल, अशोक देशमुख, संजय चांडक, प्रितेश ठाकूर, रविंद्र वानखेडे, संदीप सोलंकी, अनिल सिकची, गोपाल राठोड निलेश वसूले, गजानन खडसे, निलेश भालेराव, वासुदेव सूरजूसे, प्रमोद हरले, सुनील गिरी अशोक निकम महेश पांडे, सागर सिंगाने, वीरेंद्र लंगळे, विलास राठोड, नवीन वाधवानी श्याम गवळी इत्यादी असंख्य पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळेस जिल्हा कार्यकारिणीचे नियुक्त पत्र देण्यात आले.

### ठाणेदारांच्या समयसुचकतेमुळे

## वृद्ध महिलेची पोत परत

**मोर्शी/वार्ताहर**

खेड येथील एका साठ वर्षीय महिलेने पर्समध्ये ठेवलेली सोन्याची पोत पर्ससह गाडीत चढतांना अचानक हरवली.परंतु ठाणेदारांच्या समसूचकतेमुळे त्या वृद्ध महिलेला सोन्याची पोत परत मिळाली. सदर घटना काल दि. ११ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. प्राप्त माहितीनुसार मोर्शी तालुक्यातील खेड येथील नलिनीबाई धनराज नागझिरकर वय (६०)वर्ष ही वृद्ध महिला मुलीकडे परतवाडा येथे जाण्यासाठी निघाली असता खेड येथील आठवडी बाजार शांताबाई मांदिर येथे असलेल्या बसस्टॉप जवळ या महिलेने आपल्या पर्समध्ये असलेला मोबाईल काढून मुलीसोबत वार्तालाप केला.नंतर तो मोबाईल पर्समध्ये ठेवण्यासाठी गेल्या असता त्यांना ती पर्स अचानक गायब दिसली. त्या पर्समध्ये ९० सोन्याचे मनी असलेली आठ ग्रॅमची सोन्याची पोत,आधार कार्ड, एसटी पास व दोनशे रुपये नगदी होते.



लगेच याबाबतची फिर्याद मुलगा सचिन नागझिरकर यांनी मोर्शी पोलिसांना दिली. मोर्शीचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी तात्काळ ए एस आय संतुलाल उईके व पोलीस कॉन्स्टेबल सचिन भाकरे यांना घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी केली असता तेथे एका वेडसर युवकाने सदर महिलेची पर्स एका इसमाला मिळाल्याची माहिती दिली.त्या अनुषंगाने पोलिसांनी सदर इसमाला विचारपूस केली असता त्याने पहिले उडवा-उडवीचे उत्तरे दिली.मात्र शेवटी पोलीस खाक्या दाखवताच त्याने पर्स मिळाल्याची कबुली दिली.शेवटी सोन्याचे मंगळसूत्र असलेली ती पर्स हस्तगत करून महिलेला परत करण्यात आल्यामुळे सदर महिलेच्या कुटुंबीयांनी पोलिसांविषयी समाधान व्यक्त केले.

# पोदार चे प्रणव आणि स्मयन जिल्ह्यामध्ये प्रथम

**अमरावती** -स्थानिय पोदार इंटरनॅशलन स्कूल अमरावती नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी विभागामध्ये सुप्रसिध्द आहे. परिणामस्वरूप पोदारचे विद्यार्थी नवनविन यशाचे शिखर गाठत आहे. या अनुषंगाने हल्लीच झालेल्या 'इंडिअन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अॅन्ड कल्चरल हेरिटेज' अमरावती व्दारा आयोजित राष्ट्रीय स्तराच्या आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये पोदार चे प्रणव पाटील आणि स्मयन लढ्ढा यांनी जिल्ह्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला तसेच त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली गेली.



जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये अमरावतीच्या एकुण १२ शाळेद्वारा या स्पर्धेमध्ये सहभागीता दर्शविली गेली ज्यामध्ये पोदारच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ प्रदर्शन करित प्रथम स्थान पटकाविले.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शहरातील प्रतिष्ठीत नागरीकांनी विद्यार्थी तसेच शाळा प्रशासनाची भरपुर प्रशंसा केली. यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छाँ देत शाळेच्या प्राचार्या मनिषा संगर ने या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मागदर्शन तसेच पोदारच्या अद्ययावत अभ्यासक्रमाला दिले. सफलतार्थ प्राचार्या मनिषा संगर यांच्या नेतृत्वामध्ये उपप्राचार्य डॉ. आशिष भेटाळू, डॉ. आशिष खुळे, सोनाली गवई, शक्तीस्वरूप गुप्ता, डॉ. सुमती सोनेकर, आशिष तरारे तसेच पोदार फॅकल्टी व्दारा प्रयत्न केले गेले.

# सेंद्रिय शेती व हळद पिकांवर लागवड ते काढणी शेतीशाळा

**कुऱ्हा/वार्ताहर**

तालुका तिवसा आत्मा विभाग अंतर्गत अर्चना निस्ताने प्रकल्प संचालक आत्मा अमरावती आणि हेमलता इंगळे तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सेंद्रिय शेतीवर हळद पिक शेतीशाळा आयोजित करण्यात आली.

भारतामध्ये हळद पीक मसाला व आयुर्वेदिक औषधी उपयोगासाठी मोठ्या प्रमाणावर पुर्वीपासुन एक प्रमुख नगदी पीक म्हणून घेतले जाते. तिला वनस्पती शास्त्रात कुरकुमा लोंगा असे नाव असुन ती झिंझीबरेसी कुळातील आहे. भारताच्या पश्चिम घाटात आजही अनेक रानटी हळदीच्या जाती आढळून येतात. हळदीचा वापर संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणावर दिवसेंदिवस वाढत आहे. पण त्याचे पेटंट मात्र भारताच्या नावावर आहे. इरोड या तामिळनाडूमधील शहरात हळदीचा जगात सर्वात मोठा व्यापार होतो.



आरोग्यासाठी नेहमी उपयोगी पडणारी हळद सेंद्रिय पद्धतीने कशी तयार करायची, हळद मधील कर्क्यूमिन कसा वाढ करायचा याबद्दल नुकतीच शेतीशाळा घेण्यात आली. हळद चुर्ण गरम पाण्याबरोबर घेतल्याने हृदविकार, मधुमेह, कर्करोग, मेंदुचे विकार होण्यापासून प्रतिबंध होतो पोटांचे विकार कमी करून पचनक्रिया सुधारते. हळद पिकांवर येणारे रोग, किडी याबद्दल माहिती सेंद्रिय शेती अभ्यासक निखिल तेटू यांनी दिली. सेंद्रिय पद्धतीने हळद लागवड या विषयांवर मार्गदर्शन केले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील डॉ. अपेट यांनी बनविलेली संजीवनी बुटी म्हणजेच 'बायोमिक्स' याबद्दल परिपूर्ण माहिति तसेच काढणी पश्चात बेणे प्रकिया, निवड प्रकिया बाबत माहिती दिली. सेंद्रिय शेती या विषयावर निखिल तेटू यांनी मार्गदर्शन केले. सदरील शेतीशाळेचे आयोजन व नियोजन सचिन हरले बीटीएम ,प्रतीक राऊत, एटीएम, यांनी केले. शेतीशाळा कार्यक्रमाला प्रगतिशील शेतकरी स्वप्निल निस्ताने , सुभाष लसणापूरे तसेच गावातील हळद लागवड करणारे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीएसटीचा सर्वाधिक निधी अमरावतीचा; तरीही उद्योग पळविले

## सीएम, सचिवांना काँग्रेस प्रदेश सरचिटणीसांचे पत्र प्रतिनिधी

**अमरावती/का.प्र.**

जीएसटीची सर्वाधिक रक्कम अमरावती जिल्ह्याने दिली असतानाही उद्योग मात्र अमरावती सोडून इतरत्र पळवण्यात आले. हा गंभीर प्रकार असून किशोर बोरकर समृद्धी महामार्ग, रेल्वेचे जाळे, विमानतळ या पायाभूत सुविधा उपलब्ध असतानाही अमरावतीला डावलणे किती दिवस सुरू राहणार, असा प्रश्न काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्री तसेच प्रशासकीय प्रमुख म्हणून राज्याचे मुख्य सचिव यांना बोरकर यांनी पत्र लिहून हा प्रकार बंद करण्याची मागणी केली आहे. राज्यात तब्बल १ लाख कोटींची गुंतवणूक आणि ४७ हजार रोजगारांची निर्मिती क्षमता असलेल्या उद्योगांबाबतचे सामंजस्य करार (एमओयू) नुकतेच करण्यात आले. परंतु यात अमरावतीला दूर ठेवले आहे.

हे उद्योग माहिती तंत्रज्ञान व अन्नप्रक्रियेशी संबंधित असून गोदामे, डेटा सेंटर आणि लॉजिस्टिक हब प्रकल्पाचाही त्यात समावेश आहे. हे करार फक्त नागपूर, ठाणे व नंदुरबारसाठी केले. त्यामुळे अमरावती विभाग आणि जिल्ह्यातील बेरोजगारांना सापत्न वागणूक दिल्याचे स्पष्ट होते. केवळ नागपूर म्हणजे संपूर्ण विदर्भ नव्हे, हे सत्ताधाऱ्यांनी लक्षात घ्यावे, असेही पत्रात नमूद केले आहे. बोरकर यांच्या मते, राज्य सरकारने एमजीएस रिअ?लिटी- ५ हजार कोटी, लोढा डेव्हलपर्स लि. ३० हजार कोटी, अडाणी एंटरप्रायझेस लि. --७० हजार कोटी, पॉलिफ्लेक्स कॉर्पोरेशन लि. -२ हजार ८६ कोटी आणि रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्टस लि. या कंपनीसोबत १ हजार ५१३ कोटी रुपयांचा सामंजस्य करार केला. याशिवाय ग्रीन इंटिग्रेटेड डेटा सेंटर पार्कच्या माध्यमातून ६ हजार, औद्योगिक गोदामे व डेटा सेंटर लॉजिस्टिक हबच्या माध्यमातून १० हजार, एकात्मिक कोळसा सरफेस वायुकरणआणि डाऊनस्टीम डेरिव्हेटिव्हज प्रकल्पाच्या माध्यमातून ३० हजार तर पॉलिमेरिक उत्पादनासोबतच्या ६०० रोजगार निर्मितीच्या प्रकल्पाचा करारही यावेळी करण्यात आला. परंतु त्यात अमरावतीचा कोठेही समावेश केला नाही.

देशाला सन २०२४-२५ मध्ये सर्वाधिक जीएसटीचा निधी मिळवून देणाऱ्या पहिल्या १० राज्यांमध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. त्यातही अमरावती विभागाचा वाटा १ हजार ५७३ कोटी ७५ लाखांचा असून तो उद्दिष्टाच्या तुलनेत २३ टक्के अधिक आहे.

अमरावती जिल्ह्यातील जीएसटीधारक १२ हजार ४९८ असून, पश्चिम विदर्भात ते सर्वाधिक आहेत. त्यामुळे सामंजस्य करारात अमरावतीचा समावेश गरजेचा होता. परंतु तसे झाले नाही. त्यामुळेच राज्य सरकारने ही बाब गंभीरतेने घ्यावी, अशी त्यांची मागणी आहे. अमरावतीतून सर्वाधिक जीएसटी संकलन झाल्या नंतरही उद्योग येत नसल्याने चिंतेची बाब आहे.

**बेरोजगारीचे भीषण वास्तवही केले नजरेआड**

जिल्ह्यात मनरेगात एकूण ४ लाख ६८ हजार १६२ एवढ्या जॉबधारक कुटुंबांची नोंद असून, यापैकी ८९ हजार ४३५ नोंदी मेळघाटमधील चिखलदरा व धारणी येथील आहेत.एकूण नोंदीमध्ये ५० टक्के सुशिक्षितः बेरोजगार आहेत. हे भीषण वास्तव राज्यकर्त्यांना दिसू नये, याकडेही बोरकर यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांचे लक्ष वेधले आहे.

# संक्षिप्त

## शालेय मिनीगोल्फ स्पर्धेत पोटे स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या टीम इव्हेंट मध्ये वर्ग अकरावीचा विद्यार्थी शौर्य सुरेंद्र चव्हाण व तसेच वर्ग दहावीचे विद्यार्थी सुरज मोहोड, अंशुमन सोलव, क्रिश डेहनकर, तोहित रझा, हर्ष चव्हाण यांचे १७ वर्षाखालील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावून विभागीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर डबल इव्हेंट मध्ये वर्ग सातवीचे विद्यार्थी आयुष काळे, आयुष चराडे यांचे १४ वर्षाखालील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावून विभागीय स्तरावर निवड करण्यात आली.



## गजानन काकडे सन्मानित

**कुऱ्हा-**नुकताच जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हाधिकारी नियोजन भवन अमरावती येथे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. तिवसा पंचायत समिती मधील जिल्हा परिषद, पूर्व माध्यामिक शाळा,सालोरा बु. येथील मुख्याध्यापक गजानन बापुरावजी काकडे यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, मुख्यकार्यपालन अधिकारी संजिता महापात्र यांचे हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देवून शिक्षणाधिकारी निखिल मानकर, प्राचार्य जिल्हा प्रशिक्षण संस्था अमरावती मिलींद कुबडे , शिक्षणाधिकारी (प्राथ.) सतीश मुगल यांचे उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. त्यांना मिळलेल्या आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल अभिषेक कासोदे,नारायण आमझर, डॉ. नितीन उंडे,सुनील गवळी,चंद्रशेखर रामटेके, सर्व केंद्रप्रमुख, सर्व विषय तज्ज्ञ गटसाधन केंद्र तिवसा व संपूर्ण शिक्षण विभाग, तिवसा यांनी आदर्श शिक्षक गजानन काकडे यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.पुरस्काराबद्दल शाळेतील सर्व सहकारी शिक्षक वृंद,गावकरी मंडळी,तिवसा पंचायत समिती मधील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचे कडूनअभिनंदन व कौतुक होत आहे.




## स्वरा भुयार हिची बुद्धिबळ स्पर्धेकरीता निवड

**मोर्शी-**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथील विद्यार्थिनी स्वरा सुधीर भुयार हिने युवक व क्रीडा संचलनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयअमरावती यांच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुल अमरावती येथे सम्पन्न झालेल्या १४ वर्ष वयोगट जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश संपादीत करून आपली निवड विभागीय स्पर्धेकरिता केली आहे. तिला क्रीडा शिक्षक अजय हिवसे ,विजय तारापुरे, मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख ,उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर,पर्यवेक्षक विठ्ठलराव नवरे, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी ,विठ्ठल गवई तसेच वर्ग शिक्षिका धनश्री कोंबे,तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले व पुढील विभागिय स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.



## स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात कंपोस्ट खत प्रकल्प

**नांदगाव पेठ-**येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने महाविद्यालय परिसरातील गणपती विसर्जनातील जे निकामी निर्माल्य होते ते स्वयंसेवकाद्वारे संकलन करण्यात आले. या निकामी झालेल्या निर्मल्याद्वारे महाविद्यालयाच्या परिसरात कंपोस्ट खत तयार करण्याचा प्रकल्प रासेयोच्यावतीने प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पातून परिसरातील घराघरात निर्मल्याद्वारे शेती उपयोगी कंपोस्ट खत कसे तयार करायचे याचे प्रात्यक्षिक महाविद्यालय विद्यार्थी- विद्यार्थिनींना समजावून देण्यात आले.महाविद्यालयातल्या परिसरातील नागरिक वस्तीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी घरोघरी जाऊन सार्वजनिक गणेश उत्सवातील निर्माल्य संकलन करून कंपोस्ट खत बनविण्यासाठी सहभाग घेतला.



या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाचे आयोजन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. आर. जाधव, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकांत माहुलकर, प्रा. डॉ. सुनीता बाळापुरे यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. तर या निर्माल्य संकलनाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष पवार, ग्रंथपाल प्रा. डॉ. विकास अडलोक सर व शिक्षकेतर कर्मचारी सौ. रेखाताई पुसदकर, राहुल पांडे, दिलीप पारवे, विनायक पावडे, अनिल शेवतकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी सदर कार्यक्रमाला व उपक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर नावीन्यपूर्ण या उपक्रमाला व कार्यक्रमाला स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वृषालीताई पुसदकर, उपाध्यक्ष निदानजी बारस्कर साहेब, सचिव श्रीकृष्णजी बाळापुरे साहेब, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरजी हिवसे साहेब, सदस्य रेवण पुसदकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

## पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयात शिक्षण दिन साजरा

**अमरावती** -पी.आर.पोटे पाटील शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला याप्रसंगी अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अनुप्रिता देशमुख होत्या तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अनिल ढवळे होते. बी.एड. प्रशिक्षणर्थ्यांची भाषणे झाली डॉ. अनिल ढवळे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक आणि गुरु कसा असावा यावर विविध उदाहरणे देत पारंपारिक शिक्षण पद्धती आणि आधुनिक शिक्षण पद्धती यातील भेद स्पष्ट करण्यात आला अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अनुप्रिता देशमुख यांनी शिस्त आणि शिक्षक यातील प्रसंग समजून सांगितले आणि विद्यार्थ्यांना खूप मोलाचे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाल उपस्थित डॉ. विजया कंकाळे, प्रा. सविता ठाकरे, डॉ. वैशाली धर्माले,प्रा.दीपाली ठाकरे,बी.एड.प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. वास्तविक दुर्गापूजेच्या काळात जगभरात घडलेल्या घटनांची दखल घेतली जाते आणि त्या संकल्पनेवर आधारित पंडाल उभारला जातो; पण विधानसभेच्या वातावरणामुळे या संकल्पनांवर राजकीय सावट अधिक गडद होताना दिसत आहे.**

# दुर्गापूजेवरून घमासान

पश्चिम बंगालमधील दुर्गोत्सव भारतातच नाही, तर जगभरात प्रसिद्ध आहे. गेल्यावर्षी दुर्गापूजा उत्सवातील उलाढाल ८० हजार कोटींपर्यंत पोहोचली होती. 'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स'ने २०३० पर्यंत दुर्गापूजा उत्सवाची उलाढाल सुमारे १ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज बांधला आहे; पण या धार्मिक उत्सवांचा राजकीय लाभ वेळोवेळी घेतला गेला आहे. विशेषतः या पूजेचे आयोजन करणाऱ्या पंडालना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा मुद्दा नेहमीच चर्चिला जातो. यंदा तो नव्याने चर्चेत आला आहे.

दुर्गापूजेचे आयोजन करणाऱ्या पंडाल म्हणजेच मंडळांकडून साकारण्यात येणारी संकल्पना आणि सरकारी अनुदान हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. परिणामी, यावेळी या प्रकरणात उच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. पश्चिम बंगालमध्ये यंदा ४५ हजारांपेक्षा अधिक मंडळे (पंडाल) आहेत. पैकी सुमारे साडेचार हजार पंडाल एकट्या राजधानी कोलकता आणि परिसरात आहेत. कोलकात्यातील सुमारे शंभरपेक्षा अधिक पंडालचे बजेट ८० ते ९० लाखांएवढे आहे. याशिवाय डझनभर मंडपाचे बजेट ३ ते ५ कोटी रुपयांच्या आसपास आहे; मात्र निवडणूक असते तेव्हा दुर्गा उत्सव हा स्थानिक नेत्यांसाठी एक संधी असते आणि त्याचा पुरेपूर लाभ उचलण्याचा प्रयत्न केला जातो. यंदाचे वर्षदेखील त्याला अपवाद नाही.

कारण, पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. वास्तविक दुर्गापूजेच्या काळात जगभरात घडलेल्या घटनांची दखल घेतली जाते आणि त्या संकल्पनेवर आधारित पंडाल उभारला जातो; पण विधानसभेच्या वातावरणामुळे



या संकल्पनांवर राजकीय सावट अधिक गडद होताना दिसत आहे.

पुढील वर्षीच्या निवडणुका लक्षात घेता कोलकाता येथील अनेक आयोजकांनी यावर्षी बंगाल आणि बंगाल भाषिक संकल्पनेची निवड केली आहे. प्रत्यक्षात मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी देशातील प्रामुख्याने भाजपशासित राज्यांत बंगालभाषिक नागरिकांचे कथित शोषण होत असल्याचा आरोप केला असून त्याविरुद्ध आंदोलनही सुरू केले आहे. यानुसार राज्यातील डझनभर मंडपांनी हीच संकल्पना पुढे आणण्याचा विचार केला.

बंगाली भाषिक मजुरांवर किंवा कर्मचाऱ्यांवर भाजपशासित राज्यात होणारा अन्याय ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्याचे अनेक पंडालनी ठरविले आहे. कोलकाता येथील बागुईहाटी भागातील अश्विनीनगर येथील बंधुमहल क्लबने हीच संकल्पना निवडली आहे. त्यांचे ४५ वे वर्ष आहे. गेल्यावर्षी त्यांनी बारोवारी म्हणजेच पारंपरिक पूजेची संकल्पना निवडली होती. अर्थात, पूजा समितीचे संयोजक स्वरूप नाग म्हणतात, या संकल्पनेमागे कोणताही राजकीय हेतू नसून आमच्या पंडालच्या माध्यमातून बंगाल आणि बंगाली भाषकांची समृद्ध परंपरा आणि वारसा दाखविणार आहोत.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार दरवर्षी नोंदणीकृत पंडालला आर्थिक अनुदान देते आणि ही प्रथा २०१८ पासून सुरू झाली. तत्कालीन काळात २०१९ मध्ये लोकसभा निवडणूक होणार होती. त्यावर्षी सरकारने पूजा समितीला दहा-दहा हजारांचे अनुदान दिले आणि ते वाढत यावर्षी एक ते दहा लाखांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे सरकारी तिजोरीवर पाचशे कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. या कारणामुळेच राजकीय घमासान सुरू झाले आहे. सरकारी अनुदानात वाढीच्या विरोधात कोलकाता उच्च न्यायालयात दोन वेगवेगळ्या जनहित याचिका दाखल झाल्या होत्या. त्याच्या सुनावणीनंतर न्यायालयाने सरकारला दोन दिवसांत मागील वर्षी हिशेब सादर न करणाऱ्या आयोजकांची नावे सादर करण्याचे आदेश दिले.

**● अमित शुक्ला**

# दुबईत पाक क्षेपणास्त्रे निकामी

दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रंगलेल्या भारत पाक लढतीत कर्णधार सूर्याच्या एस-४०० डिफेन्स सिस्टिमने शाहीन आफ्रिदी समवेत पाकचे गोलंदाजीतले सगळे क्षेपणास्त्रे निकामी करून भारताला दणदणीत विजय मिळवून दिला आहे. नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करताना पाकची भारतीय गोलंदाजांसमोर घसरगुंडी झाली आणि त्यांना अवघ्या १२७ धावांत गुंडाळले गेले . फलंदाजी करताना पाक संघ प्रचंड दबावात दिसला आणि केवळ साहीबजादा फरहान, फखर झमन, शाहीन आफ्रिदी वगळता इतर फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर तग धरू शकले नाहीत. तर प्रत्युत्तरात आपल्या फलंदाजांनी पाक गोलंदाजी सहज खेळत सामना ७ गड्यांनी जिंकला आहे.

पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांतील ही लढत एकतर्फी ठरली. तसे पाहता दोन्ही संघ सध्या संक्रमणावस्थेत आहेत. भारतीय संघातील रोहित, विराट, जडेजाने टी ट्वेंटीतून निव्रुत्त झाले आहे तर पाक संघाने बाबर आझम, रिझवानला संघातून डच्चू दिला आहे. मात्र तरीही भारतीय संघ पाक संघापेक्षा सरस आहे आणि हेच सामन्यात सिद्ध झाले. पाक संघात नाव घेण्यासारखा ना फलंदाज आहे ना गोलंदाज. शाहीन आफ्रिदीने जरूर गोलंदाजीत नाव कमावले आहे पण या सामन्यात तो निष्प्रभ ठरला. एकतर नवखा संघ आणि त्यातही साधारण रणनिती. कारण दुबईत पाठलाग करणाऱ्या संघाने जास्त विजय मिळवले आहेत परंतु पाकने प्रथम फलंदाजी निवडून पहिलेच ते बॅकफुटवर आले होते.

भारत पाक सामन्यात खेळाडूंवर मानसिक दबाव काय असतो हे या सामन्यात दिसून आले. डावाच्या सुरुवातीला आक्रमणाच्या नादात पाकचे दोन फलंदाज बाद झाले आणि त्यानंतर जी फलंदाजीत जी गळती लागली ती शेवटपर्यंत कायम राहिली. पांड्या बुमराहने दोन बळी टिपत जो दबाव पाक फलंदाजांवर निर्माण केला तो कुलदीप अक्षर आणि वरूण चक्रवर्तीने कायम ठेवला. त्यातही साहीबजादा फरहान आणि फखर झमनने ३९ धावांची भागीदारी करत डाव सावरला होता मात्र कोणताही फलंदाज आश्वासक फलंदाजी करत नव्हता. डावाच्या अखेरीस शाहीन आफ्रिदीने



दांडपट्टा चालवत पाकची थोडीफार लाज राखली.

पाक सव्वाशेत गारद होताच सामना कुठे चालला याचा अंदाज येत होता मात्र भारतीय संघाचा काय ॲप्रोच असेल याची उत्सुकता होती. अभिषेक शर्माने ती उत्सुकता लवकर संपवली. शाहीन आफ्रिदीवर ताबडतोब हल्ले करत त्याने आपल्या संघाला शानदार सुरुवात करून दिली. त्याची झटपट ३१ धावांची खेळी भारतीय संघाचा टेम्पो सेट करून गेली. शुभमन गिल जरूर लवकर बाद झाला परंतु त्यानेही दोन चौकार मारत आक्रमक सुरुवात केली होती. दोन्ही सलामीवीर परतताच कर्णधार सूर्या आणि तिलक वर्माने पाक गोलंदाजांना कोणतीही संधी न देता ५६ धावांची भागीदारी करत सामना आवाक्यात आणला. शेवटी शिवम दुबेच्या साथीने सूर्याने विजयाची औपचारिकता पूर्ण केली.

थोडक्यात काय तर पाक संघाने या सामन्यात सपशेल शरणागती पत्करली होती. ना फलंदाज चमकले ना गोलंदाजांना प्रभाव पाडता आला. दोन्ही बाबतीत भारतीय संघ उजवा ठरला. कुलदीप, अक्षर आणि वरूणच्या फिरकीसमोर पाक संघाने सरेंडर केले तर सैम अयूब सोडता इतर पाक गोलंदाजांनी निव्वळ खानापुर्ती केली. पाक संघ सुपर फोर मध्ये जरूर प्रवेश करेल. मात्र तिथे त्यांना कामगिरीत सुधारणा करावी लागेल. अन्यथा तिथे ते भारता सहित श्रीलंका, अफगाण किंवा बांगलादेश समोर ते टिकाव धरू शकणार नाहीत. याउलट भारतीय संघाने टी ट्वेंटीत आपणच दादा आहोत हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

**● डॉ अनिल पावशेकर**
**मो. ९८२२९३९२८७**

# नेपाळमधील अराजकतेला भ्रष्टाचार कारणीभूत

गेल्या काही दिवसांपासून नेपाळमधील एकूण परिस्थिती अराजकतेकडे झुकलेली दिसून येते. समाज माध्यमावर घातलेली बंदी ही महत्वपूर्ण ठिणगी ठरते. पण नेपाळमध्ये गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बोकाळलेला भ्रष्टाचार, तरुणांमधील वाढता असंतोष आणि सत्ताधाऱ्यांचा अहंकार यामुळे आज नेपाळ पेटलेला आहे. पंतप्रधान के पी शर्मा ओली आणि राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांच्या राजीनाम्यानंतरही तेथील परिस्थिती आटोक्यात येण्याऐवजी अधिकच भडकली आहे. संतप्त जमावाने पंतप्रधान, राष्ट्रपती, संसद भवन आणि सर्वोच्च न्यायालयावर मोठा हल्ला करून त्याचा ताबा घेतला. माजी पंतप्रधान झालानाथ खनाल यांचे निवास्थान पेटवून दिले. आणि त्यामध्ये झालानाथ खनाल यांच्या पत्नी राजलक्ष्मी चित्रकार यांचा मृत्यू झाला. उपपंतप्रधान विष्णू प्रसाद यांना आंदोलकांनी पाठलाग करून मारहाण केली. अनेक मंत्र्यांची घरे जाळून टाकली गेली. हिंसक आंदोलनाला नियंत्रणात ठेवण्यासाठी गोळीबाराचा आदेश देणाऱ्या पोलीस अधिकारास जमावाने ठेचून मारले. संचारबंदी आणि बंदुकीच्या गोळीला न जुमानता जमावाचे हिंसक आंदोलन अजूनही तणावग्रस्त आहे.

नेपाळच्या राजकीय इतिहासातील ही सर्वात भयानक मोठी घटना ठरली आहे. नेपाळची कोणतीही घटनात्मक संस्था जमावाचा सामना करू शकली नाही. प्रक्षुब्ध आंदोलकांच्या उद्रेकातून जीव वाचवण्यासाठी अधिकारी आणि मंत्र्यांना तेथून पळ काढावा लागला मात्र त्यात अनेकजण मारले गेले. पोलिसांच्या गोळीबारात वीस जणांचा बळी गेला. तरीही आंदोलक थांबले नाही. कोणत्याही नेत्याविना सुरु झालेल्या या जनआंदोलनाने नेपाळच्या लोकशाही व्यवस्थेपुढे गंभीर संकट निर्माण केले आहे. या अराजकतचे मूळ भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि तरुणांच्या भविष्याचा अभाव यात सामावले आहे. एकीकडे मंत्र्यांचे पलायन सुरु असताना दुसरीकडे जनता शासन व्यवस्था उलथवून टाकण्यासाठी आक्रमक झाली होती. राष्ट्रपती यांनी जनभावना लक्षात घेऊन काठमांडूचे महापौर बालेन शाह यांना हंगामी पंतप्रधान करण्यासाठी हालचाली सुरु केल्याचे दिसते. राजकारणात येण्यापूर्वी तरुणांमध्ये वेगळी ओळख निर्माण केलेल्या बालेन शाह यांच्याकडे देशाचे नेतृत्व सोपविण्याची आंदोलकांची मागणी असल्याचे दिसते. त्यामुळे बालेन शाह यांच्या निवडीनंतर तरी आंदोलन शमणार की आणखी वाढणार हा मोठा प्रश्न निर्माण होतो.

आता पदच्युत झालेले पंतप्रधान के पी शर्मा ओली यांनी भारतावर आगपाखड सुरु केली आहे. आणि या उद्रेकामागे भारत असल्याचा कांगावा केला आहे. परंतु आपल्या देशाला चीनच्या दावणीला बांधून जर नेपाळमधल्या लोकशाहीचा गळा घोटल्याचा प्रयत्न होत असेल



तर ते जनतेला सहन होणार नाही. यातला महत्वाचा भाग असा आहे की गेल्या दोन वर्षात श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ या तीनही देशामध्ये अचानकपणे जनभोक्ष उसळल्याच्या घटना घडल्या. आणि तिथे सत्तांतरे घडून आली. या तीनही ठिकाणची आंदोलनाची पद्धती जर बघितली तर समान पद्धतीची असल्याचे दिसतात. मग थेट त्या त्या राष्ट्राच्या अध्यक्ष किंवा पंतप्रधानांच्या घरात घुसून आंदोलकांनी मोठे थैमान घातल्याचे पाहायला मिळते. या सगळ्या राष्ट्रांचा जीव अतिशय छोटा आहे. तिथल्या सुरक्षा यंत्रणादेखील जेमतेम स्वरूपाच्या ठरतात. या राष्ट्रांकडे लष्कर असले तरी त्याचा मोठा प्रभाव पाहायला मिळत नाही. किंबहुना या तीनही देशांमधल्या लष्कराची सर्वाधिक शक्ती ही स्थानिक हिंसाचार रोखण्यातच खर्च झालेली पाहायला मिळतात. त्यातले जवळपास सर्वच हिंसाचार हे राजकीय स्वरूपाचे होते. ज्यावेळेला आंदोलक या तीनही देशांमध्ये समान पद्धतीने आंदोलने घडवून आणतात. आणि त्या राष्ट्राध्यक्षांना पायउतार व्हावे लागले याचा अर्थ निश्चितपणाने तिथल्या तरुणाईला भडकवण्यात बाहेरची तिसरी शक्ती सक्रिय झाल्याचे स्पष्ट होते. अन्यथा या तीनही आंदोलनामध्ये अशा प्रकारची समानता आढळून आली नसती. कारण या छोट्या देशांमध्ये कोणताही सामाजिक उद्रेक झाला की तिथले लोक वेगवेगळ्या मार्गाने भारताकडे आश्रय घेत असतात. म्हणून या छोट्या देशांतील आंदोलनांचे पोशिंदे शोधून काढणे अधिक महत्वाचे ठरते.

नेपाळातील हिंसाचारामुळे तेथील अर्थव्यवस्था ठप्प होऊ शकते. गुंतवणूकदारांचा विश्वास ढळू शकतो. आणि रोजगाराच्या संधी कोलमडू शकतात. या अशा कठीण प्रसंगातून नेपाळला पुन्हा सावरण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात. नेपाळमधील ही अराजकता भारताची डोकेदुखी वाढविणारी आहे. आतापर्यंत बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका आणि अफगाणिस्तानमध्ये उद्रेक झाले. आता नेपाळमधील असंतोषास कारणीभूत ठरणाऱ्या भ्रष्टाचारांचा मुद्दा हा कळीचा मुद्दा ठरला आहे. भ्रष्ट शासन आणि अहंकारी नेतृत्वाविरुद्ध जनतेचा उद्रेक हा गोळीबारापेक्षाही प्रबळ ठरतो. त्यामुळे पारदर्शक, जबाबदार व प्रामाणिक नेत्रयुतत्वाची देशाला गरज असते. अन्यथा लोकशाहीचे रूपांतर अराजकतेत होण्यास काही वेळ लागणार नाही.

**● मधुकर चुटे**

## दिवाळी विशेषांक-२०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम'दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सॲप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टों.२०२५ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**



# ओझोन थराचे रक्षण करूया ...

आज १६ सप्टेंबर. जागतिक ओझोन दिवस. यंदाच्या ओझोन दिनाची अधिकृत थीम 'जीवनासाठी ओझोन' (Ozone for Life) असून ही थीम ओझोन थराचे महत्त्व अधोरेखित करते, जो आपल्या ग्रहाचे सूर्याच्या हानिकारक किरणांपासून संरक्षण करणारा एक नैसर्गिक ढाल आहे. ही थीम १९८७ मध्ये झालेल्या मॉन्ट्रियल प्रोटोकॉलच्या जागतिक यशाचे कौतुक करते.या प्रोटोकॉलमुळे ओझोन थराला हानी पोहोचवणाऱ्या पदार्थांचे उत्पादन टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आले. या थीममधून ओझोन थराच्या संरक्षणासाठीच्या भविष्यातील प्रयत्नांची आणि संभाव्यतेचीही नोंद घेतली जाते. जागतिक ओझोन दिन आपल्याला आठवण करून देतो की ओझोन थर पृथ्वीवरील जीवनासाठी आवश्यक आहे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी त्याचे संरक्षण करण्यासाठी चालू असलेल्या हवामान कृतीची आवश्यकता अधोरेखित करतो. सुमारे ३२ वर्षांपूर्वी याच दिवशी कॅनडातील मॉंट्रियल शहरात जगभरातील विविध देशांच्या प्रतिनिधींनी ओझोन थराच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय 'मौंट्रियल' करारावर सह्या केल्या होत्या. या करारान्वये ओझोनच्या हानीस जबाबदार पदार्थांवर पूर्णपणे निर्बंध घातले गेले असून, मानवी हस्तक्षेप पर्यावरणाला हानी पोहोचवण्यास कारणीभूत असल्याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

**ओझोन थर आणि त्याचे महत्व**

ओझोन थर म्हणजे पृथ्वीच्या वातावरणातील ओझोन वायूचे एक विशिष्ट थर आहे. हा थर पृथ्वीपासून सुमारे १५ ते ३५ किलोमीटर उंचीवर, मुख्यत्वे स्ट्रॅटोस्फिअरमध्ये आढळतो. या थरामध्ये ओझोन (O3) वायूचे उच्च प्रमाण असते, जो सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून (UV Rays) पृथ्वीला संरक्षण देतो. ओझोन थरामुळे या अतिनील किरणांचे प्रमाण कमी होते, जेणेकरून हे किरण पृथ्वीवर पोहोचून जीवसृष्टीला नुकसान पोहोचवत नाहीत.ओझोन थराचे महत्त्व आपल्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षण करण्याचे काम हा थर करतो. अतिनील किरणे थेट पृथ्वीवर आली तर ते मानव, प्राणी आणि वनस्पती यांच्यावर प्रतिकूल परिणाम करतात. त्वचेच्या कर्करोगासारख्या आजारांचे प्रमाण वाढवणे, डोळ्यांमध्ये मोतीबिंदू होण्याची शक्यता वाढवणे, तसेच वनस्पती आणि शेती उत्पादनांवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ओझोन थराचे संरक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**ओझोन थराला पडलेले छिद्र**

ओझोन थराला छिद्र पडण्याचे मुख्य कारण म्हणजे मानवनिर्मित रसायनांचे वातावरणात सोडले जाणे. या रसायनांमध्ये क्लोरोफ्लुरोकार्बन (CFC), हायड्रोफ्लुरोकार्बन (HFC) इत्यादींचा समावेश होतो. CFC सारखी रसायने जेव्हा वातावरणात पोहोचतात तेव्हा ते ओझोन थराला तोडून त्याचे प्रमाण कमी करतात. विशेषतः ध्रुवीय प्रदेशात ओझोन थराला मोठे छिद्र पडले आहे, जेथे या पदार्थांच्या प्रभावामुळे ओझोनची नासाडी होते. हे छिद्र दक्षिण ध्रुवाजवळील अंटार्क्टिका प्रदेशात सर्वाधिक मोठे आहे.१९८०च्या दशकात हे छिद्र अधिक गडदपणे समोर आले आणि जागतिक पातळीवर यासंदर्भात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. जर ओझोन थर अधिक प्रमाणात कमी झाला तर पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी खूपच धोकादायक ठरू शकते.

तथापि, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर (IIT-खरगपूर) येथील संशोधकांनी त्यांच्या नुकत्याच केलेल्या अभ्यासात उष्णकटिबंधीय वातावरणातील गंभीर ओझोन छिद्राच्या दाव्याचे खंडन केले आहे. येथे हे उल्लेखनीय आहे की, यापूर्वीच्या संशोधनात अशा ओझोन छिद्रामुळे उष्णकटिबंधीय प्रदेशात राहणाऱ्या जगातील निम्म्या लोकसंख्येच्या आरोग्यावर संभाव्य परिणाम होऊ शकतो, असे म्हटले होते. आयआयटी खरगपूरच्या अभ्यासात अशा कोणत्याही संभाव्य आरोग्य धोक्याची शक्यता नाकारण्यात आली आहे.सध्याच्या वातावरणातील हॅलोजन पातळीच्या आधारावर अभ्यास पुष्टी करतो की ध्रुवीय क्षेत्राबाहेर ओझोन छिद्र तयार होण्याचा कोणताही धोका नाही. त्यामुळे उष्णकटिबंधीय लोकसंख्येच्या आरोग्यास कोणताही धोका नाही. या अभ्यासाचे प्रमुख लेखक जयनारायण कुट्टीपुरथ यांनी सांगितले की, उष्णकटिबंधीय प्रदेशात ओझोन छिद्रे होण्याची शक्यता खूपच कमी आहे. अलिकडच्या दशकात उष्णकटिबंधीय ओझोनमध्ये झालेली माफक घट हे रसायनशास्त्राच्या नव्हे तर वातावरणातील गतिशीलतेतील बदलांमुळे आहे.

**ओझोन थराचे संरक्षण: उपाय योजना**

ओझोन थराचे संरक्षण करण्यासाठी जगभरात अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. यातील सर्वात महत्त्वाची योजना म्हणजे मॉन्ट्रियल प्रोटोकॉल. हा करार १९८७ मध्ये करण्यात आला आणि त्यानुसार ओझोन थराला हानी पोहोचवणाऱ्या रसायनांच्या वापरावर बंदी घालण्यात आली. मॉन्ट्रियल प्रोटोकॉलमुळे ओझोन थराचे रक्षण करण्यात मोठे यश मिळाले आहे. काही उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:

१.CFC सारखी रसायने ओझोन थराचे मोठे नुकसान करत असल्यामुळे या रसायनांवर बंदी घालून त्याऐवजी पर्याय वापरणे आवश्यक आहे. हळूहळू त्यांचा वापर कमी करण्यात आलेला आहे.

२. रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंगसाठी CFC आणि HCFC यांचे पर्याय शोधणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून ओझोन थराचे नुकसान कमी करता येऊ शकते.

३. ग्राहकांनी जाणीवपूर्वक ओझोन फ्रेंडली उत्पादने वापरणे आवश्यक आहे ज्यामुळे ओझोन थराला नुकसान पोहोचत नाही. सरकारांनीही अशा उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि नुकसानकारक उत्पादने बंद करणे गरजेचे आहे.

४. ओझोन थराच्या संरक्षणासाठी तसेच हवामान बदल नियंत्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर हवामान बदल उपाययोजनेसाठी एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे कार्यक्रम हे ओझोन थराच्या संरक्षणात देखील महत्त्वपूर्ण ठरू शकतात.

५. ओझोन थराच्या महत्त्वाविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असून शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण देऊन तरुण पिढीला या समस्येचे गांभीर्य पटवून दिले पाहिजे.

**भविष्यातील धोके आणि सतर्कता**

ओझोन थराचे नुकसान टाळण्यासाठी आपण सतत सतर्क राहिले पाहिजे. प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना राबवून, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून आणि जागरूकता निर्माण करून आपण ओझोन थराचे संरक्षण करू शकतो. भविष्यातील हवामान बदलाच्या संकटांना तोंड देण्यासाठी आणि पृथ्वीवरील जीवनाचा समतोल राखण्यासाठी ओझोन थराचे संरक्षण अत्यावश्यक आहे.

**● प्रा. विजय कोष्टी**

# अद्यावत मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित

## पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ

■ प्रतिनिधी | अकोला ■

**गुन्हे तपासासाठी अकोल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची मोठी साथ मिळाली आहे. सोमवारी एसपी अर्चित चांडक यांच्या शुभहस्ते मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनला हिरवी झेंडी दाखवून कार्यान्वित करण्यात आले. ही विशेष सेवा भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत सुरु झाली असून, गुन्हे तपास प्रक्रियेत गती व अचूकता आणण्यासाठी ही व्हॅन महत्त्वाची ठरणार आहे.**



प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथून अकोल्याला वाहन क्र. MH 12 YD 9968 फॉरेन्सिक व्हॅन प्राप्त झाली आहे. सुरुवातीला ही व्हॅन उपविभागीय अधिकारी, अकोला यांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहणार असून इतर वाहने मिळेपर्यंत ती संपूर्ण जिल्ह्यासाठी (अकोला शहर व ग्रामीण) उपलब्ध असेल.

या व्हॅनमध्ये आवश्यक वैज्ञानिक साधनसामग्री, किट्स, रसायने यांसह प्रशिक्षित फॉरेन्सिक तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. घटनास्थळी त्वरित पोहोचून पुरावे गोळा करणे, जैविक नमुने लवकरात लवकर प्रयोगशाळेत पाठविणे, सीन मॅपिंग, फोटोग्राफी, प्राथमिक केमिकल व ट्रेस अनॅलिसिस करणे या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे पुराव्यांचे चेन-ऑफ-कस्टडी सुरक्षित राहणार असून न्यायालयात सादर करण्यायोग्य विश्वसनीय पुरावे मिळतील. त्यामुळे गुन्हे उकलण्याचे प्रमाण वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

या टीममध्ये अभिषेक भारसाकळे, पूजा खडसे, नेहा इंगळे (सहायक रासायनिक विश्लेषक), सोनल गाडगे, गायत्री हरणे, नागेश बावने, ओम बोडफळे (वैज्ञानिक सहाय्यक), राहुल गावंडे, अनिकेत वाजडे (वाहन चालक), अंकुश मोरे, रूपेंद्र ठाकरे (प्रयोगशाळा परिचर) यांचा समावेश आहे.

मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनमुळे अकोला पोलीस दलाला तपासासाठी त्वरित वैज्ञानिक मदत मिळणार असून गुन्हे उकलण्याची प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि परिणामकारक होईल. सदर कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थानिक गुन्हे शाखा), सपोनि सुरेश परसोडे (फिंगर प्रिन्ट विभाग) आदी उपस्थित होते.

### पं. उपाध्याय रोजगार मेळाव्यात १०० पदे भरणार

**अकोला :** जिल्हा रोजगार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे दि. १७ सप्टेंबर रोजी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात ४ नामांकित कंपन्यांतील १०० पदांची भरती करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्राचे सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी दिली.

मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी महास्वयम संकेतस्थळावर करावी व मेळाव्याच्या दिवशी मुलाखतीसाठी हजर राहावे. सोबत बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट आकारातील छायाचित्रे व इतर आवश्यक कागदपत्रे आणावीत.

## साहित्य हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम : सूरज गोळे

### स्व. उषाताई घुगे स्मृतीप्रीत्यर्थ काव्य स्पर्धा



■ प्रतिनिधी | अकोला ■

साहित्य आणि विशेषतः कविता हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. कवितेतून समाजातील विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयांची मांडणी करता येते, आणि त्यामुळे जनजागृती घडते, असे मत अकोला आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी सुरज गोळे यांनी व्यक्त केले.

स्व. उषाताई घुगे स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या काव्यस्पर्धा निकाल व कवी संमेलन या सोहळयाप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. हा कार्यक्रम अंकुर साहित्य संघ व उषाताई घुगे बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता.१४) कौलखेड येथील गणेश गार्डन सभागृहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक वासुदेवराव खोपडे होते. मंचावर माजी नगरसेवक गजानन गवई, माजी नगरसेविका योगिता पावसाळे, आणि समीक्षक डॉ. विनय दांदळे हे उपस्थित होते. प्रास्ताविक तुळशीराम बोबडे यांनी केले. राज्यभरातून आलेल्या १५० हून अधिक कविता या स्पर्धेसाठी प्राप्त झाल्या होत्या. परीक्षक म्हणून प्रसिद्ध साहित्यिक समीक्षक डॉ. विनय दांदळे यांनी परीक्षण केले. प्रथम पुरस्कार रोशन पीलवान, ब्रह्मपुरी (जि. चंद्रपूर), द्वितीय पुरस्कार अलका कोठवदे, नाशिक, तृतीय पुरस्कार सारिका अयाचित तर उत्तेजनार्थ पुरस्कार राहुल भगत, प्रिया भोंडे, प्रकाश डोबाळे, कृष्णराव घाडगे, सुमेध वानखडे यांनी पटकाविला. विजेत्या कवींना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी गजानन छबीले यांनी तर आभार कवी सुनील लव्हाळे यांनी मानले. बक्षिस वितरणानंतर झालेल्या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक शिरसाट होते. प्रमुख पाहुणे प्रा. विठोबा गवई, कवी पत्रकार देवानंद गहीले, उमा गवई यांच्यासह अनेक मान्यवर कवींच्या उपस्थितीत बहारदार कविता सादर करण्यात आल्यात. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन धीरज चावरे यांनी केले, तर डॉ. मनोहर घुगे यांनी आभार मानले.

## अकोला पारेषण वीज कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा आजपासून

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित आंतरविभागीय क्रीडा स्पर्धांना आजपासून (१६ सप्टेंबर) अकोल्यात सुरुवात होत आहे. या स्पर्धांचे आयोजन अकोल्यातील वसंत देसाई स्टेडियमवर करण्यात आले असून अकोला, वाशिम आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांतील वीज कर्मचारी यात सहभागी होणार आहेत.

कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, ॲथलेटिक्स (१००, २००, ४००, ८००, १५०० मीटर धावणे, रिले शर्यत), गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, कुस्ती, लांब उडी, उंच उडी, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टेबल टेनिस, कॅरम, ब्रिज आदी खेळांचे सामने या स्पर्धेत रंगणार आहेत.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी सतिशचंद्र भट्ट यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता संजय काटकर राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये महापारेषण अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद हंबर्डे, बुलडाणा विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष महाजन, तसेच ४०० के.व्ही. ग्रहण केंद्र अकोल्याचे कार्यकारी अभियंता रमेश वानखडे यांची उपस्थिती राहणार आहे.

या स्पर्धेत विजयी खेळाडूंची निवड परीमंडळींय स्तरावरील स्पर्धांसाठी केली जाणार आहे. या स्पर्धेचे यजमानपद अकोला विभागाकडे असून, सहभागी होण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता विनोद हंबर्डे आणि क्रीडा संयोजकांनी केले आहे.

### महानगरात द्वितीय पश्चिम विदर्भ फिजिओ मीट संपन्न

**अकोला :** आजच्या आधुनिक युगात वैद्यकीय शास्त्र समवेत फिज़िओथेरपी शास्त्र पण प्रगत होत असून आता कर्करोग सारख्या गंभीर आजारात ही फिजिओथेरपी उपचार घ्यावा लागत आहे.

या अनुषंगाने अकोला सारख्या महानगरात फिजिओथेरपी उपचाराची गुणवत्ता प्रशंसनीय असून यात अकोला असो.ऑफ फिजिओथेरपिस्ट मोलाचे योगदान करीत असल्याचे मत राष्ट्रीय पातळीवरील जेष्ठ फिजिओथेपिस्ट व टाटा हॉस्पिटल मुंबई येथील फिजिओथेरपी विभाग प्रमुख डॉ श्रीमती अनुराधा दफ्तरदार यांनी व्यक्त केले. रविवारी अकोला असो. ऑफ फिजिओथेरपिस्टच्या वतीने स्थानीय आरजी सभागृहात द्वितीय पश्चिम विदर्भीय फिजिओथेरपी संमेलन संपन्न झाले. यात पश्चिम विदर्भातील बहुतांश फिजिओथेरपिस्ट वर्गाने सहभाग घेत यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## शेत रस्त्याच्या दुरुस्तीसाठी खेट्रीत शिवार फेरी

### ग्राम पंचायतकडून ३०० शेतकऱ्यांना नोटीस बजावली



> 'सेवा पंधरवड्यानिमित्त शेत रस्त्यावरील अतिक्रमण मोकळे करण्यासाठी ग्रामसभा घेऊन गावात शिवार फेरी काढण्यात आली. या अंतर्गत ३०० शेतकऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. शेतकरी बंधूंनी तातडीने अतिक्रमण मोकळे करावे, अन्यथा प्रशासन व पोलिसांच्या संरक्षणात अतिक्रमण मोकळे करण्यात येईल.'
>
> **जहूर खान,** सरपंच

■ प्रतिनिधी | खेट्री ■

सेवा पंधरवडा मोहिमेअंतर्गत शेत रस्त्यावरील अतिक्रमण दूर करण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी खेट्री येथे ग्रामसभा घेऊन शिवार फेरी काढण्यात आली. पातुरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांच्या मार्गदर्शनात व सरपंच जहूर खान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उपक्रमात 'शेत रस्त्यावरील अतिक्रमण मोकळे करा' अशा घोषणा देण्यात आल्या.

गेल्या काही काळापासून शेत रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने रस्त्यांची दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य डोक्यावर घेऊन जावे लागत असून त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शासनाकडून रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता राबविण्यात आलेल्या पंधरवडा मोहिमेअंतर्गत शिवार फेरीच्या माध्यमातून जनजागृती करत अतिक्रमणमुक्तीचा संदेश दिला जात आहे. खेट्री येथे झालेल्या फेरीदरम्यान ग्राम पंचायतकडून तब्बल ३०० शेतकऱ्यांना अतिक्रमण मोकळे करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली.

यावेळी सरपंच जहूर खान, मंडळ अधिकारी एन. आर. बडेरे, तलाठी धम्मपाल नकाशे, डी. के. देशमुख, पोलीस पाटील भगवंत ताले, महसूल सेवक सचिन गवई, कपिल ताले, ग्राम पंचायत सदस्य शेख साजिद, रोजगार सेवक शेख उस्मान, संगणक ऑपरेटर उद्धबंड, महेताब बेग, अ. रहीम, शेख निसार, शेख शमशु आदींसह ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

### नवरात्रोत्सव – २०२५ करीता मनपात एक खिडकी कार्यान्वीत

**अकोला :** अकोला शहरात नवरात्री उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत असतो व शहरातील सार्वजनकि ठिकाणी नवदुर्गा उत्सव मंडळांव्दारे मंडप उभारून देखावे तसेच गर्भा रासचे आयोजन करण्यात येत असतात. नियमानुसार मंडप परवानगी, विद्यूत जोडणी लाऊड स्पीकर, शहर वाहतूक व ईतर परवानगी घ्यावी लागते. मंडळांना सोईचे व्हावे याकरिता मनपा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि महावितरण (धर्मदाय आयुक्त वगळून) सर्व परवानग्या एकाच ठिकाणी देण्याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये कार्यान्वीत करण्यात आली आहे.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४३९/२०२५ प्रोसेस नं.१२७८६/२०२५
चौ.ता. १६/१०/२०२५ दिनांक : ०१/०८/२०२५

**अर्जदार :** १. गजानन मारोती लोनाग्रे मयत तर्फे वारस अ. स्वाती गजानन लोनाग्रे ब. प्रिती गजानन लोनाग्रे क. योगिता गजानन लोनाग्रे ड. ज्ञानेश्वर गजानन लोनाग्रे अर्जदार १अ ते १ड रा. न्यु महसुल कॉलनी, खडकी, अकोला. ता. जि. अकोला. २. पुंडलिक मारोती लोनाग्रे रा. माझोड, ता. जि. अकोला ३. नलिनी पंजाबराव पातुर्डे रा. गायवाडी, ता. दर्यापूर, जि. अमरावती ४. गंगा विजय सोनाग्रे रा. खरप बु. ता. जि. अकोला ५. मंदा निवृत्ती पातोंड रा. अटळी, ता. खामगांव, जि. बुलढाणा. ६. यमुना मारोती गवाळे. रा. घुसर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मारोती मोतीराम लोनाग्रे २. रूखमाबाई मारोती लोनाग्रे
**पत्ता :-** रा. माझोड, अकोला. ता जि अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मारोती मोतीराम लोनाग्रे यांचे दि. २३/०७/२०१५ रोजी माझोड, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत रूखमाबाई मारोती लोनाग्रे यांचे दि. २९/०५/२०२१ रोजी माझोड, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६२७/२०२५ प्रोसेस नं.१४५६६/२०२५
चौ.ता. ०६/१०/२०२५ दिनांक : ३०/०८/२०२५

**अर्जदार :** १. वेणूताई राजेश मेंगे २. अविनाश राजेश मेंगे ३. संदिप राजेश मेंगे ४. रोहित राजेश मेंगे सर्व रा. महादेव मंदिराजवळ, खडकी बु. अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजू वैधान मेंगे
**पत्ता :-** रा. महादेव मंदिराजवळ, खडकी बु. अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजू वैधान मेंगे यांचे दि. २३/०७/२०२५ रोजी सिटी हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०६/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २९०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## गांधीग्राम येथील मुला-मुलींची खो-खो मध्ये जिल्हास्तरावर निवड



■ प्रतिनिधी | अकोला ■

शालेय शिक्षण आणि क्रिडा विभागाच्या वतीने शुक्रवार दिनांक १२ आणि शनिवार दिनांक १३ सप्टेंबर, २०२५ रोजी वसंत देसाई स्टेडियम, अकोला येथे तालुका स्तरीय खो -खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महात्मा गांधी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय गांधीग्राम येथील १४ वर्ष वयोगटात मुलांच्या तर १७ आणि १९ वयोगटातील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे या तिनही संघाची जिल्हा पातळीवरील निवड झाली आहे. प्राचार्य श्री प्रफुल्ल डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या या दोन्ही संघाना प्रा, जगन्नाथ बरडे, सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक पंडित चौधरी, संदीप इंगळे, अनिल राऊत, अनिल मैघने, अजिंक्य ठोंगे, सौ.ममता खुमकर यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.

जिल्हा स्तरावर निवड झालेल्या खेळाडूचे संस्थेचे प्राचार्य प्रफुल्ल डोंगरे, ग्रंथपाल तथा संस्थेचे उपाध्यक्ष संजय इंगळे ,ज्येष्ठ प्रा डॉ विजय चव्हाण, विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या तिन्ही संघाचे कौतुक करून, त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी आमरण उपोषणाला सुरुवात

### महापुरुषांना हार घालून आंदोलनाचा प्रारंभ; माजी आमदारांसह विविध समाज नेत्यांची उपस्थिती



■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आज सोमवार, १५ सप्टेंबरपासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार घालून आंदोलनाचा प्रारंभ करण्यात आला.

जनार्दन हिरळकर, शंकर बापूराव पारेकर, पुष्पाताई गुलवाडे, राजेश माणिकराव ढोमणे आणि ?ड. भाऊसाहेब विठ्ठलराव मेडशिकर हे पाच प्रतिनिधी आमरण उपोषण करत असून, यावेळी माजी आमदार नारायण गव्हाणकर, माजी आमदार बळीराम सिरस्कार, माजी आमदार हरिदास भदे यांच्यासह अनिल शिंदे, गजानन वाघमारे, प्रा. डॉ. संतोष हुशे, अतुल नवात्रे यांसारखे विविध समाज नेते विशेष उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मराठा समाज मागास नाही, असा निकाल दिल्यानंतरही राज्य सरकारने हैद्राबाद गेझिटियर लागू करून मराठा समाजाला आरक्षण दिले आहे. हा निर्णय ओबीसी समाजावर अन्याय करणारा असल्याचे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी लोकशाही मार्गाने लढा देण्याचा निर्धार या आंदोलनातून व्यक्त करण्यात आला आहे.

या उपोषणात सर्वपक्षीय ओबीसी नेते, डॉक्टर्स, इंजिनियर्स, वकील, प्राध्यापक, शिक्षक, शेतकरी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच ओबीसीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व जातींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यात ओतारी, डोबारी, छप्परबंद मुस्लीम, माकडवाले, लभाणी, वेरड, रामोशी, मुस्लीम शाहा, मुस्लीम मदारी, मन्नेवार, बागवान, कोल्हाटी, नंदीवाले, वासुदेव, बहुरूपी, गारपगारी, जवेरी, कासार, भांड, छप्परभांड, मानभाव, लोथी आगरी, गुजर, मैराळ, ठाकूर, गुरव, झिंगाभोई, फुलारी, गोपाळ, शिकलगार, यादव, गवळी, रंगारी, बारी, लोहार, साळी, कलाल, सुतार, गोवारी, नाथजोगी, कुणबी, माळी, धनगर, तेली, वंजारी, बंजारा, कुंभार, धोबी, न्हावी, भोई, बेलदार, सोनार, कोळी, कोष्टी, शिंपी, भावसार, गोंधळी आदी समाजांचा सहभाग अपेक्षित आहे. ओबीसी समाजाने धैर्याने आणि कायदेशीर मार्गाने या लढ्याला न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निर्माण मल्टीस्टेट अकोला कडून १२ टक्के लाभांश जाहीर

■ प्रतिनिधी | अकोला ■

'निरंतर ध्यास विकासाचा' या संस्थेच्या घोषवाक्यानुसार सतत प्रगती करीत असलेल्या निर्माण मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. अकोला ची १४ वी वार्षिक आमसभा, होटल सेंटर प्लाझा, अकोला येथे पार पडली. सभेचे अध्यक्ष स्थानी गणेशराव देशमुख होते.



सुरुवातीला अहवाल वर्षामध्ये भारतातील थोरे नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, जवान, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार क्षेत्रातील मान्यवर तसेच संस्थेचे सभासद, हितचिंतक पंचतत्वात विलिन झाले त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

संस्थेचे चिफ जनरल मॅनेजर गजानन खोटरे यांनी आर्थिक वर्षाच्या अहवालाचे वाचन करुन संस्थेने कशी प्रगती केली याबाबत माहिती दिली. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे हिशेब पत्रके व अहवाल सभेसमोर मांडला. सर्व सन्माननीय सभासदांच्या सहकार्याने व विश्वासामुळे संस्थेने अहवाल वर्षात चांगली कामगिरी केली. संस्थेच्या अहवाल वर्षामध्ये ठेवी मध्ये रुपये ३०.६३ कोटीची वाढ म्हणजेच ३५.५८% वाढ झाली. तसेच कर्जामध्ये रु.२१.२१ काटींची वाढ झाली असून संस्थेने एकूण 'कर्जामध्ये सोने व ठेव तारण रु.५१.७६ कोटी व तारणी कर्ज रु.१९.०४ कोटी केले असून एकूण कर्जामध्ये ९०% हे सुरक्षित कर्ज आहे. त्यामुळे संस्थेचा एन.पी.ए. ०% आहे. इतर बँकांमध्ये संस्थेने रु.३५.३९ कोटी गुंतवणूक केली आहे.

संस्थेचे उपाध्यक्ष के.जी. देशमुख यांनी संस्थेच्या प्रगती बाबत सर्व सभासदांचे आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष गणेशराव देशमुख यांनी संस्था सुरुवातीपासूनच पारदर्शक कारभार करी असून संस्थेने सद्या रु.१२५ कोटी ठेवीचा टप्पा पार केला असून संस्थेने ९०% सुरक्षित कर्ज वाटप केल्यामुळे संस्थेचा एन.पी.ए. ०% आहे. संस्थेला लागू असलेल्या नॉर्मस् चे पालन करीत असून ग्राहकांना मागता क्षणी पैसे परत करणे करीता पुरेपुर तरलता राखत आहे. संस्था अद्यावत टेक्नॉलॉजीचा वापर करीत आहे. संस्थेचे संचालक निस्वार्थी काम करीत असून संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचाही वाटा आहे. संस्थेचा पारदर्शक कारभार, सुरक्षित कर्ज वाटप, नियमित वसूली यामुळे संस्था सुरुवातीपासूनच नफ्यात असून लाभांश सुध्दा देत आहे. सन २०२४-२५ मध्ये संस्थेला रु.९१.४४ लाख निव्वळ नफा झाला असून यावर्षी सुध्दा संस्था सभासदांना १२ टक्के लाभांश देण्यात येईल असे जाहीर केले. तसेच संस्थेच्या भागभांडवलामध्ये वाढ होणे करीता सर्व सभासदांनी जास्तीत जास्त शेअर्स घ्यावे असे आव्हाहन केले. सभासदांचे सहकार्य आणि विश्वासामुळेच संस्था प्रगती करित आहे त्याबाबत सर्वांचे आभार मानले

संस्था केवळ बँकींग व्यवसाय करीत नसून सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. संस्था निर्माण फाऊंडेशन मार्फत गरजू व निराधार व्यक्तींना मोफत जेवणाचे डब्बे पुरवित आहे. संस्थेने कु.शिवानी देशमुख स्त्री रोग तज्ञ पदवी, प्राची गर्जे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक, कार्तिकेय मिश्रा ळख मध्ये सिनियर रिसर्च इंजिनिअर नियुक्ती, मिना देशमुख आदर्श शिक्षिका, कणक खंडारे बॉक्सींगमध्ये गोल्ड मेडल, नेहा कसले मास्टर इन फिजिओथेरपी टॉपर या सर्वांचा शाल, भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.

संस्थेचे ग्राहक प्रा.डॉ.पुजा सपकाळ यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त करुन सभासदांना संस्थेशी जुळण्याचे आवाहन केले.

सभेला संस्थेचे संचालक सुनिताताई गावंडे, संतोषराव देशमुख, प्रभाकरराव सोळंके, अरुणराव चव्हाण, कृष्णराव देशमुख, देविदास वाघमारे, वसंतराव काळे, विठ्ठलराव देशमुख, आशाताई थोरात, कविताताई ढोरे व गजाननराव देशमुख उपस्थित होते.

सूत्र संचलन शिवाजी काळे, विकास अधिकारी यांनी केले तर आभारप्रदर्शन व्ही. ओ. देशमुख संचालक यांनी केले. सभेची सांगता राष्ट्रगिताने झाली.

# ओबीसी आरक्षणात मराठ्यांची घुसखोरी?

## २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

**समुद्रपूर/जनमाध्यम**

महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्यासाठी काढलेला २ सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी ठाम मागणी महात्मा फुले समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी समुद्रपूर येथे तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली. या निर्णयाला संविधान, जात पडताळणी कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाचा भंग असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णायक निकाल**

५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात मराठा समाज मागास नसल्याचे स्पष्ट नमूद झाले होते. तसेच मराठा हे कुणबी नाहीत म्हणून त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळू शकत नाही असेही ठरविण्यात आले होते. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात महाराष्ट्रातील १० लाख सरकारी नोकऱ्यांपैकी तब्बल २ लाख नोकऱ्या केवळ मराठा समाजाकडे गेल्या असून, १९ टक्के आरक्षण असूनसुद्धा ओबीसींना केवळ ९२ हजार नोकऱ्यांवर समाधान मानावे लागत असल्याचा दाखला दिला.

**ओबीसींच्या हक्कांवर गदा**

समता परिषदेच्या नेत्यांनी उपसमितीवर गंभीर आरोप करताना म्हटले की, 'ओबीसी आरक्षणावर डल्ला मारण्यासाठीच मराठा उपसमितीने हा जीआर काढला आहे. कुणबी प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय म्हणजे ओबीसींची थेट फसवणूक आहे.तसेच मराठा समाजाला नुकतेच नोकरी व शिक्षणात १० टक्के स्वतंत्र आरक्षण मिळाले असून त्याची अंमलबजावणीही सुरू आहे. तरीही ओबीसींच्या कोट्यावर डोळा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

**छगन भुजबळांचा पाठींबा**

ओबीसी समाजाचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी नेहमीच ओबीसींचे आरक्षण अबाधित राहावे यासाठी संघर्ष केला आहे. आवश्यकतेनुसार



त्यांनी आपली राजकीय कारकीर्द व मंत्रीपद पणाला लावले, असेही समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. 'मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्या; पण ओबीसींच्या कोट्यातून नाही, हा भुजबळांचा ठाम पवित्रा असल्याचा पुनरुच्चार निवेदनात करण्यात आला.

**निवेदन तहसीलदारांना सुपूर्द**

समुद्रपूर येथील तहसीलदार मा. कपिल हाटकर यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी महात्मा फुले समता परिषदेचे तालुका अध्यक्ष विवेक चौधरी, शराध्यक्ष पवन मुळे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश गमे, हरीश काळे, गजुभाऊ दुर्गे, रूपाताई राऊत, वसंतराव खडसे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त



### पवनार येथे वसुंधरा पर्यावरण जनजागृती दिंडीचे जल्लोषात स्वागत

**पवनार(वर्धा)**- जगातगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी सेवा संस्थेतर्फे नाणीज येथून निघालेली भव्य वसुंधरा पर्यावरण पायी दिंडी आज सकाळी ११ वाजता पवनार येथे दाखल झाली. वाढत्या पर्यावरण ऱ्हासाबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने ही दिंडी काढण्यात आली असून, चार किलोमीटर लांबीच्या या पायदळ दिंडीत लाखो भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. संत तुकाराम महाराजांच्या भारुडाचे जिवंत देखावे, भारावून टाकणारे कीर्तन, पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे फलक व घोषणाबाजी यामुळे दिंडीचे स्वरूप अधिकच थाटामाटाचे झाले होते. भक्तांनी 'वृक्ष लावा, पर्यावरण वाचवा' या संदेशाने गावोगावी समाजमन जिंकले.पवनारातील आगमनानंतर या दिंडीचे पुढील प्रस्थान वर्ध्याकडे झाले असून, संपूर्ण परिसरात पर्यावरण जनजागृतीची रंगत चढली आहे.

### विष पिऊन आत्महत्या

**आर्वी** -राहत्या घरी व्यक्तीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना नांदपूर गावात घडली.किसन गोमाजी सहारे (५०) असे मृताचे नाव आहे. किसन सहारे याने नांदपूर येथील त्याच्या घरात विष प्राशन केले होते. त्याला अत्यावस्थेत सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. पुढील तपास पोलिस करीत आहे.

### दुचाकीने कट मारला; काचेने डोके फोडले

**हिंगणघाट**-दुचाकीवरून जात असताना कट मारत वाद करून काचेच्या बाटलीने एकाचे डोके फोडले. ही घटना निशानपुरा परिसरातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर शनिवारी घडली. याप्रकरणी निखिल अशोकराव रघाटाटे (२१, वाघोली) यांनी हिंगणघाट पोलिसात तक्रार दिली. यावरून दोन अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.तक्रारकर्ता हा त्यांच्या मित्रासोबत दुचाकी एमएच ३२ झेड ८४५७ क्रमांच्या गाडीने हिंगणघाटवरून वाघोलीकडे जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या दुचाकीचा कट लागला. गाडी व्यवस्थित चालवा असे म्हटले असता काचेच्या बाटलीने मारहाण केली.

### डेंग्यूसदृश आजाराने झाला मृत्यू

**देवळी** -शहरातील कानाकोपऱ्यात डेंग्यू आजाराने कहर माजविला आहे. सोबतच ताप, खोकला व थंडी वाजून हुरहुरी निर्माण करणाऱ्या अज्ञात आजारामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. या आजाराच्या अनेक रुग्णांवर सेवाग्राम,सावंगी तसेच खासगी दवाखान्यात उपचार करण्यात येत आहे. अशातच शनिवारी रात्री डेंग्यूसदृश आजाराने एकाचा मृत्यू झाला. साहिल संतोष गुजरकर (२२, रा. खटेश्वर मंदिर), असे मृताचे नाव आहे. मागील दीड महिन्यात डेंग्यू व अज्ञात आजाराची देवळीत व्याप्ती वाढली आहे. न. प. प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे ही स्थिती ओढवली आहे. जागोजागी कचऱ्याचे ढिगारे पाण्याचे डोबरे साचले आहे, साफसफाईचा तसेच पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा व जंतुनाशक फवारणीचा अभाव असल्याने आजाराची गती फोफावली आहे. रुग्णांच्या प्लेटलेट्स कमी होऊन गंभीर स्थिती निर्माण होत आहे. मृतक साहिल याच्यावर गेल्या पंधरा दिवसांपासून सेवाग्राम रुग्णालयात उपचार सुरू होते. डॉक्टरांनी अथक परिश्रम घेऊन सुद्धा यश आले नाही. रविवारी दुपारी स्थानिक मोक्षधामात त्याच्या पार्थिवावर अंतिम संस्कार केले. यावेळी माजी खासदार रामदास तडस यांची उपस्थिती होती.

### मंदिरातील दानपेटीतून १० हजार लंपास

**वर्धा**- मंदिरातील दानपेटी फोडून अज्ञात चोरट्याने १० हजार रुपये लंपास केले. ही घटना वर्धा येथील सातपुते लेआऊट येथे घडली. याप्रकरणी शहर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, सातपुते ले आऊट परिसरातील मंदिरात दानपेटी फोडलेल्या अवस्थेत दिसून आली. याची माहिती शिव मंदिरातील समितीच्या सदस्यांना देण्यात आली. पाहणी केली असता अज्ञात चोरट्याने दानपेटी फोडून अंदाजे १० हजार रुपये चोरुन नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास शहर पोलिस करीत आहे.

### शेतातून मोटार चोरी

**वर्धा -अ**ज्ञात चोरट्याने शेतातून १५ हजार किंमतीची मोटर चोरुन नेली. ही घटना गिरगाव शेतशिवारात घडली. प्राप्त माहितीनुसार, मारोत येरमे रा. उमरी पोफळे यांच्या शेतात असलेल्या १५ हजार किंमतीची मोटर अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. याप्रकरणी गिरड पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुध्द गन्हा दाखल केला आहे. पुढील तपास गिरड पोलिस करीत आहे.

### तरुणाचा गळा दाबून खून; सालोड-हिरापूर हादरले

**वर्धा**- सालोड-हिरापूर परिसरात एका तरुणाचा गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना शनिवारी संध्याकाळी उघडकीस आली आहे. विशाल उजवणे (२२) असे मृताचे नाव असून सावंगी पोलिसांच्या कार्यक्षेत्रात ही घटना घडली. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, मृत आणि आरोपी हे सालोड येथीलच रहिवासी असून ते गावाजवळील तलावावर गेले होते. तिथे एकत्र गांजाचे सेवन करताना त्यांच्यात वाद झाला. वाद चिघळताच आरोपींनी शर्टाने गळा दाबून विशालचा खून केला आणि मृतदेह तलावात फेकला.संध्याकाळी स्थानिकांना तलावात मृतदेह दिसल्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. सावंगी पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आरोपी दोघेही सध्या फरार असून जंगलात लपल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली असून संपूर्ण विभागात अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## गांजाची विक्री करणाऱ्या मायलेकं एलसीबीच्या जाळ्यात

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील अंमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई सुरू केली असून, हिंगणघाट येथे गांजा विक्री करणारी महिला व तिचा अल्पवयीन मुलाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. यामध्ये एक किलो ८८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांनी गांजासह अन्य अंमली पदार्थ बाळगणारे व विकणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्था. गु. शा. वर्धाचे पथक १३ सप्टेंबर रोजी हिंगणघाट पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना



गुप्त माहितीच्या आधारे महिला व तिचा अल्पवयीन मुलगा गांजाची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले.याप्रकरणी या आरोपी महिला वय (४१) रा. कोरा, तह. समुद्रपूर, ह.मु. महाकाली नगरी, नंदोरी रोड, हिंगणघाट या महिलेच्या राहत्या घरी एन.डी.पी.एस. कायद्याअंतर्गत छापा टाकण्यात आला. त्यावेळी तिच्याकडे एकूण १ किलो ८८ ग्रॅम गांजा, मोबाईल फोन व मोटरसायकल असा एकूण ७१७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. महिला आरोपी ही तिच्या अल्पवयीन मुलाच्या मदतीने गांजाची वाहतूक व विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, दोघांविरुद्ध हिंगणघाट पोलीस स्टेशन येथे एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात पो.उपनि. सलाम कुरेशी, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, निलीमा उमक, रवि पुरोहित, अक्षय राऊत, राहुल लूटे, अभिषेक नाईक यांनी केली.

## रस्त्यावर मोकाट जनावरांचा कहर; नगरपालिका निद्रावस्थेत!

**वर्धा**-शहरात रस्त्यांवर मोकाट जनावरांचा सुळसुळाट सुरु असून, नागरिकांना दररोज भीषण त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर बसलेले व फिरणारे गाई, म्हशी, बकऱ्या यामुळे वाहन चालकांना अपघातांचा धोका भेडसावू लागला आहे. या गंभीर प्रश्नाकडे वर्धा नगरपालिका गंभीरपणे दुर्लक्ष करत आहे, अशी तीव्र टीका प्रभावित नागरिकांकडून होत आहे. वाहतूक पोलीस विभाग तसेच विविध सामाजिक संघटनेने, समाजसेवकाने अनेकदा या मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पत्रव्यवहार केले, पण प्रशासनाच्या निद्रावस्थेमुळे समस्या अनियंत्रितपणे वाढत आहे. रस्त्यावर बसलेली जनावरे अपघात घडवून आणत आहेत, तर रोज अनेकांनी जीव धोक्यात टाकला आहे.नगरपालिकेच्या निष्क्रियतेमुळे वर्धा शहर कचराकुंड्यांशिवाय आणि मोकाट जनावरांशिवाय संपणार नाही, अशी भीती निर्माण झाली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे वेगाने लक्ष देण्याची मागणी करत भविष्यकाळात मोठ्या आंदोलनाची तळमळ व्यक्त केली आहे.



## पुलगाव आगाराच्या वाहकाचा उद्धटपणा; प्रवाशांत संताप, निलंबनाची मागणी

**विजयगोपाल/जनमाध्यम**

कळंब–पुलगाव मार्गावरील विजयगोपाल गावाशी जोडणाऱ्या एस.टी. बस सेवेत होत असलेल्या अडचणींमुळे प्रवासी आधीच त्रस्त असताना, पुलगाव आगारातील राहुल दौड या वाहकाच्या उद्धट वर्तनामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. 'मी वर्धा जिल्हा अध्यक्ष आहे, कुणाला भीत नाही' अशा दमबाजीसह प्रवाशांशी सतत अरेरावी करणाऱ्या या वाहकाविरुद्ध विद्यार्थ्यांसोबतच ग्रामस्थांनी आता आवाज उठविला आहे.

**बस थांबवलीच नाही**- शिरपूर येथील चार युवक पुलगाव येथे ट्युशनसाठी जात होते. त्याचवेळी पावसामुळे एका मुलाने आडोशाला उभे राहत हात दाखवला नाही. यावरून वाहकाने बस न थांबवण्याचा निर्णय घेतला.

नंतर युवकांनी आक्षेप घेतल्यावर 'हात दाखवल्याशिवाय बस थांबत नाही, काही करायचे असेल तर करा' अशी खवचट प्रतिक्रिया दिली. यामुळे जागोजागी संतापाची लाट उसळली.

**जुन्या घटनाही वादग्रस्त**- मागील काही महिन्यांपूर्वी याच वाहकाने विजयगोपाल येथे युवकांशी वाद घालून लोखंडी रॉड घेऊन हाणामारी करण्याची वेळ आणल्याची घटना घडली होती. त्यामुळे त्याच्या उद्धट आणि वादग्रस्त वागण्याविषयी आधीच नाराजी आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, याला आगारातील वरिष्ठांचा आशीर्वाद लाभलेला असल्याने कारवाई होत नाही.

**युवक व विद्यार्थ्यांचा इशारा**-या वाहकाला किमान सात दिवसांसाठी निलंबित करावे किंवा या मार्गावरून हटवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा चक्का जाम आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युवक व विद्यार्थी यांनी दिला.

**मार्गाचे महत्व** -कळंब–पुलगाव हा ५० किलोमीटरचा महत्त्वाचा मार्ग असून ४० ते ५० गावे या मार्गाद्वारे जोडलेली आहेत. सकाळची ही पहिली बस असल्याने शेतकरी, नागरिक, विद्यार्थी तसेच वृत्तपत्र वितरणासाठीही याच गाडीवर अवलंबून राहावे लागते.

परंतु बसेस कमी असून, वेळेत व व्यवस्थित सेवा मिळत नसल्याने लोकांचे हाल होत आहेत.स्वप्नील खडसे, माजी प.स. सदस्य तथा ग्रामीण तालुका अध्यक्ष भाजपा, यांनीही या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी करून नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले आहे.

## एमडी तस्कर वर्धा पोलिसांच्या जाळ्यात

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरातील पोलिसांच्या अंमली पदार्थविरोधी मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. शहराजवळील आनंद नगरातून ४०० ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) जप्त केल्यानंतर तपासादरम्यान कुख्यात तस्कर हुसेन उर्फ कलाम अजीज शेख अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे.

या प्रकरणात पूर्वीच मुंबईतील काही महिलांना अटक करण्यात आली होती. मात्र तस्करी सिंडिकेटचा मुख्य सूत्रधार 'कलाम' पोलिसांना बराच काळ चुकवत होता. अखेर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता, त्याची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.या प्रकरणामागील मोठा रॅकेट कोणाच्या आश्रयाने सुरू होते आणि शेख कोणाच्या हस्तक म्हणून कार्यरत होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या कारवाईमुळे वर्ध्यातील अंमली पदार्थ सिंडिकेटला मोठा धक्का बसला आहे.

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांची रोहना प्रा. आरोग्य केंद्राला भेट

**विरूळ(आ)/जनमाध्यम**

प्रा. आरोग्य केंद्र रोहना येथे शनिवारी आयोजित पंधरवडी सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी आकस्मिक भेट दिली. यावेळी त्यांनी सर्व राष्ट्रीय कार्यक्रम, मोहीम, स्वच्छता उपक्रम, तसेच बांधकामाची पाहणी करून कर्मचाऱ्यांच्या कामाचा स्वतंत्र आढावा घेतला. १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान राबविण्यात येणारी गोवर-रुबेला लसीकरण मोहीम कोणताही लाभार्थी वंचित



राहणार नाही अशा पद्धतीने यशस्वीपणे पार पाडावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच स्वस्थ नारी-सशक्त परिवार ही मोहीम ग्रामस्तरावर लोकप्रतिनिधींच्या सहभागासह राबवावी, कुटुंब नियोजनाची कामे लवकर पूर्ण करावीत, नियमित गृहभेटी देऊन साथरोग व कीटकजन्य आजार टाळावेत, प्रभावी जनजागृती करावी, सर्व ऑनलाइन नोंदी वेळेवर कराव्यात, कर्मचारी मुख्यालयी राहून सेवा द्यावी आणि तीन महिन्यांचा औषधसाठा शिल्लक ठेवावा, अशा महत्त्वाच्या सूचना त्यांनी दिल्या.या सभेला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेंद्र वर्मा, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेया डंभारे, डॉ. रुचिरा पाटील, तालुका आरोग्य सहाय्यक अविनाश चव्हाण यांसह प्रा. आरोग्य केंद्रातील सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सेविका व कर्मचारी उपस्थित होते.

## स्त्रीमुक्तीचा आवाज बुलंद!

## महिला मेळाव्यात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद, वर्धा यांच्या वतीने एक दिवसीय महिला मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात वर्धा व परिसरातील तब्बल ४३ गावांतील सुमारे १३५ महिला व पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

मेळाव्याची सुरुवात संविधानाच्या प्रास्ताविकेच्या वाचनाने झाली. प्रास्ताविक प्रा. नूतन माळवी यांनी केले. प्रमुख पाहुण्या यामिनी चौधरी (नागपूर) यांनी स्त्रीमुक्ती चळवळीचा इतिहास, त्याचे सकारात्मक-नकारात्मक परिणाम तसेच आजची आव्हाने यावर भाष्य केले. सुकानू समितीच्या शुभदा देशमुख यांनी जातीय, धार्मिक आणि कौटुंबिक हिंसेचे प्रकार



स्पष्ट करत सेफ्टी ऑडिट, युवा महोत्सव व 'मनुस्मृती की संविधान' यांसारख्या उपक्रमांची माहिती दिली.

तसेच डिसेंबर महिन्यातील पुढील मेळाव्याची रूपरेषा उपस्थितांना सांगितली. गटचर्चांमध्ये विविध विषय हाताळण्यात आले. सुषमा शर्मा यांच्या गटाने माझ्या स्वप्नातील कुटुंब, गाव व देश या विषयावर चर्चा केली. दुसऱ्या गटात सुजाता यांच्या नेतृत्वाखाली हिंसेचे विविध पैलू या मुद्द्यावर चर्चा झाली. तिसऱ्या गटात ड्वोकेट अस्मिता यांनी संविधान, कायदे व अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन करत अनेक कायदे कागदावरच राहिल्याची खंत मांडली. सुरुवातीला सानिका, मीना व कल्पना यांनी चळवळीची गाणी सादर केली.

तसेच खुल्या चर्चेत दिलीप ऊटाणे व रोहिणी बाबर यांनी आपली मते व्यक्त केली. सूत्रसंचालन कल्पना सातव भुसारे यांनी केले तर आभार प्रदर्शन द्वारका इमडवार यांनी केले.या महिला मेळाव्यात अंगणवाडी सेविका, आरोग्यसेविका, वकील, शिक्षिका, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या अशा विविध क्षेत्रातील महिलांचा सहभाग होता. वर्धा, पवणार, सेवाग्रामसह ४३ गावांतील कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावून मेळावा यशस्वी केला.

## स्व.आ.डॉ.काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त निरंजन टकले यांचे व्याख्यान

**आर्वी**- स्व. आ. डॉ. शरदराव काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'भारतीय लोकशाहीचे महाकाव्य व वोटचोरी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रख्यात पत्रकार निरंजन टकले या व्याख्यानात मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम १७ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता आशीर्वाद मंगल कार्यालय, आर्वी येथे होणार आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शरदराव काळे स्मृती सेवा प्रतिष्ठानने केले आहे.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २८९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जी एच रायसोनी विद्यापीठात आर्ट ऑफ लिव्हिंग कार्यशाळा





**अमरावती/प्रतिनिधीः-**
जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील संगणक अनुप्रयोग विभागाने लर्निंग अँड डेव्हलपमेंट सेलच्या सहकार्याने नुकतीच 'मन-शरीर-बुद्धी समन्वयासाठी श्वासतंत्र' या विषयावर एक प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक कार्यशाळा आयोजित केली. बेंगलोरस्थित आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनचे वरिष्ठ प्राध्यापक ऋषी देवव्रतजी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यशाळेचा उद्देश जागरूक श्वासाद्वारे मानसिक, शारीरिक आणि भावनिक कल्याण वाढवणे हा होता. या आयोजनाने ५० प्राध्यापकांना तणाव व्यवस्थापन आणि आध्यात्मिक विकासासाठी व्यावहारिक साधने प्रदान केली.

कुलपती डॉ. विनायक देशपांडे आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ.प्रशांत अवचट यांच्या प्रेरक मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रजिस्ट्रार डॉ. स्नेहिल जायसवाल, अधिष्ठाता डॉ. शैलेश ठाकरे आणि संगणक अनुप्रयोग विभागप्रमुख डॉ. भवना करमोरे उपस्थित होते. कार्यशाळेची सुरुवात उत्साहवर्धक योग व्यायाम आणि मजेदार खेळांनी झाली, ज्याने ५० उत्साही प्राध्यापकांसाठी जीवंत आणि सहज वातावरण निर्माण केले. ऋषी देवव्रतजी यांनी भस्त्रिका प्राणायाम आणि नाडी-शोधन प्राणायाम यांसारख्या प्रभावी श्वासतंत्रांचा परिचय करून दिला, त्यानंतर एक मार्गदर्शित ध्यान सत्र आयोजित करण्यात आले. त्यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या प्रसिद्ध सुदर्शन क्रिया यावर विशेष भर दिला, जी वैज्ञानिक अभ्यासांद्वारे समर्थित आहे आणि सर्वांगीण आरोग्यावर गहन प्रभाव टाकते. याशिवाय, अंतर्जनन प्रक्रियांवर एक ज्ञानवर्धक व्हिडिओ दाखवण्यात आला, ज्याने सत्राला अधिक समृद्ध केले. कार्यशाळेत तणाव आणि चिंता कमी करणे, भावनिक संतुलन, मानसिक स्पष्टता, मनःस्थितीत सुधारणा आणि नैराश्य व आघातांचा सामना करणे यासारख्या प्रमुख उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. श्वासतंत्रांचे शारीरिक फायदे जसे की रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, हृदय आणि श्वसन कार्यक्षमता सुधारणे, ऊर्जा पातळीत वाढ, झोपेची गुणवत्ता सुधारणे आणि कोर्टिसॉलसारख्या तणाव हार्मोन्सचे नियमन करणे यावरही प्रकाश टाकण्यात आला. आध्यात्मिक दृष्टिकोनातून, या प्रथांना खोल आत्म-जागरूकता, आंतरिक शांती आणि मन-शरीर-आत्मा यांच्या समन्वयाद्वारे अंतर्गत क्षमता उजागर करण्याचा मार्ग सांगितला गेला.

कार्यशाळेच्या समारोपात डॉ.स्नेहिल जायसवाल यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि याला प्राध्यापक कल्याणासाठी एक सर्वांगीण दृष्टिकोन म्हटले. ही कार्यशाळा केवळ तणाव व्यवस्थापनासाठी साधने प्रदान करत नाही, तर जीवनातील आध्यात्मिक आयामांची सखोल समज देखील देते, जी सहभागींना संतुलित आणि परिपूर्ण जीवन जगण्यासाठी सक्षम करते.

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१९१२/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.०८/०९/२०२५

**वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.३५०/२०२५ — ने.ता.३०.०९.२०२५

**अर्जदार -**
१. **रफियोद्दीन सदरोद्दीन,** वय ४९ वर्षे, धंदा - मजुरी
२. **कमरोद्दीन सदरोद्दीन,** वय ४७ वर्षे, धंदा - शेती
३. **सबिहा परवीन एजाज उल्लाह खान,** वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बार्शी टाकळी, ता.बार्शी टाकळी,जि.अकोला
४. **नसीबोद्दीन सदरोद्दीन,** वय ४० वर्षे, धंदा - मजुरी
५. **अजरोद्दीन सदरोद्दीन,** वय ३४ वर्षे, धंदा - मजुरी
६. **समुय्यापरवीन सैय्यद जावेद,** वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
७. **नसरोद्दीन सदरोद्दीन,** वय ३१ वर्षे, धंदा - मजुरी
८. **जबीउद्दीन सदरोद्दीन,** वय २९ वर्षे, धंदा - मजुरी
नं.१,२,४,५,७ व ८ रा. मुल्लापुरा बाभळी, ता.दर्यापुर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **सदरोद्दीन शमसोद्दीन** हे दिनांक **०६.०७.२०२३ रोजी मरण पावले आहेत.** तसेच **फैमीदाबी सदरोद्दीन हया दिनांक ०९/०१/२०२२** रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत सदरोद्दीन शमसोद्दीन** यांचे नावे मौजे बाभळी गट क्र.९२/१/ब, , क्षेत्रफळ १ हे ६० आर ही शेत जमीन आहे. याची बाजारभावाने किंमत अंदाजे २५,०००/- इतकी आहे तसेच **फैमीदाबी सदरोद्दीन** यांचे नावे मौजे बाभळी गट क्र. ९२/१/ब क्षेत्रफळ ० हे. ८२ आर ही शेत जमीन आहे याची बाजारभावाने किंमत अदांजे २५,०००/- इतकी असून अशी मालमत्ता आहे.

आज दि.**०८.०९.२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहा. अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.ए.एच.बेग ५ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -२३९५/२०२३**
**सविता वि मंगला**
**पुढील तारीख २२.०९.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-**
१. **सौ.सविता हिम्मत चक्रपानी,** वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गल्ली नं.१, श्याम नगर अमरावती, ता.जि.अमरावती
२. **सौ.सिमा देविदास पंचभाई,** वय ६२ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त
रा.प्रशांत नगर, किशोर नगर जवळ, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-**
१. **मंगला रविंद्र मेश्राम,** वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गुरुजी एमजी मार्ग जवळ,वृंदावन कॉलनी, ता.जि.अमरावती
२. **निनाद रविंद्र मेश्राम,** वय ३२ वर्षे, धंदा - विदयार्थी
रा.गुरुजी एमजी मार्ग जवळ,वृंदावन कॉलनी, ता.जि.अमरावती
३. **शशिकांत हरिभाऊ मेश्राम,** वय ६८ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.गुरुजी एमजी मार्ग जवळ,वृंदावन कॉलनी, ता.जि.अमरावती
४. **पदमाकर हरिभाऊ मेश्राम,** वय ६३ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.गोल मार्कट, ई-५/२, अपार्टमेट कॉलनी, गणेश खिंड पुणे

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत समतानंद हरिभाऊ मेश्राम दि.१८/०६/२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार सविता हिम्मत चक्रपानी व इतर** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सविता हिम्मत चक्रपानी व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १०.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५७४/२०२५ — ने.ता. १७.१०.२०२५

**अर्जदार :**
१) **श्रीमती आशा अंबादासराव बोरखडे,** वय ६९ वर्षे, धंदा - घरकाम
२) **अलका दिलीपराव कडु,** वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
३) **संदीप अंबादासराव बोरखडे,** वय ४९ वर्षे,व्यवसाय-शेती
४) **अरविंद अंबादासराव बोरखडे,** वय ४६ वर्षे,व्यवसाय-नोकरी
अर्जदार क्र.१,३ व ४ रा.वडुरा, पो.शिराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ रा.गोपाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक अंबादास आनंदराव बोरखडे यांचा मृत्यू दि.१२/०८/२०२२** रोजी वरुड,ता.वरुड,जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक मनकर्णा आनंदराव बोरखडे** हया ब-याच वर्षापूर्वी रा.वडूरा,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे मय्यत झाल्या आहेत. यांच्या मृत्यूदार अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.५७४/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०९.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## पशुवैद्यकीय विभाग

**कार्यालय, महानगरपालिका, अमरावती**
**जा.क.अमनपा/प.वै.वि./३१४/२०२५**
**दिनांक ११/०९/२०२५**

मा.आयुक्त यांचे वतीने अमरावती महानगरपालिकेच्या पशु वैद्यकीय विभागामार्फत खालील कामासाठी कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहे. निविदाचे दर निविदा उघडण्याचे तारखेपासून ९० दिवसापर्यंत किंवा त्यावर अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधितांवर बंधनकारक राहील. प्राप्त निविदा छाननी समितीच्या सभेमध्ये उघडण्यात येतील. कोणतीही निविदा किंवा सर्वच निविदा कारण न देता रद्द करण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवला आहे. बोलविण्यात आलेल्या निविदा मधील कामाचे स्वरुप कमी-जास्त करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

सदर उपक्रम **तथा** कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालय याचिका क्र.६९१/२००९ अंतर्गत मुद्दा क्र.३ नुसार दिलेल्या निर्देशानुसार सदर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असून सदर कार्यवाहीमध्ये AWBI मान्यताप्राप्त संस्था असणे बंधनकारक असून सदर संस्थांना सदर कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

| कामाचे नांव | कार्यक्षेत्र | कामाचा कालावधी | कामाची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| (ABC Rule (२००१) मधील तरतुदीनुसार अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट व हिंसक, रोगग्रस्त, रेबिज ग्रस्त श्श्वान पकडण्याकरीता २ TATA-S वाहने व १० मनुष्यबळ पुरविणेबाबत | अमरावती महानगरपालिका अमरावती | १ वर्षे | ४४१६५००/- | ४४१६५/- | ५०० + ९० जीएसटी = ५९० |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड आरंभ | - | ११/०९/२०२५ |
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड समाप्त | - | १७/०९/२०२५ - ४.०० पर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | - | १७/०९/२०२५ - ४.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक | - | १८/०९/२०२५ |
| ई-निविदा उघडण्याची वेळ व दिनांक E-mail व SMS केल्या जाईल. | | |

ई-निविदे बाबत सविस्तर माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरी/-**
**पशुवैद्यकीय अधिकारी,**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वाक्षरी/-**
**उपायुक्त (प्रशा.)**
**महानगरपालिका, अमरावती**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एन.सी.सोरटे, ११ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५४४/२०२५
**मनोज अधिक सात -वि- निरंक**
पुढील ता.०७.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Manoj Gunwantrao Morey, Age 54 Yrs. Occu.: Doctor
R/o Flat No.202, Shri Shakti Apartment, Wathoda Layout Ayodhya Nagar, Nagpur
2. Rekha Gunwantrao More, Age 65 Yrs. Occu.: Retired
R/o Indrabhavan Theatre, Sabanpura, Amravati.
3. Renuka Gunwantrao More, Age 63 Yrs. Occu.: Retired
R/o Near Old Dharamshala Church Compound, Civil Line, Yavatmal.
4. Alka Abhay Peter, Age 60 Yrs. Occu.: Retired
R/o Near M.N.P.School No.16, Ambika Nagar, Amravati.
5. Nilima Suresh Ingle, Age 63 Yrs. Occu.: Retired
R/o Ashtavinayak Nagar, B/85-86, Bu.Akola
6. Rajashir Samadhan Patil, Age 56 Yrs. Occu.: Housewife
R/o Warora Road, Near Persapan Hostel, Pragati Nagar, Ward No.3, Wani, | Tq.Wani, Dist. Yavatmal
7. Ranjana Kashinath Ingale (Died) Through Lr's
7(1) Nikhil Kashinath Ingale, Age 40 Yrs. Occu.: Advocate
R/o Plot No.86, Gaglani Nagar, Wadali Naka, Chandur Rly.Road, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gunwantrao Dhansaji Morey हे दिनांक 18.01.2024 रोजी Amravati येथे मयत झाले. व मयत Manorama Gunwantrao More ही दिनांक २९.०४.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **मनोज गुणवंतराव मोरे अधिक सात विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मनोज गुणवंतराव मोरे अधिक सात विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४.०३.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १९०९/२०२५**
**देविदास वि.निरंक**
**पुढील तारीख २९.०९.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-**
१. **देविदास बापुरावजी हिवसे,** वय ६१ वर्षे, धंदा - मजुरी
२. **सुभाष बापुरावजी हिवसे,** वय ५३ वर्षे, धंदा - मजुरी
३. **राजेंन्द्र बापूराव हिवसे,**वय ५१ वर्षे, धंदा - मजुरी
४. **अशोकराव बापुराव हिवसे (मयत) त्यांचे वारस -**
१. **ज्योती अशोकराव हिवसे (मयत)**
२. **रोशन अशोकराव हिवसे (मयत)**
३. **राणी अशोकराव हिवसे,** वय २९ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
रा.चिंचफाईल, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बापुराव रामचंद्र हिवसे दि.१४/०७/२००७ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार देविदास बापुरावजी हिवसे व इतर यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **देविदास बापुरावजी हिवसे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## एकविरा मातेस चांदीच्या अलंकारांची नवी झळाळी

**अमरावती/प्रतिनिधीः-**
श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी या अमरावतीच्या ग्रामदैवतांच्या मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवाच्या तयारीला सुरुवात झाली आहे. भक्तांच्या ओढीचे केंद्र असणाऱ्या या मंदिरांत देवीच्या अलंकारांना व पूजावस्तूंना नवा साज चढविण्याचे पावन कार्य सुरू झाले आहे.श्री एकविरा देवी मंदिर संस्थेच्यावतीने मंदिरातील सर्व चांदीचे अलंकार, दागिने व पूजावस्तूंची शुद्धीकरण प्रक्रिया सुवर्णकार बांधवांच्या हस्ते पार पडत आहे.

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.बी.कलदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७७३/२०२५
**प्रमिला -वि- निरंक**
पुढील ता.२४.०९.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. प्रमिला लालसिंग ठाकूर, वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.२, हनुमान वार्ड ग्रामपंचायत मागे पोस्ट पवनार, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शंकरसिंह मनुरसिंह गहरवार** हे दिनांक 11.01.2005 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रमिला लालसिंग ठाकूर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमिला लालसिंग ठाकूर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५७१/२०२५ — ने.ता.२८.१०.२०२५

**अर्जदार :**
१. विनोद शंकरराव वसु, वय ५५ धंदा - शेती
२. अशोक शंकरराव वसु,, वय ४८ धंदा - शेती
३. आशा सुभाष भूयार, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
४. उषाताई अशोकराव ठाकरे, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
५. अलका विनोद पारधी, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
अर्जदार नं.१ व २ रा.खेल महाल, करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ व ४ रा.गोराळा, पो.मंगरुळ भिलापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
अर्जदार नं.५ रा.टाकळी, पो.टाकळी, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत शंकरराव बळीरामजी वसु** यांचा मृत्यू दिनांक **१३.११.१९७५** रोजी खेल चौधर करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मयत गुंफाबाई शंकरराव वसु** हिचा दि.**१९.०३.२०२४** रोजी खेल चौधर करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार मयतांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५७१/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१०.०९.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९२६/२०२५
**श्रीमती नाहिद सुल्तान अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२४.०९.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. नाहीद सुल्ताना अब्दुल कलाम, वय ५४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.कोहीनूर किराणा दुकानाजवळ, जमील कॉलनी, अमरावती
२. ताजीन फातेमा अब्दुल कलाम, वय २७ वर्षे, व्यवसाय - विद्यार्थीनी
रा.कोहीनूर किराणा दुकानाजवळ, जमील कॉलनी, अमरावती
३. तहेरीम फातेमा अब्दुल कलाम, वय २४ वर्षे, व्यवसाय - विद्यार्थीनी
रा.कोहीनूर किराणा दुकानाजवळ, जमील कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अब्दुल कलाम अब्दुल कादीर** हे दिनांक 28.06.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नाहीद सुल्तान अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नाहीद सुल्तान अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

Shri Shivaji Education Society, Amravati
**Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Morshi Road, Amravati.**

**ADMISSION OPEN NOTICE**
**2025-2026**

Applications are invited from eligible candidates for vacant seats after CAP Rounds. /Institutional Round for against CAP Seats for Academic Year 2025-2026.

All desirous and eligible candidates shall submit their application in online mode and fill option form as per scheduled declared in CET CELL portal and prescribed format along with all necessary documents. And also visit college for more details and update.

**College Code:**-1000410412 for LLB (3-Years Degree Course)
(16/09/2025 to 18/09/2025)

**College Code:**-1000310812 for LLB (5-Years Degree Course)
(13/09/2025 to 16/09/2025)

**Cutoff Date :-** LL.B. 3 Years 25/09/2025
LL.B. 5 Years 22/09/2025

**For more details Scheduled and update visit: -**
https://llb3cap25.mahacet.org
- https://llb5cap25.mahacet.org

**Shri. Harshavardhan P. Deshmukh**
President
Shri. Shivaji Education Society, Amravati

**Dr. Varsha N. Deshmukh**
Principal
Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati

---

## जाहीर नोटीस/समन्स
**आदेश ०५ नियम २० सी.पी.सी.प्रमाणे**
**चांदूर रेल्वे येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयायतील**

आर.सी.एस.क्र.१०/२०१३ — ने ता.१८.०९.२०२५

**बनाम -** **१. सौ.सुहासिनी सुरेश देशमुख**
**२. श्वेता सुरेश देशमुख**
**दोन्ही रा.C/o अक्षय देशमुख, भावना कॉलनी, एकविरा नगर, जयेंद्र कॉलनी, सुदर्शन बिल्डीग जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती**

ज्याअर्थी वरील अर्जदार विद्या यांनी वरील न्यायालयामध्ये आपणा विरुध्द दावा/अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी आपणास समन्स देण्यात येते की, त्यांचे अर्जाचे सुनावणीकरीता दिनांक १८.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वरील न्यायालयामध्ये स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९ माहे सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
Asstt.Supdt.to
Civil Court, Chandur Rly.

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९६८/२०२५
**श्रीमती कविता अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.३०.०९.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Kavita Devanand Vitiwale, Age 45 Yrs. Occu.: Household
2. Nandini Devanand Vitiwale, Age 14 Yrs. Occu.: Education
3. Dhananjay Devanand Vitiwale, Age 07 Yrs. Occu.: Education
Appli.No.2 & 3 being minor through legal guardian mother i.e.Appli.No.1
4. Smt.Anysaya Parashram Vitiwale, Age 62 Yrs. Occu.: Household
All R/o Gopalpur, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देवानंद परशराम विटीवाले** हे दिनांक 15.05.2025 रोजी **अकोला, ता.जि.अकोला** येथे मयत झाले. अर्जदार **कविता + 03 विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कविता + 03 विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६३९/२०२५
**सुनिता -वि- निरंक**
पुढील ता.२७.१०.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. सुनिता अशोकराव चौधरी वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. अनुप अशोकराव चौधरी, वय ३५ वर्षे, व्यवसाय - व्यापार
नं.१ व २ रा.शिक्षक कॉलनी, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती
३. सौ.शुभांगी सोपान ठाकरे, वय ३१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जवळा शहापूर, ता.जि.अमरावती
४. रोशनी विलास कांबे, वय २८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.सासन बँक, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अशोक पुंडलिक चौधरी** हे दिनांक 31.05.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनिता अशोकराव चौधरी व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिता अशोकराव चौधरी व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# संत्रा पीक व्यवस्थापनाबाबत अधिकारी पोहोचले शेतात


**मोर्शी/वार्ताहर**

तालुक्यातील मोठ्या प्रमाणात संत्रा क्षेत्र असलेले गावे दापोरी, इस्माईलपूर, हिवरखेड, उमरखेड, बेलोणा, जामठी, घोडदेव, पाळा येथे संत्रा उत्पादक शेतकरी यांच्या शेतामध्ये जाऊन संत्रा फळगळ तसेच कीड व रोग बाबत नियंत्रण,फायटोप्थोरा ब्राऊन रॉट,माइट, फळ माशी, ग्रीनिंग,माती परीक्षण, नवीन संत्रा लागवड, संत्रा बाग मशागत, फळ काढणीनंतर फवारणी आणि खात व्यवस्थापन पाणी व्यवस्थापन, सूक्ष्म मूलद्रव्ये बाबत सविस्तर मार्गदर्शन करणेकरिता अधिकारी शेतात पोहोचले .



अखिल भारतीय संशोधन प्रकल्प डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील शास्त्रज्ञ डॉ.प्राध्यापक वनस्पती रोगशास्त्र योगेश इंगळे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत संत्रा संशोधन केंद्र अचलपूर, येथील शास्त्रज्ञ प्राध्यापक उद्यानविद्या डॉ.राजेद्र वानखडे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील संशोधन संयोगी कौस्तुभ देशपांडे तसेच उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी उज्वल आगरकर व मुख्य कार्यकारी अधिकारी सिट्रस इस्टेट, उमरखेड अजय तळेगावकर यांनी केले. यावेळी संत्रा उत्पादक प्रवीण होले, देवेंद्र गोरडे, आशिष कोरडे, संजय जंवजाळ, संजय निमजे,प्रमोद भाकरे, सुनिल मोहने, अरविंद खंडारे,कन्हैय्याजी चौधरी, नंदू श्रीखंडे, विनोद सारस्कर, प्रवीण धोटे,सुनील मोहने, राजेंद्र भुजाडे,किसनराव नेवारे,अजय गुडधे,सुनील बनारसे, गजानन खाडे, सैय्याद देशमुख,उमेश हरले, प्रफ्फुल भुयार,संदीप पंडागळे, संदीप झोड, नितीन भुजाडे,प्रवीण जेवढे सुरेश घोरमाडे, राज नागवंशी, निलेश जेवढे,महादेव वाघमारे, साहेबराव ठोंबरे, लोकेश लोहकरे, अक्षय गडेकर, अशोक डबराशे, विवेक नागले, करणभाऊ जेवडे, शुभम भाकरे रवी मस्की, बबन कोंडे,मंगेश मस्की,मंगेश जिचकार, शेखर गांजरे,श्याम अंधारे, संजय ढोके, रामचंद्र राणे,प्रमोद भाकरे, अरविंद गुडधे, सुरेश पेठे, विनायक भोरगडे, अनिकेत भाकरे, मिलिंद राऊत, रूपाली सियाले, सोनूनंदाताई गवई, चर्चा व मार्गदर्शन कार्यक्रम करिता तालुका कृषी अधिकारी मोर्शी प्रथमेश माने, उप कृषी अधिकारी मोर्शी,मोहन फुले, मनीष काळे सहयाक कृषी अधिकारी दापोरी, सौरभ अंधारे सहयाक कृषी अधिकारी हिवरखेड, अर्वंतिका कोल्हे सहायक कृषी अधिकारी सालबर्डी, संजय अंधारे सहयाक कृषी अधिकारी डॉ.यावली, मनोज लंगोटे सहयाक कृषी अधिकारी पाळा तसेच संत्रा उत्पादक शेतकरी बांधव यांची उपस्थिती होती.

# चोरी गेलेल्या बकऱ्यांसह आरोपी अटक



**बेलोरा/वार्ताहर**

चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत बेसखेडा येथील रवी किरण पाटील यांच्या बेस खेळाचे शिवारातील दहा बकऱ्या आरोपी अल्केश प्रेमलाल कांदेकर, सुरज रामदास धोंडेकर, रवी सोमा काळे तिन्ही राहणार चिखलदरा तालुक्यातील ८ सप्टेंबर रोजी रात्री रखवालदाराला खोलीमध्ये कोंडून दहा बकऱ्या फोर व्हीलर गाडी त्याची किंमत एक लाख ७० हजार रुपये चोरून नेले. अशी तक्रार रवी पाटील यांच्या रखवालदार श्रीकृष्ण धोंडा यांनी दिल्ली होती, त्यानुसार चांदूरबाजार ते ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखा लि.एपीआय उल्हास राठोड, नितीन डोंगरे, राहुल गवरखेडे,जितेश सावरकर यांनी गुप्त माहिती वरून रात्रीच्या वेळेस आरोपी बकऱ्या विकण्याच्या बेतात असल्यामुळे लाखनवाडी तालुका खामगाव लोकेशन वरून आरोपींना अटक करून बकऱ्य,गाडीचे एकूण किंमत एक लाख ७० हजार रुपये माल जप्त करण्यात आला. चांदूरबाजार पोलीस स्टेशनचेएपीआय उल्हास राठोड,नितीन डोंगरे तपास करीत आहे.

## संक्षिप्त

### संत्रा उत्पादक शेतकरी नितीन वरठी यांचा सत्कार

**कुऱ्हा-** येथील ॲग्रोस्मार्ट फार्मर प्रोड्युसर कंपनी ली. अमरावती द्वारा आयोजित संत्रा पिक परिसंवाद कार्यक्रम श्रीकृष्ण मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता.अध्यक्षा सरपंच मीना सु. नायर उद्घाटक आ.संजय खोडके होते. शास्त्रज्ञ फळबाग डॉ. राजेंद्र वानखडे, कृषी विद्यावेत्ता कृत्रीम बुध्दीमत्ता डॉ. योगेश कदम, विभागीय व्यवस्थापक दिनेश डागा, उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. पंकज चोडे, डॉ. आतुल कळसकर, उज्वल आगरकर, हेमलता इंगळे,विक्री विभागीय व्यवस्थापक शुभम ढोणे यांनी संत्रा पिकावरील येणाऱ्या समस्या आणि विक्री व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले.सर्व संत्रा शास्त्रज्ञ यांनी संत्रा फळांचे नियोजन, शास्त्र शुद्ध पद्धतीने किड रोग ओळख आणि नियंत्रण, बुरशीवरील सर्व समस्या आणि नियोजन, विक्री व्यवस्थापन आणि मार्केट याबाबत मार्गदर्शन केले व सर्व शेतकऱ्यांना संत्रा पिक परिसंवाद माहिती समजून सांगितली. यावेळी कुऱ्हा येथील संत्रा उत्पादक तथा प्रगतशील शेतकरी म्हणून नितीन शेषराव वरठी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शेअर प्रमाणपत्र आ संजय खोडके यांच्या हस्ते देण्यात आले.कार्यक्रमाला दुर्गेवाडा, भिवापूर,कुऱ्हा, वऱ्हा, घोटा, अंजनवती, जहागिरपुर येथील २०० शेतकरी यांची उपस्थिती होती.



### शिक्षक दिन साजरा

**पूर्णानगर-**स्थानिक जि. प. उर्दू पूर्व माध्यमिक शाळेत मोठ्या उत्साहात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अ. अलीम अ. तमीज व त्यांच्या सहकार्यांनी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृ द यांचा शाल व श्रीफळ तसेच सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक विध्यार्थ्यानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी सर्वप्रथम डॉ. राधाकृष्णम यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिक्षकांनी या दिवसाचे महत्व समजून दिले. कार्यक्रमाचे संचालन फातेमा सहेर अ. नईमोद्दीन यांनी तर आभार प्रदर्शन नवेद इकबाल यांनी केले. कार्यक्रमाला विध्यार्थी पालकवर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विद्यानिकेतन शाळेमध्ये शिक्षक दिन

**अमरावती-**श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्था द्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, रामनगर,अमरावती येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्या. देशमुख यांनी दीप प्रज्वलन व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.सतत उत्साही,निर्मळ, स्वच्छंदी, हसऱ्या बागेमध्ये बागडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समवेत राहून, त्यांच्या जीवना ला आकार देणाऱ्या, योग्य मार्गदर्शन करणाऱ्या, केवळ आपल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी, सतत धडपड करणाऱ्या, विविध नवनवीन उत्साहवर्धक, संकल्पना राबवणाऱ्या, दीपस्तंभा प्रमाणे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा, सन्मान करण्याचा दिन म्हणजे शिक्षक दिवस. वर्ग ५ते ७च्या विद्यार्थ्यांनी, शिक्षक दिनाचे भाषण देऊन डॉ.राधाकृष्णन यांच्या बद्दल, माहिती सांगत, शिक्षकांबद्दल आदरभाव व्यक्त केला.वर्ग पाच ते सातच्या विद्यार्थ्यांनी स्वागत आज मनाए, हम स्वागत आज... या स्वागत गीताने शिक्षकांचे स्वागत केले. मुख्याध्यापक देशमुख यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचा सन्मान केला.विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.वर्ग ७ वी च्या विद्यार्थिनी, ऋतुजा उईके व मानवी वाघमारे या विद्यार्थ्यांनी संचालन केले.सातवीतील इतर विद्यार्थ्यांनी देखील कार्यक्रमाची, तयारी करत संपूर्ण जबाबदारी घेतली.कार्यक्रमाच्या यशस्वते करिता, शाळेतील वर्ग सातवीचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, यांचे सहकार्य लाभले.




### डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या साईनगर उपकेंद्रात शिबीर

**अमरावती -**आरोग्याची काळजी घ्या... आजची तपासणी व सल्ला उद्याचा आधार ठरू शकतो,असे आवाहन करीत निरामय वेलनेस अंतर्गत जनकल्याण सेवा संस्था संचालित डॉ.हेडगेवार हॉस्पिटलच्या साईनगर उपकेंद्रात नि:शुल्क कान-नाक-घसा तपासणी शिबिर ( इएनटी )१७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.कान, नाक,घसा, गळा तज्ञ व कॅन्सर तज्ञ, सर्जन डॉ. रवि गणेशकर हे रुग्ण तपासणी करतील. शिबिरासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीसाठी डॉ. हेडगेवार हॉस्पिटल,अमरावतीचे उपकेंद्र, दुकान क्र. १३,खंडेलाल मार्केट, आकोली रोड, साईनगर, अमरावती येथे रोज सकाळी ११ ते दु.२या वेळेत डॉक्टर उपलब्ध असतात.तसेच सकाळी ७ ते रात्री ९वाजेपर्यंत पॅथॉलॉजी सुरु आहे. रुग्ण किंवा आप्तांनी सकाळी ८ते रात्री ८वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा ७७९६०८६३८३ अथवा ८४४६१३२९९५या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन हॉस्पिटलने केले आहे.

# चांदूर बाजार लोकअदालतीत २२० प्रकरणे निकाली

## ४५,७१,८५३ रुपये रक्कमेची वसुली




**बेलोरा/वार्ताहर**

चांदुर बाजार तालुका विधी सेवा समितीच्या वतीने चांदुर बाजार न्यायालयाचे प्रांगणामध्ये नुकतेच राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी विशेष मोहिमेमध्ये व लोक न्यायालयात एकुण २४ दाखल पुर्व प्रकरणे तसेच न्यायालयातील प्रलंबित १९६ प्रकरणे, अशी एकूण २२० प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली असून ४५,७१,८५३/- रुपयांची तडजोड करण्यात आली व त्या रकमेच्या प्रकरणाचा न्यायनिवाडा झाला.

या राष्ट्रीय लोक न्यायालयाचे उद्घाटन सरस्वती पुजन करुन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एम.एम. राऊत , प्रमुख अतिथी म्हणुन न्यायाधीश एच एस. सोनार , २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, चांदूरबाजार हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन चांदुर बाजार वकील संघाचे अध्यक्ष जी.टी मोहोड व इतर वकील वृंद, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, बँकेचे कर्मचारी, वीज वितरण मंडळ तसेच भारतीय दूरसंचार निगम चे कर्मचारी इत्यादींची उपस्थिती होती. याप्रसंगी दिवाणी न्यायाधीश श्री. राऊत साहेब यांनी त्यांच्या मनोगतातून लोक न्यायालयाची माहिती दिली व जास्तीत जास्त प्रकरणे तडजोड करण्याचे आवाहन केले. सदर लोक अदालतीच्या यशस्वीतेकरीता चांदुर बाजार न्यायालयाचे सहायक अधिक्षक एम.जी. गुलालकरी, जे एस खेडकर, वरिष्ठ लिपिक तसेच इतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांचा शेतात थांबा

## सर्व्हर डाऊनमुळे नोंदणी ठप्प




**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शासनाने लागू केलेल्या डिजिटल ई-पीक पाहणी प्रक्रियेमुळे शेतक-यांना पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसान भरपाई विविध योजनांसाठी पिकांची ऑनलाइन नोंदणी आवश्यक झाली आहेे. तालुक्यातील शेतकरी सध्या या प्रक्रियेमळे हैराण झाले आहेत एवढेच नव्हे तर सतत सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे शेतक-यांना तीन ते चार तास शेतातच ठाण मांडून बसावे लागते.

ई-पीक पाहणीसाठी अंतिम मुदत १४ सप्टेबर देण्यात आली आहे शेतक-यांनी अंड्रॉइड मोबाइलद्वारे आपल्या शेतातील पिकांची माहिती 'ई- पीक पाहणी' अँपवर अपलोड करणे अनिवार्य आहे; परंतु सततच्या सर्व्हर डाऊनमळे ॲप उघडत नाही किंवा अपलोडिंग होत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पाहणी न करता परतावे लागते आहे तर कधी काही शेतक-यांना एकाच माहितीची नोंद करावी लागत आहे.

तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन शासनाने ई.-पीक पाहणीची मुदत वाढवावी आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून थेट शेतात जाऊन पाहणी करून घेण्यात यावी, अन्यथा अनेक शेतकरी या प्रक्रियेतून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यांचा नुकसानभरपाई व पीक विम्यासाठीचा हक्क हिरावून जाईल, अशी मागणी शेतकरी करीत आहे.

**शेतकरी मोहन ठाकरे, कुंभारगाव**

शासनाने ई पीक पाहण्याची अंतिम मुदत १४ सप्टेंबर दिली होती. परेंतु, तांत्रिक अडचर्ण लक्षात घेऊन २० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रयत्न करावेत.

**पुष्पा सोळंके, तहसीलदार, अंजनगाव सुर्जी**


अशिक्षित शेतक-यांकडे अँड्रॉइड मोबाइल नाहीत. आणि ज्यांच्याकडे आहेत. त्यांना हे मोबाईल चालवता येत नाहीत.आम्ही पैसे देऊन सेतू सुविधा वाल्यांना शेतात नेतो. पण, ३-४ तास सर्व्हर डाऊन राहिल्यामुळे ते निघून जातात. आणि ई-पीक पाणी अपूर्णच राहते.त्यामुळे शासनाने महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांकडूनच थेट शेतात जाऊन ई- पीक पाहणी क़रून ध्यावी.

**जयवंत देशमुख, शेतकरी, लाखनवाडी**

# बंगाली शैलीतील दुर्गा मुर्तीना महाराष्ट्रीयन साज

**अमरावती/का.प्र.**


२२ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी जोरात सुरू आहे. यावेळी शहरातील दुर्गा मूर्तींमध्ये एक अनोखा संगम पाहायला मिळतो. पारंपारिक बंगाली शैलीतील दुर्गा मूर्ती महाराष्ट्रीयन रंगांनी सजवल्या जात आहेत. नवरात्रीत देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना यावर्षी एक खास अनुभव येणार आहे.



गेल्या ४९ वर्षांपासून तो दुर्गा मूर्ती बनवण्यासाठी अमरावतीला येत आहे. मूर्तिकार सुदीप मंडल यांनी सांगितले की, त्यांचे कुटुंब दरवर्षी जून महिन्यात येथे येते. स्थानिक दुर्गा मंडळांची नेहमीच अशी विशेष मागणी असते की,मूर्ती बंगाली लूकची असावी, परंतु ती महाराष्ट्राच्या परंपरांचेही प्रतिबिंबित करणारी असावी. म्हणूनच दुर्गा मूर्ती पैठणी साड्या, नाकातील अंगठ्या, पैंजण आणि पारंपारिक महाराष्ट्रीयन अलंकारांनी सजवल्या जात आहेत. त्यांच्याकडून तयार केल्या जाणाऱ्या मूर्ती अष्टभुजा, चामुंडा, भद्रकाली आणि अन्नपूर्णा अशा विविध शक्तींच्या आहेत.

मंडल म्हणाले की, पुतळ्यांसह, सिंह, महिषासुर आणि महाराष्ट्रातील ऐतिहासिक ठिकाणे देखील पार्श्वभूमीवर चित्रित केली जात आहेत.शिल्पकार मंडळ यांनी सांगितले की, मूर्ती बनवण्यासाठी लागणारे मुख्य साहित्य म्हणजे भाताच्या रोपांपासून बनवलेले गवत आणि काळी-पांढरी माती, जी ते गावातून आणतात. ते इतर साहित्य शहरातील बाजारातून खरेदी करतात. हे बांधकाम काम सुमारे ४ महिने सुरू राहते. या वर्षी आतापर्यंत ३५ मोठ्या आणि लहान मूर्ती बनवल्या जात आहेत. या मूर्तींचे वैशिष्ट्य म्हणजे गवत आणि मातीच्या मिश्रणापासून बनवल्या जात असल्याने, त्या पूर्णपणे पर्यावरणपूरक आहेत आणि विसर्जनानंतर काही तासांत पाण्यात विरघळतात.

# शहरात ४७५ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळ



**अमरावती/का.प्र.**

गणेशोत्सवानंतर आईच्या भक्तांनीही नवरात्रीची तयारी सुरू केली आहे. आदिशक्ती 'नवरात्री' या उत्सवात, भाविक ९ दिवस आईची पूजा आणि प्रार्थना करून तिला नतमस्तक करतील. पोलीस प्रशासनानेही नवरात्रीच्या या उत्सवाची तयारी सुरू केली आहे. २०२४ मध्ये, शहर पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ४७५ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळांनी परवानगी घेऊन योग्य विधींनी आईची स्थापना केली. यावर्षी देखील तितक्याच संख्येच्या मंडळांमध्ये आदिशक्तीची स्थापना आणि पूजा केली जाईल, अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे सार्वजनिक दुर्गादेवी मंडळांच्या भक्तांनाही आईचा आशीर्वाद मिळेल.

दरवर्षी नवरात्रोत्सवात, शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रांतर्गत येणाऱ्या १० पोलीस ठाण्यांच्या आवारात माँ दुर्गा आणि माँ शारदा यांची विधिवत पूजा केली जाते.शहर पोलीस आयुक्तालय या सार्वजनिक मंडळांना नवरात्रोत्सव साजरा करण्याची परवानगी देते आणि त्यांना आवश्यक ती सुरक्षा पुरवते. गेल्या वर्षी शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण ४७५ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळे स्थापन करण्यात आली होती.या संख्येच्या आधारे, यावर्षीही तेवढ्याच मंडळांनी शहर पोलिस आयुक्तालयाकडून परवानगी घ्यावी अशी अपेक्षा आहे.

**गाडगे नगर पोलिस स्टेशन परिसरात सर्वाधिक ७४ मंडळे आहेत**

विशेषतः, गेल्या वर्षी गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या परिसरात सर्वाधिक ७४ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळे होती. नांदगाव पेठ परिसरातही ही संख्या ७१ होती. राजापेठ पोलीस ठाण्याच्या परिसरात ६० पेक्षा जास्त म्हणजेच ६३ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळांनी नोंदणी केली होती. फ्रेझरपुरा पोलीस ठाण्याच्या परिसरात ६९ मंडळे नोंदणीकृत होती. तर इतर ठिकाणी ६० पेक्षा कमी सार्वजनिक दुर्गादेवी मंडळे नोंदणीकृत होती.

**१० पोलीस ठाणे क्षेत्रात ५७ शारदादेवी मंडळे**

शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील १० पोलीस ठाणे क्षेत्रातील ५७ सार्वजनिक मंडपात विधीवत पद्धतीने माँ शारदेची स्थापना करण्यात आली. नवरात्रोत्सवात काही मंडळांकडून शारदेची पूजा केली जाते. ज्यामध्ये राजापेठ, खोलापुरी गेट आणि नागपुरी गेट अंतर्गत प्रत्येकी १, भातकुलीमध्ये १४, गाडगे नगरमध्ये ३, वालगावमध्ये १६, फ्रेझरपुरामध्ये ११, बडनेरामध्ये ६ आणि नांदगाव पेठेत ४अशा सार्वजनिक मंडपात माँ शारदेची स्थापना करण्यात आली. यावेळीही शहर पोलीस आयुक्तालयात तेवढ्याच संख्येत मंडपांची नोंदणी होण्याची अपेक्षा आहे.

### आ.सुलभा खोडके यांच्या प्रयत्नाने

# नवसारी प्रभागात कोट्यवधींची विकास कामे मार्गी

## स्वच्छ, सुंदर व हरीत अमरावतीची संकल्पना साकारण्यासाठी कटिबद्ध

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ३ नवसारी भागात आ. सुलर्भा खोडके यांनी विकास कामांचा धडाका लावला आहे. मागील कार्यकाळात या प्रभागातील सर्वच लोकवसाहती,वाणिज्यिक क्षेत्रात तसेच सार्वजनिक ठिकाणी चांगल्या लोकाभिमुख पायाभूत सुविधांची पूर्तता झाल्याने नवसारी भागात विकासाचे पर्व नांदताना दिसत आहे. विकासाची हीच शृंखला अबाधित राखण्यासह नावीन्यपूर्ण विकासाची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्याकरिता आ. सुलभा खोडके यांच्या प्रयत्नाने नवसारी भागात विविध विकास योजनेच्या एकंदरीत १ कोटी निधीतून पायाभूत सुविधांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.



या अंतर्गत प्रभाग क्रमांक ३ मधील नवोदय विद्यालय येथे नालीचे बांधकाम करणे, महात्मा फुले नगर येथील खांडेकर ते कोचे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे, नवसारी स्मशानभूमीची दुरुस्ती सौंदर्यीकरण व प्रवेशद्वार बांधकाम करणे, एकविरा विद्युत कॉलनी येथील रस्त्याचे बांधकाम करणे, गोखले ले-आऊट तसेच पवन नगर येथील मनपाच्या खुल्या जागेला चेनलिंग फेन्सिंग करणे, तसेच श्रद्धा कॉलनी येथील नालीचे बांधकाम करणे, अशी विकासकामे करण्यात येत आहे. यावेळी आमदार महोदयांनी कुदळ मारीत व नामफलकाचे अनावरण करून भूमिपूजनाची औपचारिकता साधली.नवसारी प्रभाग खूप मोठा प्रभाग असून या सर्वभागात कॉंक्रीट रस्त्यांचे विस्तीर्ण जाळे पसरत असल्याने सुरक्षित अवागमनाची सुविधा झाली आहे. प्रभागातील जेष्ठ नागरिक, महिला वर्ग, युवक बांधव, तसेच सर्वांसाठीच हा विकास महत्वाचा असून आमदार महोदयांनी निर्माण केलेल्या सुविधा या जनतेच्या हिताच्या व विकासाला बळ देणाऱ्या ठरू पाहत असल्याची कृतज्ञता स्थानिक नवसारी प्रभागवासीयांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान आ.सुलभा खोडके व यश खोडके यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. नवसारी भागातील भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी माजी नगरसेवक प्रशांत डवरे,संकेत महल्ले, प्रताप देशमुख, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत,अविनाश बोबडे, प्रमोद धनाडे, मुक्ता महल्ले, छोटू दळवी, चव्हाण, संदीप जुनघरे, निलेश नागपुरे, मदन जैस्वाल, शैलेश अमृते आदींसह प्रभागातील सहकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात मुसळधार पावसासह विजांचा कडकडाट

## अनेक भागात गुडघाभर पाणी साचले

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोमवारी दुपारी ४.३० वाजल्यापासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने शहर व जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत केले. विजांच्या कडकडाटासह झालेल्या दीड तासांच्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले, तर अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली. दिवसभर ढगाळ वातावरणानंतर संध्याकाळी पावसाचा जोर वाढला. अचानक झालेल्या पावसामुळे शालेय विद्यार्थी, कामगार व नागरिकांना अडचणीत यावे लागले. शहरातील ☞(पान २ वर)



### मशिदीच्या मिनारवर वीज कोसळली

व्हीव्हीएम कॅम्पस परिसरातील प्रवीण नगर येथील मशिदीच्या मिनारवर विजेचा प्रहार झाला. घटनेच्या वेळी नमाजसाठी अनेक नागरिक मशिदीत उपस्थित होते. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मिनारचा काही भाग कोसळला, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# गायवाडीत राहत्या घरावर विज कोसळली, भिंतीला तडे

## २० ते २५ घरातील विद्युत उपकरणे निकामी

**खल्लार/प्रतिनिधीः-** शनिवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसा दरम्यान दर्यापूर तालुक्यातील गायवाडी येथे साडेसात वाजताच्या सुमारास अशोक साखरे यांच्या राहत्या घरावर विज कोसळली. या घटनेत घरावरील पीलर व पॅरापीड भिंत कोसळली असून काही भितींना तडे गेले आहेत. सुदैवाने कुठलीही जिवितहानी झालेली नाही. मात्र विजेच्या धक्क्याने साखरे यांच्या घरातील सर्वच विद्यूत उपकरणे,विद्युत वायरिंग पुर्णतः जळाल्याने मोठे नुकसान झाले आहे.





विज कोसळून झालेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर तलाठी वैशाली भुयार,कोतवाल चक्रधर बेलसरे, गायवाडी ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी प्रत्यंक्ष नुकसानीची पाहणी करुन पंचनामा ☞(पान २ वर)

# माजी आमदार राजकुमार पटेल उद्या करणार काँग्रेसमध्ये प्रवेश

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची राहणार उपस्थिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** विधानसभा निवडणुकीनंतर मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल यांच्या काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चा जोरावर होत्या. आता या चर्चांना विराम लागलेला आहे. राजकुमार पटेल उद्या बुधवार १७ सप्टेंबर रोजी मालटेकडी येथील काँग्रेस भवन मध्ये आयोजित कार्यकर्ता मेळाव्या दरम्यान अधिकृत प्रवेश घेणार आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडणार आहे. त्यांच्या या निर्णयाला त्यांचे पुत्र आणि धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित पटेल यांनी पाठिंबा दिला आहे. पटेल यांच्यासोबत मेळघाट मधील अन्य काही पदाधिकारीही काँग्रेसमध्ये सामिल होणार आहेत. मेळघाट मध्ये दबंग नेते म्हणून ओळखल्या जाणारे राजकुमार पटेल तीन वेळा आमदार राहिले आहे. त्यांचा राजकीय प्रवास त्यांनी बहुजन समाज पार्टीपासून सुरू केला होता. त्यानंतर ते भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि प्रहार पार्टीमध्ये होते. २०१४ मध्ये त्यांनी प्रहार पार्टी च्या वतीने मेळघाटचे प्रतिनिधित्व केले होते. मात्र गेल्या निवडणुकीत त्यांचा भाजप उमेदवार केवलराम काळे यांनी पराभव केला. या पराभवा नंतरच त्यांच्या प्रहार सोडण्याच्या चर्चा जोरावर ☞(पान २ वर)

# अमरावतीत चरस विक्रीचा प्रयत्न उधळला

## ९८० ग्रॅम चरस व मोबाईलसह ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

### -नागपूरचा तरुण अटक, एक फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात चरस विक्रीसाठी आलेल्या नागपूरच्या एका तरुणाला नागपुरीगेट पोलिसांनी सापळा रचून अटक केली. तर त्याचा साथीदार पोलिसांना चकवून पसार झाला. या कारवाईत जवळपास ३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपीचे नाव प्रतीक प्रभाकर पुनटकर (वय २४, रा. गोंडखोरी, नागपूर) असे असून, त्याचा साथीदार यामिन खान युसुफ खान (रा. गोंडाळी, नागपूर) याचा शोध पोलिस घेत आहेत. १४ सप्टेंबर रोजी नागपुरीगेट पोलिस ठाण्याचे पोलिस पथकासह गस्त घालत असताना, त्यांना गोपनीय माहिती मिळाली की पठाण चौक परिसरात दोन युवक शाळेच्या काळ्या बॅगेत अमली पदार्थ घेऊन विक्रीसाठी उभे आहेत. या माहितीवरून वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावर व पीआाय साळुंके यांच्या मार्गदर्शनात पोलिस पथकाने तात्काळ पठाण चौकात जाऊन धाड टाकली असता, आरोपी यामिन खान पसार झाला, तर पोलिसांनी ☞(पान २ वर)



# राष्ट्रीय लोक अदालतीत ६७७७ प्रकरणांचा निपटारा

## -अपघात दाव्यात ६० लाखांचा धनादेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** न्यायालयीन प्रक्रियेत अनेक वर्षे अडकून पडलेली हजारो प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून अल्पावधीतच निकाली निघाली. अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयात शनिवारी (दि.१३) झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत तब्बल ६,७७७ प्रकरणांचा निकाल लागला. यामध्ये २६ कोटी ९७ लाख रुपयांहून अधिक तडजोडी झाल्या असून, जनतेला दिलासा मिळाला आहे. या लोक अदालतीत मोटार अपघात नुकसानभरपाई प्रकरणे, दिवाणी-फौजदारी खटले, बँकांच्या थकबाकीची प्रकरणे, चेक बाऊन्स, भूसंपादन व विवाह कायद्याशी संबंधित प्रकरणे या विविध प्रकारच्या खटल्यांचा समावेश होता.






जिल्ह्यात एकूण ४८ पॅनल तयार करून न्यायाधीश, अधिवक्ता व न्यायालयीन कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुनावणी घेण्यात आली. या लोक अदालतीत दाखलपूर्व २९,७५१ प्रकरणांपैकी ३,०५४ निकाली काढण्यात आले. तर प्रलंबित ११,४९२ ☞(पान २ वर)

### अंजनगाव सुर्जी येथील घरफोडी प्रकरणः

# बुलढाण्यातील कुख्यात शकील डॉन टोळीचा सदस्य गजाआड

**अंजनगाव सुर्जी /प्रतिनिधीः-** गेल्या दोन महिन्यांपासून बुलढाण्यातील कुख्यात घरफोडी करणारी टोळी तालुक्यात सक्रिय होती. टोळी कडून दिवसाढवळ्या बंद घरांना लक्ष्य करून घरफोड्या केल्या जात होत्या. टोळीने अनेक चोऱ्या केल्या असल्याने गुप्त माहीतीच्या आधारे अंजनगाव पोलीस स्टेशन अधीकाऱ्यांनी शहरातील घरफोडीत सक्रीय असणारा बुलढाण्यातील एका कुख्यात घरफोड्यास अटक केली आहे. ९ सप्टेंबर ला भर दिवसा सकाळी ११ वाजता अंजनगाव शहरातील आशा नगर स्वप्ननगरी येथील दोन बंद घरांमधून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरीला गेले. महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध कलम ३०५,३३१(१) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला, ज्याची गंभीर दखल अंजनगाव पोलिसांनी घेतली आणि तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे अंजनगाव पोलिस आणि जिल्हा ग्रामीण गुन्हे शाखा बुलढाणा येथे पोहोचल्यानंतर शकील डॉन टोळीचा कुख्यात घरफोडी करणारा शेख अहमद शेख समद, ( ३६ वर्ष) याला अटक करण्यात यश आले. टोळीचा मुख्य सूत्रधार☞(पान २ वर)



# गणपती विसर्जन मिरवणूक दरम्यान दुचाकी चोरी

**-चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** होंडा कंपनीची शाईन गाडी क्रमांक एम एच २७ सी एन ७६१९ शनिवारी सायंकाळी गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी गेल्यावर जिल्हा परिषद शाळेसमोरुन चोरीला गेली असल्याची फिर्याद नितिन गोखले यांनी चांदूररेल्वे पोलिस स्टेशन मध्ये दाखल केले. चांदूररेल्वे शहरातील क्रांती चौक येथील युवक नितिन सुरेश गोखले (वय ४२) हे दि.१३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ८.३० ते ९ च्या दरम्यान विरूळ चौकात गणपती विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी लहान भाऊ उमेश गोखले यांच्या नावाने असलेली होंडा कंपनीची शाईन गाडी क्रमांक एम एच २७ सी एन ७६१९ ☞(पान २ वर)



# लाखणवाडी-कविठा रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा

## काँग्रेसचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** लाखणवाडी ते कविठा हा महत्त्वाचा मार्ग अतिशय दुरवस्थेला पोहोचला असून, रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांसह पादचारी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. येत्या २ ऑक्टोबर रोजी संत गुणवंत महाराज यांची जयंती असल्याने या रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहने व भाविकांची गर्दी होणार आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढू नये म्हणून या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली आहे.या ☞(पान २ वर)



# अतिक्रमण प्रकरणावर आयुक्तांकडून तातडीची बैठक

## -योगेश कोल्हे यांच्या नियुक्तीवरही प्रश्नचिन्ह

### शिवसेना शहरप्रमुख प्रवीण हरमकर यांचा पाठपुरावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगर पालिकेच्या अतिक्रमण विभागातील अधिकारी योगेश कोल्हे यांनी हँडीकॅप (अपंग) असलेल्या व्यक्तींवर अन्याय करत त्यांचे खोके तोडल्याच्या गंभीर प्रकारावर आज (दि.१५) आयुक्त सौम्या शर्मा यांच्याशी शिवसेना अमरावती शहरप्रमुख प्रवीण हरमकर यांनी सविस्तर चर्चा केली. या चर्चेत कोल्हे यांची अतिक्रमण विभागात झालेली नियुक्ती कोणत्या पद्धतीने व प्रक्रियेशिवाय झाली यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आला. ☞(पान २ वर)



# ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्याचा स्केटिंग स्पर्धेमध्ये दणदणीत विजय

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील इयत्ता ८ वी चा विद्यार्थी स्वराज गिरी याने सीबीएसई झोनल स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले असून त्याची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा व्यास विद्यापीठ, केरळ येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेसाठी त्याने अपार मेहनत करून शाळेचे नाव चमकवले. या यशाचे श्रेय स्वराजने आई-वडील, त्याचे वैयक्तिक कोच अनुज परतानी सर, तसेच शालेय क्रीडा शिक्षिका – जया भाकरे मॅडम, क्रीडा शिक्षक- शुभम नागे सर यांना दिले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीमधील गौरी मॅडम, ममता ठाकरे मॅडम, अंगद देशमुख सर यांनी स्वराजचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता भरभरून शुभेच्छा दिल्या. तसेच मुख्याध्यापिका वर्षा राठोड मॅडम यांनीही त्याचे कौतुक केले. शाळेतील शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग या सर्वांनी स्वराजचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या.स्वराजचे हे यश त्याच्या मेहनतीचे, शिस्तीचे व शाळेने दिलेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे फलित आहे.आगामी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देण्यात येत आहे.



# बेलपुरा परिसरात बापलेकावर प्राणघातक हल्ला

## दुर्गादेवी बसवण्याचा वाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** बेलपुरा परिसरात दुर्गादेवी मंडळातील स्थानिक वादाने गंभीर रूप घेतले आहे. येथील रहिवासी आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये दुर्गादेवी बसवण्याच्या कारणावरून किरकोळ वाद सुरू होता. या वादातून मध्यस्थी करण्यासाठी गेलेले पन्ना छोटेलाल कुरील (वय ४४) आणि आदित्य उर्फ आदी कुरील (वय १७) या बापलेकावर प्राणघातक चाकू हल्ला करण्यात आला. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी बबलू चौधरी (वय ३८), नितीन चौधरी (वय ३५), ऋतिक चौधरी (वय २७) व साहिल चौधरी यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी बबलु चौधरीला ताब्यात घेतले आहे. हल्ल्यात पन्नाला मांड्यावर तर आदित्यला पोटावर चाकू लागल्यामुळे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ☞(पान २ वर)





# बडनेरात कुत्र्यावरून दोन गटात वाद



## -डीसीपींच्या मध्यस्थीने वातावरण शांत

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरात कुत्र्याने दुकानासमोर लघुशंका केल्याच्या कारणावरून झालेल्या वादाने दोन गटात राडा झाला. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. मात्र, पोलिसांच्या तत्परतेने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे वातावरण शांत झाले. मिळालेल्या माहितीनुसार, एका दुकानासमोर कुत्र्याने लघुशंका केली. यावरून दुकान मालकाने कुत्र्याला मारले. ही घटना पाहणाऱ्या एका व्यक्तीला ते अमानुष कृत्य वाटले आणि त्याने दुकान मालकाशी वाद घातला. या किरकोळ वादाचे रूपांतर थोड्याच वेळात दोन गटांच्या भांडणात झाले. परिसरात गोंधळ माजल्याने तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली. गोंधळाची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थिती ☞(पान २ वर)

# विभागात १७ सप्टेंबरपासून ‘सेवा पंधरवडा’

## -विभागीय आयुक्तांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

### पाणंद रस्ते विषयक मोहीम, सर्वांसाठी घरे, नावीन्यपूर्ण उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने प्रशासकीय विभागांसाठी १५० दिवसांचा आराखडा निश्चित केला आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यासाठी पंतप्रधान राष्ट्रनेता नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विभागात ‘सेवा पंधरवडा’ राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यात नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ तसेच जिल्ह्यातील विकास प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी दिले.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (ता.१२ सप्टेंबर) सेवा पंधरवडा पूर्वतयारीबाबत आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. या आढावा बैठकीत अपर☞(पान २ वर)



### बिंदुनामावली तपासणी शिबिर

महसूल पंधरवडा व १५० दिवस कृती आराखड्यांतर्गत विभागातील पाचही जिल्ह्यांत प्रशासकीय विभागांची बिंदुनामावली तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात महसूल, जिल्हा परिषद, नगर परिषद, राज्य परिवहन व अन्य शासकीय विभागांच्या सर्व संवर्गाच्या बिंदुनामावली तपासून अद्यायावतीकरण करण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्गीय कक्षाव्दारे हा उपक्रम राबविला जात असून दि. १६ सप्टेंबर रोजी, सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी अकोला येथील नियोजन भवन येथे पहिले शिबिर होणार आहे. याची सर्व संबंधित आस्थापना प्रमुखांनी नोंद घ्यावी. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी बिंदुनामावली रजिस्टर व आवश्यक दस्ताऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले. बिंदुनामावली सदंर्भातील माहिती पुस्तिका (चेकलिस्ट) ☞(पान २ वर)